| | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्षाची | आगाऊ रु० | ५ | डांक हाशील | ०।१२ |
| सहामाही | ” | ३ | ” | ०८ |
| साळअखेर | ” | ७ | ” | १।८ |
| किरकोळ अंकास | | | | ०४ |

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ०।०१

annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ” 8 as
Single copy..............................1as

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per line2a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOXXVI — AKOLA MONDAY 4 APRIL 1892 — NO 13

वर्ष २६ — सोमवार तारीख ४ माहे एप्रील सन १८९२ इ० — अंक १३


वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध ८ शके १८१४

अकोल्यास श्री राजेश्वराचें जुनें, प्रसिद्ध व स्वयंभू देवस्थान आहे. बहुतेक हिंदु देवालयाप्रमाणें हें राजेश्वराचें देवालयही जीर्ण दशेंत असून त्याची स्थीति अगदीं भिकार आहे. अशा देवालयाला धनी किंवा वाली कोण असणार! देवळाची व्यवस्थापक कमिटी ह्मणून नामधारी मंडळी होती परंतु त्यांतील एकाद्या दुसऱ्या गृहस्था कडून कांहीं नीट व्यवस्था होण्याची आशाच नव्हती. परंतु अलिकडे श्री राजेश्वरांची प्रेरणा येथील लोकांच्या मनांत निराळ्या प्रकाराची झाली असावी असें दिसतें. जीर्णोद्धार करावा, पाळशाळा चांगली दुरुस्त करावी, देवालयाच्या पडझडीच्या जागेंत इमारत उठवावी, आणि देवाच्या संस्थानाचा एक कायमचा फंड उभारावा इत्यादि गोष्टी करण्याचें येथील श्रद्धाळु, देवभक्त, व निस्सीम निष्ठेच्या लोकांनीं योजिलें आहे. नवी मंडळी नेमली जाऊन तिनें हें कार्य मोठ्या झपाट्यानें आरंभलें असून त्यांच्या सदुद्योगाची सफळताही होत चालली आहे. फंड उभारण्याची युक्ति अगदीं सोपी व साधी आहे. प्रत्येक हिंदूच्या घरांमागें दर महिन्यास निदान एक पैसा या प्रमाणें पहिल्या वर्षाची वर्गणी गोळा करण्याची सुरुवात केली आहे. ही वर्गणी अत्यल्प व ईश्वरनीत्यर्थ असल्यामुळें लोक ती आनंदानें देतात असें आह्मी मानतों. शिवाय देवस्थाना प्रीत्यर्थ धान्याची भिक्षा सुरू केली आहे ह्मणजे येथील धान्याच्या बाजारांत धान्याच्या गाड्या येतात त्या प्रत्येक गाडीमागें श्रीराजेश्वराची एक कटोरी घेण्याचा क्रम चालविला आहे आणि लोक बिनहरकत व संतोषानें ‘ईश्वरा’ ला भिक्षा घालतात ही आनंदाची गोष्ट होय. येथील कै० गंगाधर जोरावल शेट यांच्या नांवानें पाहल्या पासून सकाळ सायंकाळ श्रीदेवासाठीं चौघडा सुरू झाला हेंही प्रस्तुत वेळीं कळविण्यास विशेष आनंद वाटतो. श्री राजेश्वर संस्थानाची उठावणी ज्या ज्या सद्गृहस्थांनीं आरंभली आहे त्यांचा दीर्घ उद्योग, मानापमान सोडून परयाचना आणि महेश्वरी धर्मनिष्ठा यांचें आह्मी अभिनंदन करितों. स्वल्पारंभ बहुकार्येंही कसा होतो हें राष्ट्रीय सभे सारख्या देश सेवेच्या जंगी संस्थेच्या व्यवस्थापकांनीं उद्योगाचें बाळगावें आणि लोकांच्या उदार मनुष्यांचा, देशाभिमानाचा, आणि भावी कल्याणराशीचा ठसा त्यांच्या मनांत पूर्णपणें उमटावा ह्मणजे लोक हस्तें परहस्तें यथाशक्ति लोककार्याला अवश्य मदत करतील. धर्मबुद्धि व लोकहितबुद्धि या उभयतांचें संमेलन झालें पाहिजे ह्मणजे सर्व सार्वजनिक कार्यें सुलभतेनें होतात. आपल्या मधील बहुत बहुत लोक खऱ्या भावाचे व एक निष्ठेचे असतात परंतु समाजा मधील श्रेष्ठ लोक बहुत करून स्वार्थबुद्धीचे असून आत्महिताचे वेडे भक्त होतात व परहिता प्रीत्यर्थ झीज सोसण्याचें त्यांस वाळकडू नसतें, ह्मणून आमच्या लोकांतील सार्वजनिक कृत्यें सफळ होत नाहींत तेव्हां मना चंदना परि झीजवावें हा नैतिक व धार्मिक उपदेश देण्यास समाजांतील अग्रेसरांनीं प्रवृत्त झालें पाहिजे. आह्मी असें इच्छितों कीं निदान या गांवांतील लौकिकप्रिय, भाविक, व सधन लोक आपल्या वैभवाचा व श्रीमंतीचा नजराणा श्रीराजेश्वरापाशीं अर्पण करून आपल्या उदाहरणानें इतर अनुयायी लोकांस चांगला कित्ता घालून ठेवतील.

---

आमच्या राज्यकर्त्यांना धनलोभ व राज्यलोभ हे असे सर्वंकष लोभ लागले आहेत आणि त्यांच्या या फळयपद महात्वाकांक्षेनें आमच्या लोकांची पायमल्ली व शुद्धघात होऊन राहिली आहे. या देशावरील सार्वभौमत्व इंग्रजांस मिळालें त्याला त्यांचें कार्यपटुत्व, व्यापारी धोरण आणि स्वार्थाभिलाषाला परहितवादाचें अवगुंठन हीं कारणीभूत झालीं आहेत. सरकारची सत्ता वाढती आहे, समुद्रावर पूर्ण वर्चस्व आहे, फौज फांटा आणि आरमारें युद्ध संग्रामास तयार आहेत व राज्यविस्तार एवढा कीं सूर्य कधींच त्यांच्या राज्यांत मावळत नाहीं तेव्हां अशा प्रबल चक्रवर्ती राष्ट्रा समोर आफगाणिस्थानचा, ब्रह्मदेशाचा, मणीपूरचा किंवा असामचा निभाव लागला नाहीं आणि सांप्रत हिंदुस्थानच्या आसपास ल्हानसहान संस्थानें आहेत त्यांचा ही निभाव लागणार नाहीं हें उघड आहे. इजिप्तदेश, आफगाणिस्थान, ब्रह्मदेश स्वराज्यभ्रष्टते प्रत पोंचले तेव्हांच वरील ह्मणण्याची सत्यता आमच्या पाहण्यांत आली आहे. सुदैवानें ह्मणा किंवा दुर्दैवानें ह्मणा शेरास सव्वाशेर ईश्वरानें निर्माण करून ठेविला आहे ह्मणून ठीक आहे. आमच्या राज्यकर्त्याला रशिया सारखा शत्रु नसता तर त्यांनीं धनलोभ व राज्यलोभ यांची परमावधि करून सोडली असती. हिंदुस्थान देशाला इंग्लंड आणि रशिया या दोन राष्ट्रां मधील शत्रुत्वा बद्दल अनेक दुःखें भोगावीं लागत आहेत. हिंदुस्थानचा आणि इंग्लंडचा संबंध कालत्रयीं तुटणार नाहीं. हिंदुस्थान देशावरच इंग्लंड राष्ट्रानें भव्य राज्याची इमारत उभारली आहे आणि आपल्या इंग्लंडास कुबेरनगरी बनविली आहे त्याप्रमाणें इंग्लंडाच्या सार्वभौमत्वावर … men have … ताता त्यापासून …archy and de… मता हीं सर्व हिंदुस्थान देशास लाभलीं आहेत आणि त्यांच्याच बळावर कल्याणराशी व सुखसमृद्धि हीं संचय करून हा देश अबादानीत आहे तेव्हां उभय देशाचा संबंध फार निकटचा झाला आहे आणि या संबंधाच्या चिरस्थायीपणावर आह्मी आपले आशातंतु वाढवीत आहोंत. आमचे आशाघुस फुकांनीं व फळांनीं वाकले जावे आणि त्या योगें इंग्लंडची सत्कीर्ति दिगंत पसरून अजरामर व्हावी असा आमचा मना पासून संकल्प आहे. आह्मी राजनिष्टपणानें व उदार स्वामिभक्तीनें, व उभय देशांच्या कल्याणतत्परतेनें बहुसाळ प्रकारांनीं आमच्या राज्यकर्त्यांस विनवीत असतों कीं त्यांनीं खरी स्थिती व लोकांच्या गरजा कळून घेऊन राज्यकारभाराचें सुकाणू सुखपरिणामाकडे वळवावें. हिंदुस्थानदेश विपन्नावस्थेनें रसातळास पोचत आहे. सर्व प्रजा निर्धन होत होत उपासमारीनें व अन्नान्न दशेनें त्रस्त आहे, लोकांस राजकीय अधिकार बिलकूल नाहींत, प्रजेचा पैसा सरकार योग्य रीत्या खर्चीत नाहीं, सरकार दर्णे मनस्वी वाढलें आहे, कायद्यानें व दारिद्र्यानें लोक निस्त्राण व नामर्द बनले आहेत इत्यादि अनेक दुःखें व गाऱ्हाणीं सरकार विरुद्ध सरकारपाशीं हिंदुस्थानच्या अठ्ठावीस कोट प्रजेचीं आहेत अशा दुर्धर प्रसंगीं सरकारनें दूरदर्शीनें व आत्म लाभाला बाजूला ठेऊन प्रजेस चिंतामुक्त व आनंदयुक्त करण्यासाठीं झटलें पाहिजे.

सरकारचा राज्यलोभ किती बलवत्तर व बहुखर्चीचा आहे याच्या दिग्दर्शनार्थ आह्मी १८९१–९२ सालच्या जमाखर्चा वरून थोडी माहिती देतों. हिंदुस्थानचे सरकारचे बडे मुत्सद्दी व फडणीस सर डेव्हिड बारबर साहेब लिहितात कीं सन १८९१–९२ साली लष्करी खर्चा प्रीत्यर्थ बजेटांत इंडियामध्यें १६,८१,५५,००० रुपये खर्च लागेल असा अंदाज धरला होता आणि विलायतेंत लागणाऱ्या खर्चाचा अंदाज ४६२,५०० पौंड केला होता पण त्या सालच्या फेर तपासणीच्या हिशोबांत हे खर्च अनुक्रमें १,०९,५५,००० रुपयांनीं व १,२३,१०० पौंडनीं वाढले आहेत. हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील स्वाऱ्या निमित्त फार खर्च लागला. सालाच्या आरंभीं किरकोळ लढायासाठीं ह्मणून १५,५०,००० रु० आकारले होते त्या ऐवजीं ७२ लक्ष रुपया पर्यंत मजल पोंचली. विलायतेस हिंदुस्थानासाठीं लागणाऱ्या लष्करी खर्चांत वाढ येण्यास कारण असें कीं मागील तुटलेली बाकी आणि हिंदुस्थानांत लागणाऱ्या फौजेसाठीं अत्यावश्यक खर्च मिळून २,२१,००० पौंड या देशाच्या खजिन्यांतून भरावे लागले. लष्करी खर्च हल्लीं आहेत इतके पाहिजेत किंवा नकोत हा प्रश्न अगदीं स्वतंत्र आहे. पण ज्या लष्करी खर्चाच्या योगानें इंग्लंडाचे प्रत्यक्षपणें व अप्रत्यक्षपणें अनेक फायदे होत आहेत त्याचा भार सर्वस्वी हिंदुस्थानच्या खजिन्यावरच लादावा हें अगदीं अन्यायाचें आहे. शिवाय कित्येक लष्करी खर्च निव्वळ इंग्लंड साठींच होत आहेत तेही या देशाच्या खजिन्यांतून खर्चले जावे या पेक्षां आमच्या राज्यकर्त्यांची स्वार्थलोलुपता अन्य कोणती असणार आहे? बेताबेतानें, काटकसरीनें, नेटीव लोकांच्या पलटणी वाढविल्यानें, नेटीव लोकांस व्हालंटीअर केल्यानें, विलायतचें स्टोअर डिपार्टमेंट बंद करून हिंदुस्थानांत स्टोअर खातें स्थापल्यानें व अशा अनेक प्रकारें लष्करी खर्च पुष्कळ कमी होण्या सारखा आहे परंतु हा बुद्धिवाद सांगणारा राजद्रोही आहे असें ह्मणण्याचा आमच्या सरकारचा वाट असतो तेव्हां प्राणावर ही बेतल्यास निस्पृह राहणारा आमच्या देशास कोण भेटणार आहे?

आमच्या सरकारास धनलोभ विलक्षण आहे तसाच आपमतलबीपणा व स्वकीयांविषयीं अभिमान व पक्षपातबुद्धि हीं इतकीं जागृत आहेत कीं त्यांना त्या त्या प्रवृत्तींनीं प्रजेच्या कल्याणाविषयीं आंधळें करून टाकलें आहे. हल्लीं बहुतेक सर्व देश दुष्काळानें व पाण्याच्या टंचाईनें व्याकूळ झाला आहे, दुष्काळानिमित्त दुष्काळ फंडांनीं निरनिराळीं कामें उभारलीं आहेत, जमिनीवरील सारा वसूल होणें अशक्यच होतें तेथें या सालापुरती माफी दिली आहे (ह्मणजे पिकाच्या सालीं ही जुनी बाकी भरपूर द्यावी लागेल) चौहींकडून रयतें संबंधीं मोठ्या कळकळीनें व आस्थेनें शोध घेण्याचा सरकारनें ढोल मात्र आणला आहे इत्यादि प्रकार सर्व प्रांतोप्रांतीं चालले आहेत व त्यावरून लोकांची निकृष्टावस्था व उपासमारा हीं चांगलीं व्यक्त होत आहेत तरी असें कोणी अधिकारी सुचवीत नाहींत कीं शेपन्नासाहून कमी पगाराचे कारकून शिपाई आहेत त्यांचें सध्यांच्या दुर्भिक्षतेच्या अवकाळीं नुसत्या पगारानें उदरभरण होणें कठीण व दुर्घट आहे त्या अर्थीं सध्यांच्या पगाराच्या सवाईनें त्यांस पगार दिले जावेत आणि हजार पांचशेपासून वरवर वीस वीस हजारा पर्यंत मोठमोठ्या पगारांचे अधिकारी आहेत त्यांच्या पगारांतून शेकडा पंचवीस किंवा तीस रुपये प्रमाणें पगार दुष्काळा निमित्त काटून घ्यावेत. दुष्काळ फंडातून देण्याचा मजुरीचा दर ठरविला आहे तो अगदींच कमी आहे म्हणजे तेवढ्यानें एकाचेंही एका वेळें पुरतें नीट पोट भागत नाहीं तेव्हां तो निरखाचा दर वाढवावा असें ही कोणी म्हणत नाहीं. गम्मत अशी आहे कीं हजारा वरील पगारवाले बहुतेक सर्व आंग्लो इंडियन लोक आहेत. त्यांचे … नारायण … म्हणजे हिंदुस्थान सरका… दस्तूर खुद्द. पोंचा व …

## वर्तमानसार.

निम्मा घेतला आहे त्यांच्या वरच म्हणजे आपल्या गोत्रजांवरच शस्त्रप्रहार करण्या सारखें होणार आहे. तेव्हां इतर प्रजाजना साठीं हा सदयतेचा मासला दाखविण्याचा प्रसंग कोण व कसा आणणार? आम्ही वर गोष्टी लिहिल्या आहेत त्या होण्या सारख्या असून त्यांचा कित्येक नेटिव संस्थानांतून अनुभव घेतला आहे परंतु हा युक्तिवाद राजकर्त्यांच्या स्वार्थपरायणतेला व भूतदयेच्या दांभिकपणाला अनुसरून नाहीं त्या अर्थी कोणीही वरील सूचनेसारख्या सूचनेला यथायोग्य मान देणारा मिळणार हें आम्ही नव्यानें सांगायला नको.

आमचें म्हणणें दुष्काळा पुरतेंच आहे असें नाहीं. हिंदुस्थानला इंग्रजी राज्यकारभाराचा खर्च अतोनात पडतो आणि हा खर्च बंद करण्या सारखा आहे असें आम्ही दाखविलें तर असें कबूल करावें लागेल कीं प्रजेच्या पैशाचा विनियोग नीट होत नाहीं आणि त्या मुळें प्रजेला सरकार आपल्या करभारांनीं लुटत आहे. मागें एक कमिशन बसलें होतें त्याचा हेतु राज्यकारभाराचा खर्च कोणकोणत्या खात्यांतून व कसकसा कमी करावा या प्रश्नाचा विचार करण्याचा होता. त्या कमिशनेंने खर्च कमी करण्याच्या बाबी शोधून काढल्या त्यांत मुख्य एका ठोकळ व अवाढव्य बाबीकडे बुद्धिपूर्वक कानाडोळा झाला असावा असें आम्हांस वाटतें. स्टेट सेक्रेटरी, गव्हरनर जनरल, गव्हरनर इत्यादि लक्षावधि व सहस्त्रावधि रुपये लुटणारे अधिकारी हिंदुस्थानच्या खजिन्यावर सर्व प्रकारचीं ऐश्वर्य सुखें उपभोगितात त्या त्या अधिकाऱ्यांचे पगार शेंकडा दहा किंवा वीस या प्रमाणानें कमी केले तर आमच्या मतें कित्येक राज्य कारभाराचीं खातीं त्या काटलेल्या पगारावर भागलीं जातील. राज्यकारभाराचा खर्च वाढवावा आणि खर्च वाढला म्हणून अनर्थ कारक व छळकारक कर रयतेवर नवे नवे बसवावे अशी आजकालच्या राज्यकारभाराची रहाटी आहे. ही रहाटी चांगली असो किंवा वाईट असो त्या बद्दल कोणी चकार शब्दही काढतां कामा नये असा सरकारचा ठराव आहे तेव्हां आम्ही ज्यास्त पुढें लिहिण्यास धजत नाहीं.

सारांश, कांहीं वर्षा पर्यंत म्हणजे जो काल पर्यंत या देशच्या लोकांजवळ कांहीं त्राण होतें तों पर्यंत आपली फाजील धनदौलत कोठें ही गेली तरी त्या बद्दल विधिनिषेध नव्हता; परंतु जेव्हां डोळे उघडे असूनही उपासमारा व आसन्नमरणावस्था या दोन गोष्टींचा ससेमिरा लागला तेव्हां आमचे लोक नैसर्गिक शहाणपणानें व विद्यामृताच्या नव्या दृष्टीनें सरकारकडे करुणस्वरानें धांव घेत आहेत. घोर दारिद्र्यांत लोळत पडलेल्या आमच्या लोकांस जागृतावस्था प्राप्त झाली आहे. हिंदुस्थानांतल्या धनोत्पादक नद्यांचे प्रवाह या देशांत वाहत आहेत परंतु त्या सर्व नद्यांचा संगम इंग्लंड देशीं झाला आणि त्यांच्या बहुविध व उचंबळणाऱ्या मुखांनीं त्या राष्ट्राच्या धनाब्धीचा अफाट विस्तार होऊन त्यास अदृष्टपूर्व भरती आली आहे. विलायतेचे लोक हल्लीला इतके पक्के व
march. दांभिकपणें द-
him about
honor of t मालापेक्षां

आपला माल स्वस्ता विकला जावा ह्मणून निष्प्रतिबंध व्यापाराचें वाग्जाल पसरलें आणि आयात मालावरील कर उठविले, विलायतची मजुरी महाग पडून विलायती माल महाग पडतो ह्मणून हिंदुस्थानच्या मजूरदारावर कृपावंत होऊन नवा फ्याक्टरी आक्ट या देशाला लागू केला, हे व अशा प्रकारचे दाखले शेंकडों दाखवितां येतील. तेव्हां आपण शहाणे होऊन धनांचे प्रवाह आपल्या देशांतच खेळविले पाहिजेत आणि सरकारास त्यांच्या कर्तव्या विषयीं स्मरण देऊन त्यांच्या कडून तीं बनावून घेतलीं पाहिजेत. आह्मी सरकार विरुद्ध हा लेख लिहिला आहे असें कोणी समजूं नये. मनुष्य स्वभावच स्वार्थसाधु आहे तेव्हां आमच्या राज्यकर्त्यांनीं कांहीं अमानुष कृत्य केलें नाहीं. त्यांचे आपल्यावर महदुपकार आहेत कीं व त्यांच्या उदारपणाची वैजयंती ही होय कीं आमचे राज्यकर्ते आपल्या स्वार्थाच्या तालामालानें, एकोणीसाव्या शतकांतील अनुभविक व प्रजासत्तात्मक उन्नतीच्या संस्कारानें व सुकीर्तीच्या अभिलाषानें लोककल्याणकारी आहेत आणि ह्मणूनच हिंदुस्थानदेश तनुमनुधनेंकरून राजनिष्ठ, राजभक्त, व राजसेवक आहे.

---

गेल्या महिन्याचे २६ वे तारखेस लंडन मुक्कामीं मि. जार्ज यूल साहेब निवर्तल्याचें वर्तमान या आठवड्यांत समजलें. मरणसमयीं यांचें वय ६३ वर्षांजवळ होतें. हे मोठे व्यापारी असून हिंदुस्थान देशाबद्दल त्यांना फार आस्था होती. अल्हाबादेस मागें सन १८८८ सालीं राष्ट्रीय सभा भरली होती त्यावेळीं त्या सभेचे अध्यक्ष हेच होते. यांच्या मरणानें राष्ट्रीय सभेचा एक चांगला पुरस्कर्ता नाहींसा झाला.

---

मुंबई सरकारच्या कायदे कौंसिलांत एक मिठाच्या कायद्यां संबंधानें बिल आलें आहे. या बिलाचा उगम मुंबई हाय कोडतांत प्रथम झाला. कर्नाटकांतील दोन बायांनीं मिठाच्या कायद्याविरुद्ध गुन्हे केले होते आणि त्या गुन्ह्यांची त्यांच्यावर शाबिती होऊन त्यांस शिक्षा देण्यांत आल्या. परंतु पुढें अपिलांत त्या बाया निरपराधी असून फक्त कायद्यांतील अतिव्याप्तीच्या दोषामुळें दोषी ठरल्या आहेत असें हाय कोडतानें ठरवून त्यांस आठ आठ आणे गांवाला दंड केला. एका बाईच्या मुलानें मिठांत पाणी सांडलें होतें ह्मणून तिनें तें मीठ चुलीवर ठेविलें आणि वाफ होऊन पाणी निघून गेलें. दुसऱ्या बाईला बाजारांत मीठ वाईट मिळालें ह्मणून तिनें तें मीठ बरीं शुद्ध करून घेतलें. तेव्हां उभयतां बायांनीं सरकारी परवाना असल्या शिवाय मीठ शुद्ध केलें ह्मणून हायकोडतानें कायद्याच्या अंमवारी साठीं आठ आठ आणे दंड केला आणि कायद्यांतील या चुकीची दुरुस्ती झाली पाहिजे म्हणून अभिप्रायही लिहून ठेविला होता. त्या अन्वयें आतां असें बिल आणिलें आहे कीं ज्या मिठा वरील सरकारी कर चुकते झाले आहेत त्या मीठाचे शुद्धिकरण करण्या साठीं सरकारी परवान्याची जरूर नसावी. ही सूचना चांगली आहे या बद्दल मतभेद असण्यास अगदीं सबब नाहीं.

---

इंडिया कौंसिल बिलाचें दुसरें वाचन कामन्स सभेंत झालें. दुसऱ्या वाचनाच्या वेळीं मि० स्वान साहेबांनीं त्या बिलास उपसूचना आणिली होती कीं कौंसिलदार निवडण्याचा अधिकार लोकांस असावा. व त्यांच्या उपसूचनेवर मि० ग्लाडस्टन बोलले कीं लोक नियुक्त प्रतिनिधीस कौंसिलांतून सभासद नेमण्याविषयीं हिंदुस्थान सरकारावर सक्ती होऊन त्या योगें सरकारचे हक्क व अधिकार मर्यादित व आकुंचित करूं नये कां कीं हिंदुस्थाना संबंधानें विलायतच्या लोकांस पक्की आणि पूर्ण माहिती नाहीं आणि एखाद्या जातींचें किंवा धर्मपंथाचें वर्चस्व होणें उपयोगी नाहीं. परंतु लोकमताला योग्य मान दिला पाहिजे आणि तशी व्यवस्था होईल अशी योजना झाली पाहिजे तात्पर्य हें कीं हिंदुस्थान सरकारावर लोकमताचा व लोकांनीं निवडलेल्या प्रतिनिधींचा सल्लाविचार घेण्याचें काम सोंपवावें. ग्लाडस्टन साहेबांच्या भाषणा नंतर स्वान साहेबांनीं आपली उपसूचना मागें घेतली. हिंदुस्थान सरकारच्या हातून कांहींच घडत नाहीं ह्मणून आह्मी विलायतेवर मोहिम करणार आहों आणि तसें करणें वरील गोष्टींनीं फार जरूरीचें झालें आहे. राष्ट्रीय सभेची बैठक विलायतेस भरविणें विशेष अवश्यक आहे असें पदोपदीं सर्वजणांस वाटूं लागलें आहे.

---

मि० ए. ओ० ह्यूम साहेब हे विलायतेस जाण्या साठीं निघण्या पूर्वींच त्यांजवर राजद्रोहाच्या गर्दनें प्रहार करावे आणि त्यांस घायाळ करून येथें कैद करावें असा कित्येक विघ्नसंतोषी, दीर्घद्वेषी व आपस्वार्थी आंग्लोइंडियनांचा विचार होता, परंतु तो फसला तरी त्यांनीं आपल्या मताच्या वर्तमान पत्रांतून व्यर्थ ओरड चालविली आहे आणि सध्यांचा उद्योग राष्ट्रीय सभेला रसातळास पोंचविण्याचा आहे. राष्ट्रीय सभेचे दुश्मान नेटिव लोक व आंग्लो इंडियन लोक यांच्या हातीं एक राष्ट्रीय सभेचें गुप्त व विश्वसनीय सरक्युलर लागलें. हें पत्र ह्यूम साहेबांनीं राष्ट्रीय सभेच्या सभासदांस लिहिलें होतें. मुंबईच्या स्टांडींग कमिटीनें तें पत्र लोकांत वाटण्याचें नाकारलें. परंतु अलाहाबादे कडे व कलकत्या कडे तें पत्र लोकांस प्रसिद्धपणें वाटण्यांत आलें. या पत्रांत ह्यूम साहेबांनीं लोकांस बोध केला आहे आणि सांप्रतची वस्तुस्थीति बदलली नाहीं तर फ्रान्सच्या राज्यक्रांती प्रमाणें एक अदृष्टपूर्व क्रांती होईल असें त्यांनीं भाकित केलें आहे. हिंदुस्थानची प्रजा भिकारी आहे व अन्न मिळत नसल्या मुळें मृत्यूच्या दरवाज्या जवळ बसली आहे. सरकार तर लोकांच्या म्हणण्याला जुमानीत नाहीं. राज्यकारभार रयतेस सुखावह नसून त्या पासून होणाऱ्या दुःखांनीं सर्व जण हवालदील झाले आहेत. नेटिव लोक राजनिष्ठ, स्वभावानें गरीब व सत्वस्थ आहेत तरी सरकारच्या कृतीनें व आकस्मिक कारणानें लोकांमध्यें असंतोष, सुखनिराशा व घोरदारिद्र्य या त्रयीचें बीजारोपण होऊन काय परिणाम होईल हें कळत नाहीं. असा दुर्धर व भयंकर प्रसंग टळावा म्हणून राजकर्त्यांना व प्रजाजनांना ह्यूम साहेबांनीं वेळेवर इषारा दिला आहे. इंग्रजीच्याच प्रसादानें
राष्ट्रीय सभेतील e ...के सज्ञान, सधन,
व सवळ m मा। आहेत आणि
to ण्याचा

इंग्रजी राज्याच्या मजबुती वरच सर्व लोकांचें जीवित व वित्त यांची मजबुती आहे. राज्याचा पाया ढासळला कीं नेटिवांची वाताहत झालीच. राज्यकर्त्यांनीं शहाणपणानें प्रजेचीं गाऱ्हाणीं व दुःखें दूर करावीं इतकाच ह्यूम साहेबांचा त्यांना इषारा आहे. परंतु राष्ट्रीय सभेच्या लोकांस सक्तीनें त्यांनीं सांगितलें आहे कीं, सरकारा प्रमाणेंच डोळे मिटून बसण्याची वेळ नव्हे. राष्ट्रीय सभेच्या सात वर्षांच्या सतत उद्योगाला व उपदेशाला सरकारनें जुमानलें नाहीं तरी आपण विलायतची सफर केली पाहिजे. आणि या सफरी साठीं मुबलक पैसा गोळा करा आणि धुरंधर व वक्तृत्वशाली गृहस्थ विलायतेस धाडा ह्मणजे इंग्लंड राष्ट्र वस्तुस्थिति पाहून भयचकित व कर्तव्यरत होईल. आणि नंतर हिंदुस्थानास सोन्याचा दिवस दिसेल. त्यांचें पत्र मुख्यत्वें करून राष्ट्रीय सभेच्या सभासदांस असल्यामुळें त्यांनीं त्यांच्या अनास्थेवाईक, डोळेझांकीच्या, व गैबिपणाच्या वर्तनास कडक दोष दिला आहे. आणि यांच्या डोळ्यांत अंजन घालण्या साठीं भविष्यकाळीं केवढी क्रांती होण्याचा संभव आहे आणि त्यांत त्यांचें व राजकर्त्यांचें सर्वस्व कसें विलयास जाईल हें सांगून तो काल टाळण्याचा मार्ग त्यांनीं दर्शविला आहे. राष्ट्रीय सभेच्या मागण्या सरकार पासून मागून घ्याव्या ह्मणजे सर्व व्यवस्थित व अबाधित चालेल असें त्यांचे ह्मणण्याचा मथितार्थ आहे. ह्यूम साहेबांचें जोरदार पत्र राजद्रोहमूलक नसून उलटें राजभक्तिप्रतिपादक आहे. परंतु आमचें एवढेंच ह्मणणें आहे कीं ज्या पत्रकर्त्यांनीं राजद्रोहाची युक्ति लढविली आहे तें मात्र पक्के राजद्रोही, कृतघ्न व अविश्वसनीय आहेत. आणि कालगतीनें त्यांच्या आत्मघातुक वर्तनाची प्रचितीही आल्या वाचून राहणार नाहीं.

---

मुंबई शहराला तान्सा तलावाचें पाणी सोडण्याचा समारंभ गेल्या गुरुवारीं सायंकाळीं व्हाइसराय लार्ड लान्सडौअन साहेबांच्या हातून साजरा झाला. जगामध्यें अद्भुत असें हें तान्सा तलावाचें काम झालें आहे. या कामास आरंभ होऊन सहा वर्षें काम पुरें होण्यास लागलीं व सर्व खर्च दीड कोट रु. लागला. पंचावन मैल लांब पर्यंत पाण्याचा प्रवाह मुख्य तलावा पासून बांधून आणिला असून पाण्याचा मोठा खजिना औरस चौरस सहा मैल आहे. या खजिन्याच्या सभोंवार तट उभारला आहे त्या पासून दर दिवशीं दोन कोट सत्तर लक्ष ग्यालन पाणी पुरविता येईल एवढा मोठा सांठा सद्यांच्या तलावांत करितां येईल. मुंबईच्या मुनसिपल कार्पोरेशनची अचाट कर्तृत्वशक्ति पाहून व्हाईसराय साहेबांस स्थानिक स्वराज्याच्या उत्तम उपयुक्ततेचें एक ढळढळीत उदाहरण कळून आलें.

---

गेल्या 'केसरी' च्या अंका बरोबर राष्ट्रीय सभेंतील गृहस्थ रा. रा. घोसाल, नारायण स्वामी, भगीरथ प्रसाद, मनमोहन घोस, दिनशा एदलजी, मदन मोहन मालविया अशा सज्जनांचें एक चित्र पुण्यांतील चित्र शाळेंत छापवून पाठण्याची भेट ह्मणून वर्गणीदाराकडे धाडलें आहे. चित्रपट

सुरेख असून छपाई व रंग चांगले उमटले आहेत. केसरी पत्राची अलिकडील देशसेवा बिनमोल असून त्याबद्दल लोकांनीं त्याच्या प्रकाशकांचे आभार मानावे तितके थोडे आहेत. मुंबईची हेमंतोत्सव व्याख्यानें, अर्थेतिलेखमाला आणि नानाविध विषयावरील ओतप्रोत लेख इत्यादिकांनीं केसरीपत्र फार रमणीय वाटतें. पुण्यांतील सामाजिक प्रकरणांनीं वाचकांचा वृथा वेळ घेतात तरि त्याच्या कर्त्यांची विचारसरणी, सुधारणाप्रियता मतस्वातंत्र्य व कलमबहादरी या गुणांनीं केसरी सारख्या पत्रांची मातबरी आम्हांस विशेष वाटूं लागली आहे.

---

'सद्धर्मदीप' नांवाचें मासिक पुस्तक अलिबागेस पुन्हां सुरू होऊन त्याचे पहिले दोन अंक आह्मांस मिळाले व तिसरा अंकही थोडक्यांत मिळावा असा अंदाज आहे. मध्यंतरी बंद पडण्या पूर्वी हें पुस्तक चांगलें लोकप्रिय असून त्याला लोकाश्रयही बरा होता. सदर्हु पुस्तकाची पुन्हां सुरुवात रा. रा. रावजी हरी आठवले यांनी केली आहे. नांवा प्रमाणें यांत कीर्तनाचा व पौराणिक सुरस प्रकरणाचा भाग निराळा ठेविला आहे. आणि तो नीट साधला आहे. भाषा सरळ व सुबोध असून सामाजिक विषयांवरहि दोन चार लेख चांगले आले आहेत. प्रस्तुतच्या स्वरूपा वरून 'सद्धर्मदीप' आपल्या वाचकांस यथाशक्ति ज्ञानभाण्डारांत नेऊन त्याच्या नेत्राला आनंद देईल असें आह्मी इच्छितों. सालिना वर्गणी ३ रुपये असून शाळा मास्तर व लायब्ररीच्या यांच्या साठीं निम्मी ठरविली आहे.

---

## The Berar Samachar

MONDAY, APRIL 4, 1892

Under strange coincidences appears a Congress circular in public prints. Mr. A. O. Hume the writer of it has already left Indian shores and is nearing his own native land. The circular dated as far back as the 16th of February and was freely distributed among the members of the Congress party. It did not reach the anti-Congress journals till a week elapsed after the departure of its able writer. It was not meant for any one outside the sphere of the Congress and so it did not find its way to the gaze of the Anglo-Indians and the other opponents of the Congress. The circular is marked out as a signal instance of sedition. One would wonder at the ingenuity of human mind when it invents seditions from one of the best writings. Mr. Hume is now held up as a sedition-monger. We are quite certain that such an attempt will never succeed. The circular is plain enough. There are no quibbles. It is neither a literary weapon to turn men rebels nor is it a challenge to Government to run into wild extremes. It indicates the sterling honesty of motives and a plain speaking of the stern facts as far as they cast their shadows in the immediate future.

To understand it rightly we must gauge the position of the writer. He is styled as the Father of the Congress. Under his standard bearing the insignia of the Congress have flocked multitudes of men who look up to him for direction. As their guide and leader his duty lay to signalize the danger that lies in their march. Several gentlemen questioned him about the proposed memorial in honor of the late Pandit Ajoodhyanath. His answer to them is a peg upon which he hangs his programme of the Congress. The legal and constitutional ways which the Congresswallas have pursued so long he has asked them to stick to with the same earnestness as before. His circular is an emphatic call to duty—pure and simple. He has told people not to fritter their resources in attempting memorials. Individuals as well as institutions, however excellent in themselves, merge into insignificance when a nation's cause is to be paraded for the comforts, prosperity and the very lives of its countless people. Mr. Hume is extremely grieved to find rich and well-to-do persons equally blind with the Government to the real grievances of the nation. He boldly opens up their eyes to the gloomy future that lies in wait for them if they remain cold and indifferent as before. The administration is full of its weaknesses though all of them are of omission and none of commission on the part of the rulers. The rule is ill-adapted, pauperising the subjects and is preparing the way for the most terrible catelysisms in the history of the world. This is Mr. Hume's conviction and his is the earnest prayer to the people as well as Government to join hands to avert the catastrophe. Nothing can be more loyal and devout than to put the proper parties on their watch. Fore-warned is forearmed. It is a different question to say how far Mr. Hume's forecast holds water. It is given for none to tell for certain in such matters. He draws a parallel between the events of which the French Revolution was the result and those that prevail in India. The people are poor, ignorant and peaceful. But these qualities of submissive, blind and loyal feelings are balanced by the starvation, discontent, and despair that drive people into violent extremes. The cup of misery is well-nigh full. The most we can do is to avert the turn of affairs. The best way is to redress the grievances or otherwise must evolve, as a rule of cause & effect, a terrible rising. Mr. Hume is really outspoken. He cautions the Government against losing their hold upon the affection and loyalty of the people. He tells his own countrymen to despair of a physical victory when a nation like India being driven to run wild in desparate attempts rises against them. His picture of the future if events run in their wayward course is thrilling and shocks the feelings of easy-going gentle men. He had more to do with the Congress-members than with the Government. He is hopeless of the latter's move in the realization of the position of affairs. He calls upon the members to come to the front with men and money. The dearest and nearest concerns of them are at stake in the general ruin that overshadows the nation in no distant future. He has asked people to bring the Congress-movement to England. If we succeed to awaken the Englishman to behold what is likely to happen in India then India is sure to secure the peaceful continuance of the English rule by making those fundamental changes as advocated by the Congress after mature and ripe considerations for seven years. Mr. Hume has guardedly excluded the general masses from the lights of his advocacy. Perhaps he was afraid of their abuse of them. He addresses the Congress-members thus:—'You are the creation of Great Britain—of British learning, history and literature; and with British rule you stand or fall.' Is this seditious unless we change the meanings of words? Is it not from the true pride of an Englishman who wonders at the foundation of an empire which his countrymen have dug up from the ruins of anarchy and despotism to the admiration of the world all around.

---

Sir Charles Dilkie lectured to his countrymen on their duty to India a month and a quarter before at Newcastle. His views are sound and comprehensive. He has pointed out the benefits of the British rule but has not omitted to notice the increasing burden of taxes, the disproportionate and exorbitant expenditure of the military departments. In Indian politics he is equally accurate in his wild and extensive information. His views of the constitutional reforms agree in the main with those advocated by the Congress. He observes thus:—

"To my mind British rule itself in India will be strengthened by widening its base by the development of Municipal and other elective institutions and by the representation of these elective bodies upon provincial councils. I would accompany this gradual change by a continually increasing decentralisation of the Government, and a greater and greater trust of the localities and of the natives. To the central Government must be committed the preservation of the interest of the religious against persecution by their neighbours. To the central Government must be committed the due balance between the different portions of what we call one country—India, or rather between State and State comprised within that name. To the central Government must be left the imperial taxation of India for the purpose of Imperial defence and the keeping up of the army which from time to time is needed for that purpose; but as regards all other matters it seems to me that a large share may be given to local feeling as displayed in the election of the representatives of localities to local bodies for local purposes."

---

## वऱ्हाड.

हवामान—उन्हाळा प्रखर झाला आहे. उष्णमापक यंत्रांत पारा १०८ अंशावर चढतो. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं. बाजार भावाला सध्यां चांगली तेजी आहे.

मलकापूरच्या प्रकरणांत शिक्षा पावलेले मीर जंगु व शेख हैदर यांजवरील वऱ्हाड हायकोर्डतानें वाढविलेली शिक्षा रद्द करण्याविषयीं मलकापूरच्या व आसपासच्या हिंदु मुसलमान लोकांनीं कमिशनरकडे अर्ज केला आहे. आणि तो अर्ज मंजूर व्हावा ह्मणून 'प्रमोदसिंधु' कर्त्यांनीं शिफारस केली आहे.

मि० प्रीडो असि० कमिशनर यवतमाळ शिकार करीत असतांना त्यांस वाघानें थोडी बहुत दुःखापत केल्याचें कळतें. दुःखापत धातुक नसून त्यांची प्रकृती ठीक आहे.

मि० अर्देसर दिनसाजी चिनाय एक्स्ट्रा असि० कमिशनर यांनीं उमरावती स्माल कोर्टाचा चार्ज घेतला.

येथील स्टेशन बाजू कडील दोन रस्ते बंद झाल्यावर व्यापारी लोकांनीं त्या विरुद्ध मुनसिपालिटीस अर्ज केला. मुनसिपालिटीच्या सभेंत त्या अर्जाविषयीं असें बहुमत पडलें कीं रेसिडेंट साहेबांकडून रस्ते बंद करण्याविषयीं लिहून येईपर्यंत ते खुले ठेवावेत. अद्याप निकाल नाहीं तरी डेपुटी कमिशनर साहेबांनीं आपल्या माजिस्ट्रेटच्या अधिकाराप्रमाणें मुनसिपालिटीस रस्ते बंद करणें भाग केलें. डेपुटी कमिशनरांस मुनसिपालिटीवर माजिस्ट्रेटीचा अधिकार दिला आहे तो देण्याचा हेतु निराळा असून त्याचा दुरुपयोग

झाला आहे असें आह्मास वाटतें.

वऱ्हाड पोलिस खात्यांतील इन्स्पेक्टरचे पगारांचे दर्जे १००, १२५, १५०, व २०० रुपये असे चार होते त्या ऐवजीं नवे १००, १२५, १५०, १७५, २०० व २५० रुपये असे सहा केले आहेत. आणि या नवीन पद्धती प्रमाणें मि. साव्हियल इनस्पेक्टर—बाळापूर व खामगांव तालुके व रा० रा० बलदेवसिंग इनस्पेक्टर—वणी व पांढरकवडा यांची दोनशें रुपये पगारा वरून अडीचशे रुपये पगारावर बढती केली आहे; आणि उमरावतीचे इनस्पेक्टर मि० अंगर यांचा दोनशे पगार होता तो १७५ करून दारव्ह्याचे इनस्पेक्टर मि० नरसय्या यांस दोडशे वरून १७५ ची बढती दिली आहे.

नवीन दोषमुक्त ठरलेले वाशिमचे पोलिस इनस्पेक्टर मि० सायन्ना यांस वाशिम जिल्ह्यांतून बदलून बुलढाणें जिल्ह्यांत धाडणार असल्या विषयीं वर्तमान कळतें.

---

नोटीस

रा० पन्नालाल नंदलाल मारवाडी व० हातरुण ता० बाळापूर यांस खालीं सह्या करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मांस कणीराम शिवसा यांनीं कणीराम जोहरमल यांचे जामिनकीचे रोखे चार रुपये ६९५ चे लिहून दिले त्यापैकीं तुह्मांस दोन सालाबद्दल जवारी खंडी सात १७५ रुपयांची व नगदी रुपये १७५ असे रुपये ३५० पोहोंचले. गुदस्त सालीं तिसरी सालबंदी आणि सालमजकुरी चवथी सालबंदी देत असतां तुह्मीं घेतली नाहीं या साठीं आह्मी दोन्हीही सालबंदीचे रुपये तुमचे नांवानें अकोलें येथें मिवराज सुरजमल यांचे दुकानी रु. ३४५ जमा करविले आहेत. तें ही नोटीस पावल्या बरोबर घेऊन जाऊन आमचे दस्तैवज परत द्यावे. तसें न करितां आह्मांवर फिर्याद वगैरे केल्यास आह्मी कोणतेही गोष्टीस जबाबदार होणार नाहीं. व या नोटिशीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल. कळावें तारीख १ माहे एप्रील सन १८९२ इसवी.

(सही) कणीराम शिवसा दस्तुर खुद्द.

(सही) कणीराम जोहरमल दस्तूर खुद्द.

---

नोटीस

रा. रामचंद्र लक्ष्मण शुक्ल रहाणार पातूर नंदापूर ता० अकोलें यांस.

खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येतें कीं आमचा चुलता भगवान भट्ट बीन विठ्ठल भट्ट यांनीं तुम्हास पातूर येथील घरांत बिऱ्हाड ठेविलें आहे अगर थोडे दिवसा पूर्वी सदरहू भगवान भट्ट यांस देवाज्ञा झाल्यामुळें त्या घराची योग्य व्यवस्था लावणें आहे. करितां कळविलें जातें कीं, ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत तुम्हांस राहण्या साठीं दिलेली जागा खाली करून द्यावी. तसें न केल्यास रीती प्रमाणें तजवीज करून यापुढें दर महा २ रुपये प्रमाणें भाडें घेतलें जाईल. व तुम्हास खर्च सोसावा लागेल कळावें. ता. ३।४।९२

(सही.)

वासुदेव नारायण राजूरकर दस्तूर खुद्द.

---

## वर्तमानसार.

विलायतेस पुन्हा हवा बिघडली असून कित्येक आगगाड्या बर्फांत गडल्यामुळें बंद पडल्या आहेत.

अलीपुरास जो दंगा झाला त्यांत नेटिव व लष्करी शिपायाचें अंग आहे असें बाहेर पडलें आहे.

कोटा येथें एक युरोपियन आफिसर घोड्यावर बसून रानांत फिरावयास गेला होता. त्यास एक पठाण घोड्यावर बसलेला भेटला. दोघांची थोडीशीं भाषणें होऊन दोघेही चालत असतां पठाणानें हळूच आपली तरवार काढून साहेबांस वार करून आपण नाहींसा झाला तो अद्याप मिळाला नाहीं. रयतेला सरकार त्रास देऊं लागले ह्मणजे बिचाऱ्या साहेब लोकांवर असले प्रसंग हमेषा यावयाचे.

अपूर्व प्रेमबंधन—अमृतबझार पत्रिकेमधें कृष्णगौर (गंगाजमुनी) दंपत्याची एक अशी विलक्षण गोष्ट प्रसिद्ध झाली आहे कीं, हिंदुस्थानामधील एका सुप्रसिद्ध घराण्यांतील एक हिंदु विलायतेस जाऊन एका परीक्षेत पास झाला. व त्याला एक मोठी सरकारी नोकरी मिळाली. तें ऐकून त्याच्या बापाला फार आनंद झाला, मुलगा परत आला ह्मणजे त्याला पावन करून घेण्याची तजवीज आपण करूं, असें त्यानें मनांत आणिलें पण पुढें मुलानें बरोबर एक मडम बायको करून आणिली आहे असें त्याला समजलें, तेव्हां त्याला धडकी भरली! त्यानें आपल्या पोराचें तोंडही पहावयाचें नाहीं, असा निश्चय केला. मुलानें चिठ्ठी पाठविली तर त्याचें उत्तरही तो देईना. अशा रीतीनें बापाचा कोप झालेला दिसला. तेव्हां एक दिवस तो नूतनसंपादित बायकोला लुगडें नेसलेली अशा थाटानें बरोबर घेऊन हळूच बापाचें घरीं गेला. तिणें सासूबाईस हिंदु स्त्रियांसारखें नमन केलें. तेव्हांची स्थिति काय विचारावी! विलायतेहून परीक्षा पास होऊन व मोठी नोकरी मिळवून आलेला पोटचा गोळा गोरीगोरीपान व सवत्स अशा रूपवती स्त्रीसह तिच्या पुढें एकाकी येऊन उभा राहिला, व तिनें नमस्कार केला, तेव्हां त्या माउलीचा प्रेमडोहोच उचंबळला! तिणें त्या तान्या मुलीस अंकावर घेऊन तिचें यथेच्छ चुंबन घेतलें. अशा रीतीनें आईचें अतिप्रेम जडल्यामुळें अर्थात बापाही भाळले. व पिता पुत्रांचें गोड झालें! ही मडम विलायती असून तिनें हिंदु नांव धारण केलें आहे. पेहराव हिंदूचाच करिते. नवऱ्याची भाषा शिकली आहे. व मोठ्या समाधानानें त्या कुटुंबांत राहिली आहे. ही गोष्ट ऐकून कोणाचें मन आश्चर्यभरीत होणार नाहीं? हजार कोसावरील एका गौरकाय स्त्रीनें एका हिंदू बरोबर हिंदुस्थानांत यावें, व अज्ञांकित होऊन त्याच्या प्रसन्नते करितां त्याच्या मना प्रमाणें तिनें वागण्यास तयार व्हावें, हें केवढें जबरदस्त प्रेमबंधन!! ही प्रेमबंधनाची ग्रंथि बसण्यास अमुकच जात किंवा धर्म लागतो असें कांहीं नाहीं. मनें परस्पर मिळालीं ह्मणजे वाघ्या सारखे गंगाजमुनी योग सुद्धां घडून येतात!

पु० बे०

गिरणींतल्या स्त्रियांनीं दररोज अमुक तासांपेक्षां जास्त वेळ काम करूं नये असें सरकारानें ठरविल्यामुळें आमदाबादच्या गिरणींतल्या ज्या स्त्रिया रिकाम्या झाल्या त्यांतील कांहीं भिक्षा मागू लागल्या, कांहीं कसबिणी झाल्या व कांहीं अगदीं कमी रोजमुऱ्यावर इतर मजुरी करूं लागल्या असें एका पत्रांत प्रसिद्ध झालें आहे. मिळून त्या सर्वांस पोटास मिळण्याची सोय झाली आहेना?

मद्रासेंत विजेनें चालणारी ट्रामवे गाडी सुरू होणार आहे.

ब्रह्मदेशांत २७,००० माणसें दुष्काळ कामावर आहेत.

गंजम प्रांतांत गेल्या चार वर्षांपासून एक वाघ माणसें खाऊं लागला आहे ह्मणून त्या वाघास जो मारील त्यास ५०० रुपये इनाम देण्याचें त्या कलेक्टरानें प्रसिद्ध केलें आहे. तो ओळखावा कसा? शिकारी साहेब कां पुढें होत नाहीं.

दक्षिणलुशाई प्रांतांतल्या कामावर जाण्याकरतां बंगालच्या ३ ऱ्या पलटणींतील ३०० लोकांस तयार असण्याचा हुकूम झाला.

लुशाई लोकांवर आणखी लोक रवाना होणार आहेत.

टर्कीच्या एका प्रांतांत रशिया आपलें ठाणें विशेष मजबूत करित असल्यामुळें त्या उभयतांत कुरकुर सुरू झाली आहे.

आफ्रिकेंत इंग्रज टोळीचा जरी मोड झाला तरी ती टोळी जास्त मदत घेऊन त्या आफ्रिकी लोकांवर पुन्हा हल्ला करणार आहे.

आफ्रिकेच्या पूर्वभागांत एक इंग्रज कंपनी शिरली असून त्या कंपनीच्या लोकांवर आफ्रिकन लोकांनीं एक हल्ला केला. लढाईंत मेसर्स फिगर्ड रटसन हे घायाळ झाले, चार शिक शिपायी मेले व दुसरे ६ घायाळ झाले. आफ्रिकन लोकानीं या इंग्रज कम्पनीवर जय मिळवून त्याची एक तरफही घेतली.

जंजुरीच्या देवास वाहिलेल्या मुली मुरळ्या होतात व त्याच प्रमाणें मधुकेश्वरास वाहिलेल्या कसबिणी होतात अशी समजुत असतां टिवा नांवाच्या माणसानें आपली अल्पवयी मुलगी मधुकेश्वरास वाहिली ह्मणून त्याच्यावर ३७३ कलमा प्रमाणें खटला झाला. त्याणें जरी तीस वाहिली तरी तो दानविधी अजून पूर्ण झाला नाहीं, कारण तिला नाहाण आल्यावर मंगळसूत्र बांधण्याचा विधी अजून होणें आहे ह्मणून गुन्हा झाला नाहीं असें शिरशीचे माजि. मि. जोशी यांणीं ठरवून आरोपीस सोडून दिलें. मंगळसूत्राचा विधी जरी होणें आहे तरी विजार नेसवण्याचा वगैरे विधी झाला असल्यामुळें गुन्हा होतो अशा सबबीनें माजिस्त्रेटच्या ठरावावर सरकारानें हायकोर्टाकडे अपील केलें हायकोर्टानें गुन्हा होतो असें ठरवून आरोपीस एक महिन्याची शिक्षा दिली. देवास मुली अर्पण करणारांनीं सावध व्हावें.

ठा० अ.

सेक्रेटारियटमधील नवी योजना— सेक्रेटारियटमध्यें नोकरीवर ठेवण्याविषीं पुढील ठराव झाला. ३० रुपयेपर्यंत म्याट्रिकलेटेड लोक ठेवावे; त्यावर ५० रुपयेपर्यंत पी. ई पास झालेल्याला ठेवावें आणि ५० रुपयांच्या वरच्या जागा ग्रज्युएटांस द्याव्या.

आजपर्यंत सेक्रेटारियटमधील आफिसर आणि कामदार लोकांस प्रसंग विशेषीं संस्थानांत नोकरी करण्यास परवानगी देत असत. परंतु सरकारानें अलीकडे असा ठराव केला आहे कीं सेक्रेटारियटमधील कोणाही इसमास संस्थानांत नोकरीस पाठविलें जाणार नाहीं. याचा हेतु इतकाच आहे कीं, सेक्रेटारियटमध्यें असतांना सरकारच्या गुप्त व्यवहारांची या लोकांस चांगली माहिती झाली असते, सबब त्यांस बाहेर जाऊं दिलें असतां आपलें गुह्य बाहेर पडेल अशी सरकारास भीति पडली आहे. आणि या कारणास्तव हा असा ठराव करण्यांत आला आहे.

इं० त०

पतिआळा संस्थानांत कांहीं जमीन उकरत असतां पुष्कळशा लांकडी पेट्या जुन्या मोहरांनीं भरलेल्या सांपडल्या.

गेल्या शुक्रवारीं हैद्राबादेस एका स्पेशल गाडीनें बावीस हत्ती गेले. हे हत्ती नुकतेच धरले आहेत. त्यांत दहा नर व बारा माद्या आहेत. सगळ्यांत मोठा आहे तो आठ फूट उंचीचा आहे. व लहान पिलू आहे तें उगीच सव्वाचार फूट आहे.

सखाराम दामोदर दाते, खेडकर वैद्य असें म्हणतात कीं विंचू चावल्याबरोबर थंड पाण्याची धार दहामिनिटें पर्यंत दंश झालेल्या ठिकाणावर धरावी, अथवा दुसरा उपाय असा कीं उत्तम हिंग पाण्यांत उगाळून दंश झालेले ठिकाणीं लेप करावा लोकांनीं या उपायांचा अनुभव घ्यावा ह्मणून परोपकारार्थ छापून प्रसिद्ध केलें आहे.

पोपट हा पक्षी जबरदस्त हंसणारा आहे. तो स्वतः ज्या टिवल्याबावल्या करितो त्या पाहून आपला आपणच हंसतो मि० व्हईट नांवाच्या प्राणिशास्त्र्यानें असें लिहिलें आहे कीं, सुतारपक्षी हंसतो तो अगदीं मनापासून आणि मोठ्यानें हंसतो. त्यांनीं आपल्या एका अत्युत्कृष्ट ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, "ग्यागुवाय नांवाचा एक पक्षी आमचा अतिशय लाडका होता तो हसूं लागला ह्मणजे असा कांहीं सुंदर हंसे, कीं जवळ बसणारास त्याच्या प्रमाणें आपणही हंसावें असें वाटल्याखेरीज रहात नसे, आणि तें त्याचें हंसणें अगदीं स्वाभाविक असे" कांहीं पारोळ्यांनीं, आपणांस पकडण्याकरितां टपलेल्या एका मांजराची टवाळी केली व तींत फत्ते झाल्यामुळें, त्यांचें त्यांनाच हसूं आलें तें मुलाला गुदगुल्या केल्या असतां मूल हंसतें तसें हुबेहुब होतें. गुल (बदकाच्या जातीचा पक्षी) पक्ष्याला विनोदाचें स्वारस्य विशेष कळतें, किंबहुना सर्व प्राण्यांत विशेष कळतें. त्याची बरोबरी एका खोकडानेंच केली तर नकळे मिस् कॉब् नांवाच्या एका प्राणिशास्त्रज्ञ बाईनें स्वतः पाहिलेली गोष्ट लिहून ठेविली आहे. एक वेळ कांहीं गुल पक्ष्यांनीं कळप करून निव्वळ मनोरंजनार्थ ह्मणून पांच चार डुकरांचा पाठलाग चालविला. तीं बिचारीं डुकरें पुढें पळत होतीं आणि हे पक्षी त्यांच्या पाठीं मागें लागले होते. एखादें डुकर तावडींत सांपडलें कीं त्याला एखाद्या पक्ष्यानें चोंच मारावी, आणि तें घाबरून केकटत पळालें ह्मणजे सर्व पक्ष्यांनीं एकमेकांकडे पाहून गम्मत करावी.

गव्हांच्या एक दाण्याची परवा किती लोक बाळगीत असतील बरें? केरांत किती गव्हाचे दाणे जात असतील? आपल्या इकडे कोणत्याही मंगल प्रसंगीं स्त्रियांची ओटी भरण्याला गहूं लागतात, त्यांवेळीं किती गहूं केरांत जात असतील? परंतु खालीं थोडासा हिशेब दिला आहे त्याचा विचार कधीं कोणाच्या लक्ष्यांत आला असेल काय? एक गव्हांचा दाणा लावला, तर त्यापासून ५० गव्हांचे दाणे उत्पन्न होतात. हें ५० दाणे लावले व प्रत्येक दाण्याचे ५० दाणे उत्पन्न झाले, तर दुसऱ्या वर्षी २,५०० दाणे उत्पन्न होतील, तिसऱ्या वर्षी १,२५,०००, साहाव्या वर्षी १,५६,२५,२५,०००, व बाराव्या वर्षी २४४,१४,०,६२,५०,००,००० दाणे उत्पन्न होतील तिसऱ्या वर्षी झालेले उत्पन्न ३०० मनुष्यांस एक वेळेला पुरेल. या मानानें गव्हांच्या एका दाण्याचें बाराव्या वर्षीचें उत्पन्न जगांतील सर्व मनुष्यांना—जगांतील लोकसंख्या सुमारें एक अब्ज छपन्न कोटि आहे—१८८ वेळ पुरेल!

करमणूक०

अमेरिकेंत कापूस पिकवून निर्वाह करणाऱ्या लोकांची संख्या त्या कापसाच्या किंमतीवर होऊं शकणाऱ्या लोकांच्या संख्येपेक्षां फारच वाढली आहे. तशांत तिकडे जितका कापूस उत्पन्न होतो तितका खपत नाहीं. त्यामुळें कापूस कमी उत्पन्न होईल अशी तजवीज करण्याची तिकडे जरूर पडली आहे.

गेल्या आठवड्यांत मद्रास, मुंबई, अजमीर, बंगाल आणि बर्मा या प्रांतांत मिळून एकंदर एकलक्ष वीसहजार मनुष्यें रिलीफ कामावर होतीं.

सु० प०

दुष्काळांत औदार्य—निजामसरकारच्या हद्दींत दुष्काळपीडित लोकांस सरकारी खर्चानें पोसावें असें हुजुरांनीं आपल्या सर्व अधिकाऱ्यांस हुकूम फर्माविलें आहे व त्यासाठीं ५० लाख रुपये खर्च करण्याची परवानगी दिली आहे.

कामगार.

रेलवेच्या गाड्यांना तांबडे निशाण दाखविलें कीं पुढें संकट आहे, थांबवा गाडी, असा अर्थ होतो दारू पिणारांना देखील आपली पिण्याची संवय टाकण्यासाठीं देव तांबडी खूण करतो, पण ती पाहून थांबतील तेव्हा! सडकून दारू पिणारांच्या नाकाचा शेंडा तांबडा लाल होत असतो. "आतां पुढें संकट आहे, थांबा" असें सांगणारी ती खूण नव्हे काय?

हैद्राबादेस एका संन्याशाच्या मनांतून आपल्या पूर्वाश्रमाच्या मुलाचे लग्न करावयाचें असून त्याकरितां कांहीं पैसे पडले तरी ते देण्यास तो तयार होता ही हकीकत तेथें असलेल्या बार्शी व पंढरपूर येथील दोघांस कळून त्यांनीं पंढरपुरास एक मुलगी आहे अशी स्वामीस थाप देऊन त्यांना पंढरपुरास आणलें. तेथें आणखी एक इसम सामील करून घेऊन त्यास मुलीचा बाप बनविला; एक रांड आणून तिला मुलीची आई केली; व आपल्यापैकीं एकाची बायको नुकीच लग्न झालेली, ती नवरी मुलगी ह्मणून दाखवून, ८०० रुपये घेतले. लग्न हैद्राबाद मुक्कामीं करण्याचें ठरलें. स्वामीनीं सर्वांचीं तिकिटें काढलीं व मंडळीं गाडींत बसली गाडी चालू झाल्यावर कोणी सोलापुरास कोणी दुडगीस, याप्रमाणें मंडळी मध्येंच उतरून पार झाली. हल्लीं खटला चालू आहे.

दी. बं.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

| | | | |
|---|---|---|---|
| वर्षाची | अगाऊ रु० ५ | डांक हाशील | ०।३ |
| सहामाही | " ३ | " | ०९ |
| सालअखेर | " ७ | " | १०८ |
| किरकोळ अंकास | | | ०४ |

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
,, दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ......०१

| | Rs. | | |
|---|---|---|---|
| annum in advance | 5 | Postage 13 | as |
| annum in arrears | 7 | ,,1Rs 8 | as |
| Six monthly | 3 | " 8 | as |
| Single copy | | | 1as |

Advertisements
Below 10 lines...2R
per line over10...4 as
Repetition per line3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VO XXVI — AKOLA MONDAY 11 APRIL 1892 — NO 14

वर्ष २६ — सोमवार तारीख ११ माहे एप्रील सन १८९२ इ० — अंक १४


## मित भाषण

( लिहून आलेला मजकूर )

'मित भाषणाचा नियम सर्वांस माहित असतो परंतु त्या नियमाचें पालन फार थोड्यांच्या वर्तनांत आढळून येतें. किंबहुना मितभाषणांत चांगुलपणा काय आहे या विषयीं तत्वज्ञान फारच फार विचारी मनुष्या शिवाय दुसऱ्यास होण्या सारखें नाहीं असा आमचा समज आहे. आमच्या ह्मणण्याची प्रचिती हरघडी सर्वांच्या दृष्टीसमोर होत असूनही त्या संबंधानें लोक दुर्लक्ष करितात, अशा विषयीं पुष्कळ दाखले पदोपदीं मनुष्यास विचारांती कळून येतील. कारण प्रत्यहीं आपण घरोघर, मंडळींतून, सभांतून, वादविवाद चालले असतांना पाहतों कीं बहुतेक प्रसंगीं वादग्रस्त विषय बाजूस राहून वादी प्रतिवादींची व्यर्थ बडबड व व्यक्ति विशेषा संबंधानें दुष्ट उद्गार निघूं लागतात आणि अखेरीस 'उखाळ्या पाखाळ्या काढुनी' भांडावें, वर्दळीस यावें मग त्यांनीं, अशांतला प्रकार होतो. तेव्हां आजच्या लेखानें आह्मी मित भाषणाची मातब्बरी लोकांत कळविण्याचा प्रयत्न करणार आहों कांकीं हा विषय पूर्णपणें समजल्यानें विनाकारण होणारे मतभेद, फूट व दूही हीं सामाजिक व राजकीय विचारांतून नाहींशीं होतील अशी आह्मांस उमेद आहे.

या विषयाचे प्रथम दोन भाग केले असतां आपलें काम सोपें होण्या सारखें आहे. प्रथम मनुष्यानें मित भाषणी असावें ह्मणजे कोणता दुर्गुण टाकावा व कोणता दोष होऊं देऊं नये या बद्दल आपण प्रतिबंध घालतों; किंवा निदिध्यास्या विचार करून मित भाषणाचा नियम घालते वेळीं मनुष्याच्या स्वभावासंबंधानें कोणत्या प्रकारचे गुण दिसून आले पाहिजेत अशा विषयीं काय अभिप्राय आहे. त्याचा पहिल्यानें विचार करूं. आणि नंतर मनुष्यानें मितभाषणा निमित्त पुरा मनोनिग्रह केला आहे व तो त्या प्रमाणें वागत असतो हें ओळखण्यास काय काय खुणा पटल्या पाहिजेत याचा दुसऱ्यानें विचार करूं.

भाषणांतील धरबंध नेमस्तपणा या विषयावर लिहितांना त्या धरबंधाच्या अभावीं जे जे दोष आढळतात त्यांत वैरभावामुळें परनिंदा अथवा परोक्ष रीत्या स्वार्थासाठीं असत्य भाषण व खोटी साक्ष अशा गोष्टींचा अंतर्भाव होत नाहीं. कांकीं शेवटील दुर्गुणांनीं भ्रष्ट झालेल्या स्वभावांतील विशिष्ट दुर्गुण हे ज्या त्या दुर्गुणाच्या सदराखालीं मोडले जातात. या ठिकाणीं त्यांचा संबंध नाहीं. आतां हें खरें कीं दुसऱ्यास मोह घालणें, त्याला फसविणें, त्यांशीं विश्वासघात करणें किंवा त्याच्या साठीं अन्यायानें वागणें इत्यादि दुर्गुणांची फलश्रुति होण्यास व त्यांची संचय होण्यास भाषण अनेक प्रकारें साधनीभूत होतें तरी त्या प्रकरणांत वास्तविकपणें भाषणाचा कांहीं एक प्रत्यक्ष संबंध नाहीं. आपला विषय मित भाषणास अपरोधिक जल्पनादि प्रकारा संबंधानें आहे. हा स्वभाव ह्मणजे निव्वळ जल्पना करण्याची हौस. या बोलकेपणाच्या स्वभावांत काय बोलावयाचें आहे काय नाहीं याचा विचार नसतो आणि कोणाचें चांगलें किंवा वाईट करावें असाही मनातला हेतु नसतो. मग हा विषय क्षुल्लक आहे व यास इतकें महत्व देण्याची गरज नाहीं अशी कल्पना कोणी करील तर त्याची चूक होय. कारण आपली जीभ आपल्या ताब्यांत नसल्यामुळें फार वाईट गोष्टी हातून न कळत घडतात व त्यांचे परिणामही अनर्थकारक होतात. कदाचित हें खरें आहे कीं वृथा बोलण्याचा मूर्खपणा ज्यांच्या आंगीं वसतो त्यांनीं शुष्कवाद करण्याचा निश्चय केला किंवा कोणाचा संबंध नाहीं अशा गोष्टी सांगण्यांत कालक्रमणा केली तर त्यापासून फक्त काय तो नको तें करण्याच्या भरीस पडल्याचा दोष त्या मनुष्यावर येईल; परंतु नित्याच्या व्यवहारांतल्या गोष्टी त्यांस एकसारखे सदा सर्वकाळ बोलण्यास पुरेशा होणार नाहींत कांकीं विनाकारण शून्य गोष्टीविषयीं त्यास अक्षयीं बोलण्यास कांहीं एक सुचणार नाहीं. अर्थात् परिपाठांतल्या गप्पांचा खजिना संपल्यावर मग बोलण्याचा ओघ भलतीकडे वाहूं लागतो. नंतर कोणाचा पाणउतारा होईल अशी थट्टामस्करी करावी, एखाद्याच्या अपवादक वाईट चाली बाहेर काढाव्या, गुह्य व नाजुक गोष्टी लोकांसमोर आणाव्या मग त्या स्वतांच्या असोत किंवा दुसऱ्याच्या असोत. कांहीं एक पर्वा करावयाची नाहीं ह्मणजे वाटेल तें बडबडत बसावें परंतु निमूटपणें देवासारखें बसावयाचें नाहीं. आपल्या देखत देखत त्यांचा पहिला बेत बाजूस राहून निराळ्या गोष्टी बोलण्यांत येतात; त्यांना ज्या गोष्टी बोलावयाच्या नसतात त्याही ते बोलून चुकतात. तोंडसुख घेण्या पलीकडे ज्या पासून कांहीं लाभ नाहीं अशा अयोग्य ही गोष्टी त्यांच्या तोंडून निघतात. नुसते बोलत बसलें ह्मणजे कित्येकास आनंद होतो तरी जर कांहींजणास वाटत असेल कीं लोकांनीं त्यांचें बोलणें ऐकावें व त्यांच्या ह्मणण्यास मान द्यावा तर ते लोकांचें लक्ष स्वतां कडे वळविण्या साठीं कांहीं युक्ति लढवितील आणि एखाद्या प्रकरणांतील कांहीं थोडें अर्धवट त्यांस कळलें असलें ह्मणजे ते आपली गोष्ट बरोबर रचावी ह्मणून मनच्याच वाटेल त्या स्थळवेळ व अन्य संबंधी गोष्टी जुळवतील. आणि आपली गप्प दुसऱ्यास खरीशी भासवतील परंतु या सर्व करण्या मध्यें कांहीं काम साधण्याचा बेत नसून निव्वळ लोकांनीं आपणांस बोलतांना ऐकावें हा हेतु असतो. काय तो त्यांचा इरादा हा कीं तुह्मी त्यांच्याकडे बघावें. प्रस्तुत वेळें पुरतें तुमचें अवधान सर्वस्वी त्यांच्याकडे असावें. एवढें झालें ह्मणजे पुरें. त्या नंतर लोक या संबंधानें काय ह्मणतील अशा विषयीं त्यांच्या मनांत खरोखर कांहीं विचार येत नाहीं. आणखी अशा प्रकारचें वृथा बोलणें चाललें असतांना कंटाळा येण्याचा किंवा गैरसमज होण्याचा संभव आहे. तेव्हां मन चाहील तसें ते लोक बरळूं लागले ह्मणजे कधीं कधीं एखाद्याचा त्यांना राग येतो आणि मग चवताळून अमर्यादपणानें त्याच्याशीं शिवीगाळ ही ते करितात. परंतु आरंभीं उभयपक्षा कडील लोकांत हा विकोपाचा प्रकार कोणाच्या ध्यानांत नसतो. अशा वेळीं ही निंदा व उपमर्द करणारी जीभ आटोक्यांत न राहिल्यामुळें व बोलण्याची हौस असल्यामुळें अनर्थ होतो ह्मणून आह्मी त्या संबंधानें लिहित आहों. यत्किंचित् कारण झालें ह्मणजे निरर्थक भाषणांतील मौज नाहींशीं होऊन अद्वातद्वा बोलणें चालतें वरील गोष्टीला प्रवाहाचें साम्य चांगलें जुळतें. प्रवाहाला एक गती असते व त्याप्रमाणें तो चालला असतो परंतु सामान्य वस्तु मध्यें आड आली तर प्रवाहास या किंवा त्या बाजूस थोडेसें वळण मिळतें आणि मग त्या वळणाला अगदीं निराळीच ओढ लागून प्रवाहाची मूळ दिशा सर्व प्रकारें बदलून जाते. किंवा अग्नीचें उदाहरण घ्या. ज्वालाग्राही पदार्थामध्यें अग्नीचा प्रवेश झाला ह्मणजे तो पेट घेऊन आसमंतांत पसरतो व सर्व पदार्थ जाळून राखरांगोळी करितो. हा त्याचा स्वाभाविक धर्म होय. आणि अशा पदार्थांपैकीं एका वस्तूंशीं कोण्या एखाद्या भागाला अग्नीचा संयोग झाला ह्मणजे ज्वाला सर्वत्र भडकण्यास उशीर लागत नाहीं.

वाचाळपणाच्या दोषांचें निरूपण करूं लागलें ह्मणजे त्यांचा स्वतंत्रपणें विचार होत नाहीं. त्यामध्यें अनेक विषयांचा अन्य अंतर्भाव होतो, आणि त्या त्या विषया पासून आपल्या प्रस्तुत शिरोलेखाचा निराळेपणा दाखवितां येणें हेंही पुष्कळ प्रकारें शक्य नाहीं. आपलेपणा या विषयास नाहीं तरी वास्तवीक कारण नसतांना ही या विषया मध्यें नानाविध प्रकरणांचा व्यर्थ समावेश लोक करितात तो बरोबर नाहीं. मनुष्यानें प्रथम एखादा अनाचार किंवा अघोर पापकर्म करण्याचा संकल्प केला तर मनांतला हेतु साध्य होण्या साठीं सर्व उपजत गुण व आंगची प्रत्येक शक्ती या उभयतांचा त्याला दुरुपयोग करण्यास विलंब लागत नाहीं; आणि अशा स्वभावसिद्ध चांगल्या सामग्रीनें स्याच्या पापाचरणाला सर्वोपरीनें व चोहोंकडून पूर्ण भरती येण्यास निराळा प्रयत्न नको. ही गोष्ट मनुष्याच्या वक्तृत्वशक्तीस ही लागू आहे आणि ह्मणून भाषण हें निद्यकर्म करण्यास उत्तम साधन होईल. जर मनुष्याच्या मनांत हाडवैर वाणत असेल आणि सूड उगविण्याचा त्यानें विडा उचलला तर तो जाणून बुजून आपल्या ओळखीच्या गृहस्थाचा सत्यानाश व्हावा ह्मणून सत्याचा अपलाप करील आणि शांतपणानें व विचारानें लोकांमध्यें निव्वळ खोटें बोलण्यास मागें सरणार नाहीं. त्याची जीभ त्याच्या ताब्यांत नाहीं. मनुष्याला या प्रमाणें मिथ्या बोलणें कठीण नाहीं ह्मणून तो खोटी साक्ष देईल तरी हें खरें आहे कीं त्याचा स्वतांच्या जीभेवर पुरा अंमल आहे आणि ती दीर्घ दृष्टी पोचल्या शिवाय व पूर्व संकेत झाल्या शिवाय अगोदर कालत्रयीं लवलवणार नाहीं. प्रस्तुत दाखल्यांत अपराध ह्मटला म्हणजे अन्याय व विश्वासघात होय. ह्या दोघांचा मित भाषण या विषयाशीं कांहीं एक विलक्षण किंवा विशेष प्रकारचा संबंध नाहीं; परंतु मित भाषणावर लिहितांना मुख्यत्वें करून ज्या दुर्गुणाचा उल्लेख करणें भाग आहे तो वाचाळपणा होय. कित्येकांस कांहीं तरी बोलावयाचें ह्मणून बोलण्याची हौस असते; आणि हा बोलकेपणा व्यक्त करितांना मनुष्य काय पाहिजे तें बरें वाईट बडबडतो. वेळेची कर्मणूक होण्याकरितां आणि त्या त्या वेळीं हकी असल त्या गोष्टी विषयीं तो बोलत सुटतो. अशा मनुष्याला ही उत्कंठा असते कीं लोकांचें चित्त आपल्या बोलण्याकडे असावें; आणि या इच्छेच्या तृप्ती साठीं तो लोकांस फार फार आवडेल असें चांगलें वाईट, खरें खोटें बोलण्यास एका पायावर उभा असतो. ही बोलण्याची हौस ज्यांस असते त्या पैकीं कांहीं जणास असें वाटत असतें कीं लोकांनीं आपला मानमरातब ठेवावा व आपणांस मोठें ह्मणावें. ही गोष्ट खरी आहे तरी ती सर्वांशीं पुष्कळ गृहस्थांच्या उदाहरणांत खरी ठरणार नाहीं. कित्येक स्वभावतः फार बोलके असतात. त्याची यत्किंचित ही अवहेलना कोणी केली तर ते त्याबद्दल सूड दुसऱ्या कांहीं तऱ्हेनें घेत नाहींत. अहो वाटेल असें बडकू लागतात. त्यांच्या जिभेला भरधांव गति मिळते व ती अनिवार होऊन सैरावैरा धावूं लागते. इत्यर्थ हा कीं मनुष्यानें बोलतांना आपली जीभ यथायोग्य आवरून ठेविली नाहीं ह्मणजे त्याला न कळत ही त्याच्या पदरीं मूर्खपणा व अनेक दोष येतात.

आणि या अनियंत्रित वाक्चापल्या पासून व स्वैर भाषणापासून असंख्य दुराचरणें घडतात व संसारांत अगणित विघ्नें येतात. ज्याला उद्देशून मनुष्य बोलतो त्याच्या मनांत वैरभाव उद्भवतो. वृथा बोलण्यानें भांडण तंट्याचें बीं पेरलें जातें आणि आपसापसांत अकारण कलह माजतो. अशा बोलणाऱ्याचा लोकांस थोडा बहुत तिटकारा येतो व त्याच्याही हातून अल्पस्वल्प चुका होतात; आणि या दोहोंचें स्वरूप सामान्य असून त्या दोहोंचा विसर ही पडण्या सारखा असतो. परंतु प्रसंगोपात द्रोह व द्वेष या पासून जसे अनर्थ

घडतात तद्वत् बोलण्यांत मर्यादा नसल्यामुळें वाईट प्रसंग येऊन गुजरतात.

(पुढें चालूं.)

---

**वऱ्हाडसमाचार**

मिती चैत्र शुद्ध १४ शके १८१४

---

हिंदुस्थान सरकारचा हुकूम आहे कीं, सरकारी नोकरांनीं राजकीय चळवळींत शिरूं नये. या हुकुमाचा मूळ उगम राष्ट्रीय सभेच्या संस्थेपासून आहे. कायदेशीर व राजनिष्ठपणाच्या राजकीय संस्था लोकांनीं उभारल्या आहेत त्यापासून अगदीं निराळें तिऱ्हाइताप्रमाणें राहण्याचा सरकारचा उद्देश आहे. लोकांनीं राजकीय प्रकरणांविषयीं भवति न भवति करावी आणि त्या वाद-विवादाच्या खळांत सरकारचे दोष जनांच्या नजरेसमोर आणावे हें सरकारास सर्वथैव पसंत असावें हें संभवत नाहीं. राष्ट्रीय सभेसारख्या संस्था बंद करण्या पुरता सरकारला योग्य अधिकार पोंचला असतां तर ही सभा चालली आहे अशीच चालली असती किंवा नाहीं याचा आम्हांस संशय आहे. योग्य अधिकार असता असें ह्मणण्याचें कारण कीं सरकार आपल्या हुकुमानें राष्ट्रीय सभा एका क्षणांत बंद करूं शकेल परंतु अशी मोंगलाई करणें ह्मणजे त्यांच्या इतके दिवसांच्या सुनीतीला हरताळ लावल्या सारखें होईल. आणि लोकमताची पायमल्ली झाल्यानें लोकांचा सरकारवरील विश्वास उडेल व तेणेंकरून राज्यास अनेक विघ्नें येतील. राज्याच्या चिरस्थाईपणाला या बाधक गोष्टी टळाव्या व राष्ट्रीय सभेला महत्व पोंचूं नये ह्मणून सरकार या राष्ट्रीय चळवळीसंबंधानें अगदीं तटस्थ राहिलें इतकेंच नव्हे तर सरकारच्या पदरचे चाकरमाणसें राष्ट्रीय सभेंत असलीं तर कदाचित् सरकारची संमति व अनुकूलता राष्ट्रीय सभेला आहेच असें अडाणी लोक समजतील ह्मणून त्यांनाही राजकीय सभेंत न शिरण्या विषयीं सक्त हुकुम सरकारानें फर्माविले. वरील हुकूमा संबंधानें पुष्कळ ओरड झाल्यावर अशी एक निराळी कोटी निघाली कीं, सरकारी नोकरांनीं राष्ट्रीय सभेला प्रेक्षक ह्मणून जाण्यास हरकत नाहीं. फक्त त्या सभेच्या कामांत त्यांनीं कांहीं अंग असूं देऊं नये. न्याय कोडतांतून सरकार तर्फे वकील वगैरे लोक असतात त्यांजवरही या हुकुमाची अमलबारी व्हावी ह्मणून मुंबईसरकारच्या हाता खालील लिगल रिमेम्ब्रन्सर यांनीं व्यवस्था चालविली आणि त्या संबंधानें मि. ए ओ. ह्यूम साहेबांनीं मुंबई सरकारची कशी खबर घेतली आहे हें मागें आह्मी लिहिलें आहेच. हल्लीं मुंबई सरकारनें गेल्या सहावे तारखेस हिंदुस्थान सरकारचा मुख्य हुकूम घेऊन त्या खालीं सर्व लोकांच्या माहित साठीं तीन नियम नवीन घालून दिले आहेत त्यांचा मतलब येणें प्रमाणें:–

( १ ) ज्या राजकीय सभेला गेल्यानें आपल्या जाण्याचा भलता अर्थ होण्या सारखा आहे आणि त्यामुळें अधिकारी या नात्यानें आपल्या चाकरीला कमीपणा येणार आहे त्या सभेला सामान्यतः कोणीही सरकारी अधिकाऱ्यानें जाऊं नये.

( २ ) राजकीय चळवळींत कोणत्याही प्रकारें अंग सरकारी नोकरांनीं ठेवूं नये किंवा राजकीय धडामोडी करूं नये.

(३)ज्या कोणा सरकारी नोकराला एखाद्या राजकीय प्रकरणा संबंधानें आपल्या स्वातंत्र्या बद्दल संशय येईल त्यानें आपल्या वरिष्ठां कडून आपल्या प्रश्नाची फोड करून घ्यावी.

वरील तिन्ही नियमांचा रोंख अगदीं निराळ्या प्रकारचा आहे. हा मुंबई सरकारचा किंवा इतर प्रांतिक सरकार उचलतील असाही संभव आहे तेव्हां त्या नियमांच्या वास्तविक स्वरूपाशीं लोकांची पक्की ओळख करून दिली पाहिजे.

पहिल्या नियमा प्रमाणें सरकारी नोकरानें आपल्या हजर राहण्यानें लोक काय समजतील या विषयीं खबरदारी घेतली पाहिजे लोकांचा भलता समज झाला तर त्याबद्दल शिक्षा नोकराला देणें ह्मणजे चोराला सोडून संन्याशयाला सुळीं देण्या सारखें आहे. शिवाय अधिकारी नात्याचा दरारा व रुबाब कमी होता कामा नये अशी अट घातल्यानें असा अर्थ निघतो कीं लोकांना त्यांच्या वागण्यावर विरोधी अर्थ बसवितां येईल किंवा नाहीं किंवा सरकारास त्याचें वागणें खपेल किंवा नाहीं हें ठरविण्या सारखें आहे या नियमानें सरकारचा हुकूम मोडल्याचा अपराध शाबीत करणें फार सोपें झालें आहे. सारांश, सरकारी नोकरानें राष्ट्रीय सभेला प्रेक्षक ह्मणून जाऊं नये असें करण्या साठीं हा कोटीक्रम लढविला असेल. दुसरा व तिसरा नियम ठीक आहे. या पहिल्या नियमाचीच व्याप्ती एवढी मोठी झाली आहे कीं सरकार तर्फेच्या वकील वगैरे स्वतंत्र धंदेवाल्यांसही अपरोक्षरीत्या अडचणी आल्या आहेत. अशा वकिलांनें आपल्या इच्छे प्रमाणें वागावें परंतु राजकीय चळवळींत त्यानें एखादा पक्ष उचलून असें महशूर होऊं नये कीं ज्या योगें त्यास सरकारी वकिलीचें काम करण्यास प्रत्यवाय येईल, अगर त्याच्या कामाची विसंगतता दिसेल अगर त्यापासून गैर समज उत्पन्न होईल. या अडचणी अशा खोल व घातुक आहेत कीं सरकार तर्फेच्या शहाण्या वकिलांनीं राष्ट्रीय चळवळींत शिरणें मूर्खपणाचें व धोक्याचें होईल.

मि॰ ह्यूम साहेबांनीं सरकारी वकिलांच्या साठीं केलेल्या खटाटोपीचें व परिश्रमाचें फळ वरील नियमांची कडक दुरुस्ती होय असें वाटतें. मुंबई सरकारचा केवढा हा उदारपणा व दूरदर्शीपणा!

---

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं, मुंबईतील सुप्रसिद्ध ' निर्णयसागर ' छापखान्याचे मालक रा. रा. जावजी दादाजी हे गेल्या मंगळवारीं निवर्तले. नेटिवांत यांच्या तोडीचे बड छापखानेवाले फार थोडे आहेत. छापण्याच्या देशी कलेला यांच्या परिश्रमानें सांप्रतचें उत्तम स्वरूप आलें आहे. मनुष्य आपल्या उद्योगानें व बुद्धिसामर्थ्यानें केवढा धनसंपन्न व लोकमान्य होऊं शकेल याचें उत्कृष्ट उदाहरण रा. जावजींचें चरित्र होय. छापखान्यांतील गड्यामाणसाच्या नोकरी पासून चढत चढत हे 'निर्णयसागर' सारख्या मोठ्या छापखान्यचे मालक बनले हाच त्यांच्या आयुष्यांतील विलक्षणपणा आहे. त्यांच्या मागें त्यांचे चिरंजीव वडिलांची कीर्ति वाढवितील असें आम्ही इच्छितों.

---

संमतिवयाचा कायदा नको ह्मणून आह्मी ह्मणत होतों त्याचीं कारणें–सरकारचा हात सामाजिक गोष्टींत न शिरावा, कायद्या पासून लाभा पेक्षां हानि मोठी होणारी आहे, आणि सर्व हिंदुस्थान राष्ट्र कायद्याचें बिलानें हवालदील झालें होतें त्या चळवळीचा व बालसंभोगाचा उपयोग, निव्वळ बारा वर्षांच्या वयाच्या परिमिती साठीं होऊं नये अशीं तीन होतीं. हा कायदा पसार झाल्यानंतर जे जे खटले त्या अन्वयें झाले त्या वरून हानि व छळ कायद्यानें कसा होतो हें व्यक्त दिसून आलें. सुधारकांचा पक्ष फिका पडला व लोकसमूहा वरील त्यांचें वजन नाहींसें झालें आणि बारा वर्षांच्या क्षुद्र मर्यादेनें समाजाची कांहींच सुधारणा झाली नाहीं. या तिन्ही गोष्टी लोकांच्या प्रत्यन्तरास येऊन चुकल्या आहेत. अकोल्यास परवा संमतावयाचें नाटक झालें त्या वरून त्यांतील भावी स्थितीचा परिणाम लोकास चांगला कळूनही आला. नाटककर्त्यांनीं ज्या थोर गृहस्थाचा या नाटक द्वारा उपहास केला आहे असें लोक समजतात ( आणि समजणेंही चुकीचें नाहीं ) त्या गृहस्थांच्या ठायीं आमची पूज्यबुद्धि आहे आणि त्यांचीं मतें आह्मांस आवडलीं नाहींत तरी त्यांचा अशा प्रकारें उपमर्द व्हावा हें आह्मांस कांडी मात्र पसंत नाहीं.

---

# The Berar Samachar

MONDAY, APRIL 11, 1892

---

Mr. H. B. Grigg C. I. E. Director of Public Instruction in Madras gave an intellectual treat to those gentlemen who assembled at the Convocation of the Madras University on the 1st instant. His address to the newly made graduates left a high water mark of his lofty genius, sound learning and comprehensive experience. His speech is full interesting and instructive. We would request every one of our readers to master it thoroughly. The study will amply repay the labour bestowed upon it. The lecture gives a restrospective history of the University education. It brims with honest advice to those who have entered the high domains of the University learning. One would hardly leave aside the lecture without forming some resolve or other to follow up the lines of study which a well distinguished educationist of the Madras presidency has chalked out for the young and rising graduates of that University. We cannot pretend to do justice to this address of rare eloquence and burning convictions. It is for us to pass it in review within the short and limited space at our disposal with a hope of inviting the reader to the original fountain.

He recalled the names of those fellows who have passed away in the last year. He briefly alluded to the yeoman's work they did in that branch of national life of which the University is the highest exponent. The three first Universities of India came into existence with the Act of Incorporation of 1857. The educational conditions of India were singular in those times and afforded difficulties to admit of the light of the dawn of Western knowledge. It is interesting to read how the battle was won:—

"All decisive changes in the world take place in the intellect. These men saw that the literature of India, beautiful and varied as it was in the earlier periods of its growth, had been reduced to sterility and decay by the idea-strangling and cast-iron systems of control elaborated by commentators and grammarians of a latter age. They saw that the ancient educational systems of the country were powerless to work a change in the Indian peoples towards a higher life, and towards material well-being and they strenuously fought for the introduction of a system of education under which the free thoughts and noble 'jintents of the heart" of the peoples of the West might be conveyed on scientific methods to these Eastern peoples: seeking thus also to re-invigorate and and restore to their proper place in the mind building of the people their ancient poetry, vedic, epic and dramatic, their books of law and the philosophical speculations of their sages."

The ends of the Universities are not to be a center of instruction for all but a center for testing the instruction of all so as to 'give full development to highest course of education to which the Natives of India or of any other country can aspire.' Our Universities are thsu so many examining bodies. Mr. Griggs then expanded his views on the subject of forming an organization of the University through the congregations of old and new members of the colleges affiliated to it. Such a corporation of learned and scientific men will develop new means of acquiring extended knowledge beyond the regular curricula. He laid great stress on the ways in which every graduated student should supplement the course of study he has pursued in the College rooms. In the beginning he anticipated the thorns in their ways in the now stating para:—

"You have laid the foundation in the schools of this University for the school of life. It is but the foundation. I know full well that temptations to a vain spirit are many and peculiar. You have come, many of you, from what you now regard as a ignorant homes and you are surrounded too often by unenlightened relatives and riends, whilst a graduate in Europe would live amongst those whose knowledge and experience of life he cannot for a moment afford to disparage or dispute. But this condition of things is not one which should make you self-complacent. It should rather fill you with the spirit of meekness and of fear—of meekness because your superior knowledge should make you know that after all what you have learnt is but little of the sum of knowledge, and of fear, for you must see that you, even more than the English graduate, have need to supplement that knowledge. If you arrest your development in knowledge, says Sir Henry Maine, conceit and scepticism must be the result, "intellectual cultivation should be constantly progressive."

His words sounded a caution to make friends with the authors which one has studied for his examinations. The higher aim of education is to cultivate the mind so as to live better the lives of rational beings and to drink deeper of the stream of knowledge. His view of education was a wide one and he omitted no branch of it without mentioning the beauties of it. His was an attempt to induce men 'to cultivate every god-given faculty in nature to perfect humanity. But humanity has two sides: One side in the strength and intellect of manhood and the other in the tenderness and faith and submissiveness of womanhood.' He has urgently advised the graduates to share the feast of knowledge with their wives, sisters and daughers. Mr. Griggs' is a strong champion of female education and few have realized the importance of it in the life that opens before them. We quote his noble expressions because they are worth any number of repetitions:—

"Remember if you will not bid them to share that feast with you, if you leave them to stand without, humbled and unsatisfied, you must pay the penalty. The laws of our nature are inexorable. You cannot split humanity in two and expect to attain for yourselves moral and intellectual completeness. That which God has joined together let no man put asunder. No people recognises more fully, I might say more beautifully, than your own, so far as the family is concerned, this truth, the mutual dependance of the sexes,— but as yet you have not recognised this union in knowledge and culture as necessary for your social well-being and moral advance. But so it is. It is a law which science more and more acknowledges. If in man were collected all the excellencies of our many sided nature and women only possessed them in a lower degree something might be said for this view. But it is not so. In woman this aptitude for the perfection of some of the qualities of our natureisstronger and capable of a higher development than our own. To these virtues, the distinctive virtues of womanhood, how much does the world not owe? To the influence of woman is due in no small measure the exercise of those gentler virtues which have become characteristic of the most progressive races on this planet. To woman are they indebted for much of that reasonable spirit of self-sacrifice and obedience which is rendering the social, nay, the political, progress of mankind possible. But assuming that this is not so—that woman is but "undeveloped man" and feebler intellectually and morally. Are you even so acting wisely in not educating her, in not strengthening her intellect, in not substituting principles on which to base right conduct for moral rules of thumb?"

---

We happened a year before to refer to the question of "rendition of Berar." We are in the dark as to the probable result of the issue if it be broached open. The Nizam's Government does not feel itself strong enough to put the question to the Secretary of State through the Resident at Hyderabad. We are hopeful that the change, if it ever occur, will be for the better. Sir Charlesa Dilkie while speaking on Indian politics thus refers to the British administration in comparison with the Native one. From a perusal of his views we can safely bring him to support our happy prospects on the restoration of Berar to the Nizam's dominion. In the midst of his speech he thus proceeds to observe:—

"Considering the ability which is at the service of our Government in India, Sir Charles thought one would be inclined to expect that our own administration would contrast favourably with that of the Native States.

It does, he continued, so far as most of them are concerned for a good reason, which is that most of them are bad. But the best Native States govern their people more successfully than we govern the purely British parts of India It does not mean for one moment to pretend that the Native States could be trusted not to misgovern their people they stood entirely alone. Our presence at their side, our advice, our interference from time to time are essential. But provided we keep them straight in great things, prevent hideous waste of money upon unworthy objects, and gross cruelty, the Native States which enjoy the services of picked native statesmen, trained in our best schools, manage the detail of administration and ensure the comfort of their people better than we can. Mysore is a remarkable example of good Government. We for a long time governed that State ourselves, and it was thought by the enemies of this country that we should never hand it back to native rule We kept our word and we kept our word without drawback to the population. I say without drawback, because, while we govern a Native State, who do not govern it as a portion of our own territory. We keep up separate institutions. We employ natives more uniformly than they are employed under direct British rule. And when Mysore was handed back to native rule there was not that amount of change necessary which there would be it a British province were to be given over to native rule. Mysore was surrendered to native rule in 1881, and surrendered with a debt as well as with a tribute— an annual tribute to ourselves, and an annual payment for a famine loan which we had advanced. Our own officers bear testimony that, "since 1881, the province under native rule has been very rapidly recovering from the effects of the famine." This notion of a Representative Assembly, of which the members are appointed by the State, will strike you as strange. It was the Turkish system, introduced with a panegyric from Mr. Disraeli, you may remember, and much laughed at here. But apparently it is not unsuited to the circumstances of India, for our own Government has both practised it and has improved on it, and invented a plan in some parts of British India for electing municipalities by voters who themselves are first chosen by Government."

---

## वऱ्हाड.

येथें 'श्रीदत्त प्रसाद स्त्री संगीत नाटक' कार मंडळी आली आहे. तिनें परवा रात्रीं संमतीवयाच्या कायद्याच्या दुष्परिणामदर्शक नाटकाचा पहिला खेळ करून दाखविला. 'स्त्री शिक्षण नाटिका' कर्ते रा. रा. नारायण बापूजी कानिटकर यांनीं हें नाटक रचलें आहे. ह्याचे प्रयोग आजवर पुणें, मुंबई वगैरे ठिकाणीं चालू आहेतच. हा खेळ अकोल्यास प्रथम झाला. नाटकांतील पात्रांनीं आपापलीं कामें बरीं बजावलीं. त्यांत गणपतराव व सरस्वती बाई या जोडप्याचें काम प्रेक्षणीय होतें. सदर्हु प्रमाणें पार्शी शेट, शास्त्री बुवा, बापूराव, श्रीवत्सा विदूषक आदिकरून स्त्रीवर्ग वगैरेंचीं कामें चांगलीं झालीं. नन्नठप कळल्या नंतरचा गणपतराव व सरस्वती बाई यांचा संवाद व हावभाव हे फार हृदयद्रावक वाटले. प्रेक्षकसमूह मोठा जमला होता.

रा. रा. यशवंत महादेव, तहशीलदार चिखली, हे तीन महिन्याच्या हक्काच्या रजेवर वसईस स्वगृहीं गेले आहेत व त्यांच्या रजेंत चिखलींचेच नायब तहशीलदार मि. सय्यद फरीक् हुसेन यांस आक्टिंग तहशीलदार नेमलें.

रा. रा. कृष्णाजी मल्हार हेडमास्तर, इंग्लिश मराठी शाळा, मलकापूर, यांस सरकारतर्फे मलकापूर तालुका बोर्डाचे सभासद नेमले आहे.

रा. रा. विष्णु हरी, तहशीलदार मलकापूर, यांस बुलढाणा जिल्हा बोर्डाचे सभासद नेमलें.

मि. इ. मार्शल. ए. अ. कमिशनर यांची मेहेकरास बदली झाल्यामुळें मि. हैदरअली अटेंची यांस बुलढाणा जिल्ह्याचे डि. रजिस्टर नेमलें.

मि. आर. ऑबर्ड इंडियन सिव्हिल सरव्हंट आणि ऑफिशिएटिंग ज्युडीशियल कमिशनर वऱ्हाड यांस पुढील महिन्याचे पहिले तारखे पासून सहा महिन्यांची फर्लो रजा देण्यांत आली आहे.

खामगांव म्युनिसिपाल्टींतील तीन सभासद रा. रा. शंकरराव रामचंद्र, अनंत परशराम, व मुलतानचंद मोतीराम यांची मुनिसिपल कायद्यान्वयें मुदत संपून त्यांच्या जागीं लोकांनीं तीन नवीन सभासद निवडले ते रा. रा. अनंत परशराम, मुलतानचंद मोतीराम, केशव घनश्याम हे होत.

रा. रा. विठ्ठल सदाशिव करकरे शिरस्तेदार—एक्स्ट्रा अ० कमिशनर दर्यापूर यांस तीन महिन्यांची रजा मिळाली.

वऱ्हाड प्रांतांतील वकिलीच्या वार्षिक परीक्षेस ता. ५ सप्टेंबर रोजीं उमरावतीस ज्यूडिशिअल कमिशनरच्या कचेरींत सकाळीं ११ वाजतां सुरवात होईल. या परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांनीं आपले अर्ज परीक्षेच्या नियमांत सांगितल्या प्रमाणें सर्टिफिकिट व फीयां सहित ता. १ जून रोजीं किंवा त्या पूर्वी ज्यूडिशिअल कमिशनर बहादूर यांजकडे रवाना करावे.

रा. रा. सदाशिव भास्कर यांनीं गुदस्त सालच्या आगस्टच्या १३ वे तारखे पासून पेन्शन घेतल्या मुळें त्यांचे वर्गाविर्गीत रा. रा. बाळकृष्ण बलवंत सुळे तहशिलदार वणी यांची चवथे वर्ग तहशिलदारी वरून तिसरे वर्ग तहशिलदारीवर बढती करण्यांत आली आणि रा. रा. नारायण केशव आ० तह० मलकापूर यांस तहशिलदार वर्ग चारच्या प्रोबेशनवर नेमिलें आहे.

उमरावती डेपुटी कमिशनरचे हेडक्लार्कचे खाली झालेल्या २०० रुपये पगाराच्या जागेवर मि० माडफी यांची नेमणूक न होतां जुडिशिअल कमिशनर आफिसांतील क्लार्क मि० थाय यांस १७५ रुपये पगारावर नेमलें व त्यांच्या १२० च्या जागेवर तेथील डेपुटी कचेरींतील क्लार्क मि० मारोती मोहनराव यांस १०० रुपयावर नेमलें.

रा० रा० बळवंतराव कावळे ज्युडिशिअल कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट यांनीं तीन महिन्यांची रजा घेतल्या वरून त्यांचे जागी येथील डेपुटी कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट मि० फिलिप थोरीस यांस नेमलें.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतें तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टिफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टांस अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें

दि. कि. क्लास १९ मिसल नंबर ४/१८९२

स्पे० अ० कमिशनर साहेब जि० अकोलें यांचे कोर्टांत.

नांव बुडन बापाचे नांव कलंदर बेग राहणार अकोला तालुके व जिल्हे अकोला यांस मयतः—

कलंदरबेग बापाचें नांव महमदरजा बेग राहणार अकोला ता० अकोला जि० अकोला यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठी सर्टिफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं ता० २३ माहे एप्रील सन १८९२ इ० रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल. त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ८ माहे एप्रील सन १८९२ इ०

V. N. DANDEKAR.

शिक्का सिव्हील ज्यडज्य.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टिफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें

दि. कि. क्लास १९ मिसल नंबर ९/१८९२

स्पे० अ० कमिशनर साहेब जि० अकोलें यांचे कोर्टांत

नांव ज्यानकीदास गंगाधर मारवाडी राहणार अकोला अ० पा० करणार इष्टमित्र लक्ष्मीचंद जैनारायण राहणार खामगांव तालुके खामगांव जि० अकोला यांस मयतः·

गंगाधर बापाचें नांव जोरावरमल राहणार अकोला तालुके अकोला जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टिफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याजकरितां सदरहू मयत मनुष्यांचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं ता० २३ माहे एप्रील सन १८९२ इ० रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल. त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ८ माहे एप्रील सन १८९२ इ०

V N. DANDEKAR.

शिक्का सिव्हील ज्यडज्य.

---

## वर्तमानसार.

अमेरिकेंत स्त्री शिक्षण इतकें वाढलें आहे कीं विद्येच्या कामांत अमेरिकेंतल्या स्त्रिया लवकरच पुरुषांस मागें टाकतील. मुलगे ज्या ज्या वर्गांत शाळा सोडतात त्या वयाच्या पुढें गेलेल्या मुली अभ्यास करीतच असतात. अमेरिकेंतल्या बहुतेक सभा वगैरे स्त्रियांनीच भरल्या गेल्या आहेत व कांहीं दिवसांनीं त्या शिकलेल्या स्त्रियांचें त्यांच्या होणाऱ्या भावी शेतकरी नवऱ्यांशीं कसें जमेल याची काळजी आहे असें तिकडच्या पत्रांचें ह्मणणें येऊं लागलें आहे. खरें पाहिलें तर यांत कांहीं वावगें दिसत नाहीं. पुरुषांपेक्षां त्या जास्त शहाण्या झाल्यावर फार झालें तर हल्लीं जें नवरा बायकोचें नातें आहे तें उलट होईल आणि राज्यसत्ता हल्लीं जी पुरुषांच्या हातांत आहे ती स्त्रियांच्या हातांत जाईल. आमच्या जुन्या कथांत स्त्री राज्याचीं वर्णनें आहेत, पण आज जें तसें स्त्रीराज्य कोठें दिसत नाहीं तें उद्यां दिसूं लागेल. ह्मणजे नष्ट झालेल्या गोष्टी पुन्हां जगापुढें येतील. हल्लीं नवऱ्यांचा वरपगडा आहे पुढें बायकांचा होईल.

बडोद्यास आणलेलें नळाचें पाणी चालूं करण्यांत आलें या कामास ३० लाख रुपये खर्च झाला. काम करणार इंजीनर जगन्नाथजी यांस चांगलें काम केल्याबद्दल हिऱ्याची आंगठी इनाम दिली.

बुधवारीं मंडाले शहरास आग लागून तीन मैल पर्यंतचा शहराचा भाग जळाला. युरोपियन वखारी व युरोपियन बाजार बचावला.

लॉर्ड राबर्ट हे नेपाळी फौजेची तपासणी करून परत आले. नेपाळ सरकाराकडून त्यांचा थाटमाट उत्तम प्रकारचा झाला रीतीप्रमाणें सतरा तोफांची सलामी दिली. २३ व्या तारखेस खाटमांडू येथें कवाइतीकरितां तयार केलेल्या जाग्यांत नेपाळच्या १८ हजार फौजेची व कित्येक तोफांची अशी उत्तम कवाईत झाली. शिपायांचे पोषाख, त्यांचें शिक्षण, व्यवस्था वगैरे पाहून लॉर्ड हे फार खुष झाले. आणि एकंदरीनें नेपाळी फौजेची फार उत्तम प्रकारची तयारी आहे अशी त्यांची समजूत झाली. नेपाळचे राज्याधिकारी हे हल्लीं अल्पवयी आहेत, व काम करणारे महाराज वीर समशेरजंग हे असून त्याचे कमांडर इन् चीफ देव समशेर हे आहेत; चंद्रसमशेर व भीमसमशेर हे दोन बडे लष्करी कामदार आहेत. लॉर्ड यांचें या सर्वांशीं आगतस्वागत झालें, आणि ता. २४ रोजीं हनमानढोका येथील राजवाड्यांत लॉर्ड यांच्या सन्मानार्थ एक बडा दरबार झाला.

ता. २९ रोजीं प्रोम शहरास आग लागून चवथा हिस्सा जळाला. नुकसान पांच लाखांचें झालें.

विलायतच्या पार्लमेन्टची नवी निवड येत्या जून किंवा जुलईंत होणार.

मणिपूर असाम रस्ता बहुतके तयार झाला. जागोजागचे मोठाले खडक फोडण्याकरतां २२,००० पौंड डिनामिट नावाचीं काडतुसें खर्च झालीं. ठिकठिकाणच्या नद्या, नाल्यांवर लाकडी पूल केले आहेत. कुकी नदीवरील पूल ३०० फुटांचा आहे.

काबूलच्या आमिराच्या फौजेनें काफरिस्थानांतल्या लोकांवर जय मिळवून अस्मार यास कैद केलें.

कडक शिक्षा–चीनांत मांगोलिया येथें जो बंडावा झाला तो शांत करण्याकरितां बंडखोर अशा आठ हजार लोकांस जीवंत जाळलें; तसेंच इम्पेरियल पक्षाचे आठशें मारले व पांचशें जाळले असें विलायतच्या तारेवरून समजतें!

चीन व ब्रह्मदेश यांच्या दरम्यानची हद्द कायम करण्या करितां एक स्पेशल कमिशन नेमण्याचें ठरलें असें सांगतात. ही सरहद्द एकदां कायम करून टाकावी असें चीन सरकारचें फार दिवसांपासूनचें ह्मणणें होतें. ठा. अ.

बर्फाची शक्ति–दोन इंच जाडीचें बर्फ असल्यास त्यावर मनुष्य उभा राहिला तरी तें फुटत नाहीं; चार इंच जाडीचें असल्यास घोडेस्वार उभा राहिला तरी फुटत नाहीं; सहा इंच जाडीचे असल्यास कित्येक जनावरें उभीं राहिलीं तरी फुटत नाहीं; दहा इंच जाडीचे असल्यास प्रत्येक चौरस फुटावर एक हजार पौंड वजन रहातें. काम०

इटलीमध्यें व्हेनिस शहरांत उत्तम प्रकारची कांच होते अशी ख्याति आहे. तेथील एक कारखानदार कांचेचें कापड बनवून त्यापासून बायकांच्या टोप्या करूं लागला आहे. ह्या विलक्षण कापडास रेशमाच्या कपड्यासारखी चकाकी व तेज असतें, आणि अर्थातच तें पाणी घेत नाहीं. ह्या कापडाच्या हजारों टोप्या खपत आहेत, असें समजतें.

चालूं सालच्या, मे महिन्या पासून दारूवर जकात जास्त बसणार ह्मणून आतांच अतिशय माल हिंदुस्थानास पाठविण्या करितां विलायतेहून रवाना होत आहे.

रा. रा. बाळ गंगाधर टीळक यांनीं डेक्कन कांग्रेस कमेटीच्या संबंधाच्या आपल्या कामाचा राजीनामा दिला.

युनायटेड स्टेटस् येथील मिसैरी संस्थानांत एका मनुष्यानें कृत्रीम अंडे करण्याचा कारखाना काढला आहे त्यांत बाटाणें, दूध, चरबी गंधक, चुना; पाणी व जनावरचें रक्त हीं मुख्य द्रव्यें असतात. तीं निरनिराळ्या प्रमाणांनीं मिळवून रसायनक्रियेच्या योगें तीं अंडे बनवितो. तीं खऱ्या अंड्यांसारखीं हुबेहुब दिसतात. शिजविलीं असतां त्यांसारखाच त्यांचा रंग बदलतो; आणि खाण्यांतही दोहोंमध्यें फारसा फरक दिसून येत नाहीं. तेव्हां येथपर्यंत कृतीची मजल पोंचली, परंतु स्वाभाविक अंड्याची बरोबरी करण्या करितां त्यांत जीव आला पाहिजे. तो आणण्याची शक्ति मनुष्याच्या हातीं येईल काय!

मेंढराच्या लोकरी पासून एक तेलकट पदार्थ करितात त्यांस लानोलिन ह्मणतात. ह्या लानोलिनाचा गुण आहे कीं, तें अंगाच्या कातडीस लावलें असतां कातडीस सुरकुत्या पडल्या असल्या तरी त्या जाऊन तकतकी येते. ह्मणून हा जिन्नस बायकांस फार प्रिय झाला आहे असें एक इंग्रजी पत्रकार ह्मणतो. यावरून पाहातां कृतांतकटकामल ध्वजजरा ज्या पुरुषांच्या मुखावर दिसून येते त्यास जसा कलपाचा खप असतो तसा वार्धक्यांत सांपडलेल्या स्त्रियांच्या चट्टीपट्टीच्या सामग्रींत ह्या लानोलिनची गरज पडणार. या वस्तूच्या उपयोगानें ज्या स्त्रीपुरुषांस आपलें ह्मातारपण कांहीं दिवस तरी लपवून ठेवावेसें वाटतें तरी कांहीं दिवस तरी बाहेरून ज्वानीचा देखावा दाखवूं शकतील, यांत संशय नाहीं. परंतु अंदरका तो राम ज्याने हें आहेच. सु० प०

नेपाळच्या फौजेवर नजर टाकण्या करितां हिंदुस्थानचे कमांडर इंचीफ लॉर्ड रॉबर्ट हे गेल्या २३ व्या तारखेस खाटमांडू येथें गेले होते. हिंदुस्थानच्या सरहद्दीचे संबंधानें नेपाळावर आमचे सरकारची मोठी भिस्त असल्यामुळेंच सेनाधिपति साहेब मुद्दाम उठून नेपाळची फौज पाहण्यास गेले असावे. तेथील परेडीची जागा १८,००० फौज मावण्या एवढी असून तोफखान्याची वगैरे मांडणी फार व्यवस्थेनें केलेली आहे. जन० राबर्ट साहेबांनीं नेपाळी फौज व तिची तयारी पाहून आपण खुष झालों असें तेथील महाराजांस व सेनाधिपतीस कळविलें. नेपाळी फौजेंत बेंडबाजाचा कारखाना फार मोठा आहे. ५०० लोक त्या कामाकडे आहेत नेपाळी लोकांस वाद्नाचा फार हव्यास आहे. नेपाळचे महाराजांनीं आपल्या सैनिक गणां सह राबर्ट साहेबांची रेसिडेन्सी बंगल्यांत भेट घेतली; व ता० २४ रोजीं त्यांच्या सन्मानार्थ मोठा दरबार भरविला होता.

सत्यशोधक.

भूम्युदरस्थ द्रव्य प्राप्ति–श्री० पंतप्रतिनिधि संस्थान आउंध यांचे पागेंत भूम्युदरस्थ द्रव्याचा एक हांडा सांपडला त्यांत ४० हजार रुपये मिळालें संस्थानच्या कर्जाच्या फेडीस हें द्रव्य अनायासें उपयोगी पडेल.

सरकारी छापखान्यांस मदत– घरफाल्याची एकंदर बिलें बंगाल्यांतील कमेट्यांनीं सरकारी छापखान्यांतून छापून घ्यावीं असें एक सर्क्युलर बंगालच्या ले. गव्हनरांनीं काढलें आहे. असल्या गैरशिस्त हुकमांनीं नफा थोडाच होतो, पण सरकारच्या वर्तनास धुवून न जाणारा असा डाग मात्र लागतो.

महत्वाचा ठराव– जी हिंदु विधवा परधर्मी मनुष्या बरोबर पुनर्विवाह करील तिचा मागल्या नवऱ्याच्या जिनगीवर हक्क नाहीं असा कलकत्ता हायकोर्टाच्या फुलबेंचानें नुकताच एका खटल्यांत ठराव केला आहे.

जंगी कुत्रा– अमेरिकेंतील एका श्रीमान गृहस्थानें ७५०० रुपयांस एक कुत्रा विकत घेतला आहे. त्याची उंची ३६ इंच असून वजन २४९ पौंड आहे.

सक्त सर्क्युलर– न्यायखात्यांतील कामगारांना फुरसत नाहीं ह्मणून खटला कधींही लांबणीवर टाकूं नये- दिवस मावळला तर दिवे लाऊन खटल्याचें काम पुरें करावें असें बंगाल सरकारनें एक झणझणीत सर्क्युलर काढिलें आहे. असें सर्क्युलर मुंबई सरकार काढीलतर बरें.

मनुष्यानें श्वासोश्वास बंद केला असतां गांधीलमाशा मधमाशा यांच्या दंशा पासून कांहीं एक इजा होत नाहीं असें एका डाक्टरानें शोधून काढलें आहे उपाय सोपा आहे.

शुभसूचक.

अरिस्टॉटलचें ह्मणणें असें आहे कीं घोडे, बैल, मेंढेबकरीं, कुत्रीं, मांजरें वगैरे बहुतेक चतुष्पाद प्राण्यांस स्वप्नें पडतात. "मनुष्याची वंशोत्पत्ति" या नांवाच्या ग्रंथांत डार्विन साहेबांचें ह्मणणें आहे कीं, पशुपक्ष्यांत जेवढे ह्मणून वरिष्ट वर्गांतले प्राणी आहेत ते वढे सगळे स्वप्नसुखाचा अनुभव घेणारे असले पाहिजेत.

त्याचप्रमाणें पक्ष्यांस लहरी–मूर्च्छा वगैरे येतात, हें अनुभवसिद्ध आहे असें ह्मणतात तथापि येवढी गोष्ट आपर्दी सिद्ध ह्मणून धरण्यास कांहीं हरकत नाहीं कीं मनुष्याप्रमाणेंच इतर सर्व प्राण्यांस स्वप्नें पडतात.

वसईस एक देवमासा कांठावर मरून येऊन पडला आहे त्याची लांबी तीस हात व रुंदी व उंची सुमारें आठ दहा हात आहे. त्याच्या पोटांत कांहीं माल मिळाला नाहीं. कित्येक देवभोळ्या लोकांनीं त्यास धूप दीप दाखवून त्याची पुजा करून प्रदक्षणा घातल्या.

जपानांत असणाऱ्या एका अजब घड्याळाचें वर्णन दिलें आहे. या घड्याळाचें घर तीन फूट रुंद व पांच फूट लांब आहे व त्याची आकृति फारच सुंदर असून त्यावर भरदोनप्रहरी दिसणाऱ्या देखाव्यांनीं सुशोभित केलेली आहे. पुढच्या बाजूस द्राक्षें, अंजीर वगैरेंच्या सुंदर सुंदर वेली दाखविल्या आहेत पलीकडे लांब एक चढत चढत गेलेली टेंकडी दाखविली आहे त्या टेंकडी वरून एक ओहळ फारच मजेदार तऱ्हेनें वाहते असें दिसतें. अर्थात् त्यांत बिल्लोराची योजना केलेली आहे. हा ओहोळ दऱ्या, खोरीं, खडक, बेटें इत्यादिकांना वळसे घालीत नागमोडीनें वहात वहात लांब एका रानांत शिरला आहे असा देखावा आहे. वर कृत्रिम आकाश केलेलें असून त्यांत एक सुवर्णसूर्य दऱ्याच्या तारेंतून सावकाश हिंडतो व निरनिराळ्या तासाच्या वेळीं सभोंवार टांगलेल्या घंटावर आदळून ठोके वाजवितो. घड्याळ्याच्या तबकडीवर आंकडे आहेत परंतु कांटे नाहींत. कांट्यांच्या ऐवजीं एक सरकत सरकत पुढें जाणारें कांसव आहे तें तास व तासांचे भाग दाखवितें एक एक तास संपतांच एक सुंदर पिसाऱ्याचा पक्षी पुढें येऊन सुस्वर शब्द काढतो. आणि त्याचें गायन संपतांच एक उंदीर जवळच्या एका बिळांतून निघून टेंकडीवरून इकडे तिकडे हिंडून खालच्या उपवनांत येऊन कोठें तरी नाहींसा होतो! काय अजब घड्याळ हें! क. शु.

'ब्रांबे ग्याझेट' पत्राचे कर्ते राजद्रोहाचें बीजारोपण करण्यांत कसे निपुण आहेत हें मि० ह्यूम साहेबांच्या सर्क्युलरावरील अभिप्रायावरून कळून येईल.– "या उन्मादक लेखाच्या संबंधानें सरकारानें काय केलें पाहिजे हें आह्मी सांगावें असें नाहीं. त्यांचे मसलत देणार त्यांना आहेतच. बंगवासीं खटल्यामध्यें कायद्यानें जें स्वरूप व्यक्त केलें आहे तें लक्षांत आणल्यावर सरकाराला सला देण्यास त्यांना अवघड पडणार नाहीं. आज आमचें एवढेंच कर्तव्य कर्म आहे असें आह्मी समजतों कीं, आतां पर्यंत राष्ट्रीय सभेच्या संस्थेंत ज्यांचे अंग आहे अशा लक्षावधी इमानी, विचारी आणि कायद्यास मान देणाऱ्या लोकांनीं ह्यूम साहेबाचा ह्या सभेशीं असलेला सर्व संबंध नाहींसा होईपर्यंत त्या सभे पासून दूर रहावें. खुद्द राष्ट्रीय सभेच्या हिताकरितांच आह्मी आजपर्यंत अनेकवेळां ही सूचना केली आहे; आणि हे अलिकडचे कागद पाहून सुद्धां ह्यूम हा नायक आतां एक दिवस देखील टिकूं देणें वाजवी नाहीं असें ज्यांना वाटत नाहीं तें खरोखर आंधळे असले पाहिजेत."

☞ हें पत्र आकोलें येथें कें० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१२
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास ................... ०।४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०।१

Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..............................4as

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOXXVI | AKOLA MONDAY 18 APRIL 1892 | NO 15

वर्ष २६ | सोमवार तारीख १८ माहे एप्रील सन १८९२ इ० | अंक १५

## पत्रव्यवहार

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मताला मिळून असतोलच असें समजूं नये

वाशिम तारीख ११।४।९२

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष साल मजकूर सारखा उन्हाळा इकडे बहुत दिवसांत झाल्याचें आठवत नाहीं. तापानें तर लोकांचा पिच्छा पुरविला आहे महागाई अतिशय होत चालली आहे. गेल्या साला पेक्षां धान्याचे भाव बहुतेक दिडी दुपटीनें झाले आहेत. पुढें दशा कशी होणार कळत नाहीं. गरिबांचा काळ कठीण आहे. सरकारानें दुष्काळा करितां राखून ठेवलेल्या आकोला इंमोली रेल्वेचे कामास सुरवात करण्याचा विचार करण्यासारखी महागाई झाली आहे. व रेल्वे करण्यामध्यें सरकारचें नुकसानही व्हावयाचें नाहीं. असें असतां ह्या कामीं सरकार मागें पाय कां घेतें कोण जाणें?

श्री बाला साहेबाचे मंदिराचे बाहेर चांगला विस्तीर्ण असा तलाव आहे. याचे सारखा तलाव मला वाटतें वऱ्हाड प्रांतांत तर काय परंतु दुसरे इतर प्रांतांतही असेल असें ह्मणवत नाहीं. ह्या तळावांत कोणीं वस्त्रें धुऊं नये अगर स्नान करूं नये असा नेहमीं प्रतिबंध असतो. हा तलाव म्युनिसिपालिटीचे हद्दींत असल्यामुळें त्यावर ताबा म्युनिसिपालिटीचाच आहे. साल मजकुरी पाण्याची कमताई होत चालली आहे. यामुळें लोकांना अती त्रास होतो धुण्यास पाणी नाहीं असें पाहून सदय अंतःकरणानें म्युनिसिपालिटीनें ह्या तलावाचें पाणी घेण्यास लोकांना परवानगी दिली आहे. हल्लीं शेंकडों मनुष्यें त्यांत धुतात कित्येक स्नान करितात. हा देखावा फारच सुंदर दिसतो. ह्या पाण्याला दुर्गंधी सुटण्याची भीति आहे कारण त्यांत वाईट घाणेरडी वस्त्रें लोक धुतात. व पाणी वाहात नसल्यामुळें नासून जाऊन रोग उत्पन्न होण्याची भीती आहे. करितां तसें तर न व्हावें व लोकांना फायदा तर मिळावा या विषयीं म्युनिसिपालिटीनें खबरदारी ठेवावी हें बरें.

येथील क्लार्क ऑफ धी कोर्ट मिस्तर गणेश गोपाळ दहिगांवकर यांची बदली उमरावतीस झाल्याची वार्ता गांवभर पसरली आहे व तेणेंकरून त्यांचे मित्र मंडळीस व त्यांच्या कारकिर्दींत अन्यास लागलेल्या लोकांस वाईट वाटत आहे. परंतु बाबानो. ही नुसती वार्ता आहे. इतक्यांतच वियोग जन्य भावी दुःखांत पडूं नका. यांचा स्वभाव मन मिळाऊ असल्यामुळें लोकांत अगदीं मिसळून गेले आहेत सत्रा अठरा वर्षांपासून ह्मणजे ता. १।६।७४ इसवी पासून उमेदवारीच्या दर्ज्या पासून हे वाढलेले असल्यामुळें व हरएक काम करण्याची त्यांस हौस असल्यामुळें सर्व कामें त्यांस अवगत झालीं आहेत. अनुभवाच्या बाबतींत यांचा हात कोणी धरील असें नाहीं. उमेदवारी पासून ह्या पदास चढणें ही सामान्य मनुष्याची गोष्ठ नव्हे. ह्या कामास बुद्धीमत्ता, आज्ञाधारकपणा, काम करण्यांत तत्परता शिवाय वरिष्टांची मर्जी संपादन करण्याची शैली ह्या सर्व गोष्टी अंगीं असल्या शिवाय मोठें पद मिळणें कठीण. ह्या सर्व बाबतींत मि. गणपतराव वाकवगार असल्या मुळें त्यांना हे दिवस प्राप्त झाले. नाहीं तर एखादा ग्रेज्युएट होतो. परंतु त्याच्या मध्यें ह्या गोष्टी नसल्यामुळें मिळलेली जागा ही त्याच्यानें संभाळवली जात नाहीं तर काय करितां त्याच्या विद्वत्तेला!

मेहेरबान सिव्हिलसर्जन साहेब यांची स्वारी उमरखेडाकडे तपासणी करितां गेली होती ती परत आली. मे० डे० ए० इंस्पेक्टर साहेब यांची स्वारी नूतन पाणीग्रहण केलेल्या पत्नीसह दौऱ्यावरून परत आली. मे. डे. कमिशनर साहेब बहादूर यांची स्वारी एक दोन दिवसांत दौऱ्यावरून परत येणार असें ह्मणतात. मे० हिंदुस्थानी डे. ए. इनस्पेक्टर साहेब यांची स्वारी नुकतीच येथील हिंदुस्थानी शाळेचे परीक्षे करितां आली होती परीक्षा घेऊन स्वारी बुलठाणें जिल्ह्यांत गेली. सर्व वऱ्हाड प्रांतांस एकच हिंदुस्थानी इन्स्पे० असल्यामुळें त्याला फिरण्याचा अगदीं त्रास होतो. व मार्च महिना अखेर इन्स्पे०चें काम संपलें पाहिजे. परंतु मार्च महिना जाऊन वाशिम जिल्ह्यालाच एप्रिल महिना आला तर बुलठाणें जिल्हा होईपर्यंत एप्रील जाऊन मे ही येईल. मार्च अखेर वार्षिक तक्ते जावयाचे असतात. परंतु ज्या हिंदुस्थानी मास्तरांच्या परीक्षा त्या मुदतींत होत नाहींत. त्यांनीं तक्ते भरावे, तरी कसे, ह्या अडचणी मनांत आणून व एका मनुष्याला फिरण्याला किती कठीण पडतें याचा विचार करून मे० डाय० साहेब बहादूर हे या बाबतींत कांहीं व्यवस्था करून एक हिंदुस्थानी सब डे० ए० इन्स्पे० नेमतील तर आमचे हल्लींचे हिंदुस्थानी डे. ए. इ. ची त्रेधा उडणार नाहीं.

मि० सायंनादी करून ज्या पोलीस कामदारांवर अकोल्यास सेसन कोर्टांत मुकद्दमा चालू होता ते दोषमुक्त ठरले. व त्यांना नोकरीवर कायम केलें. ससपनशनच्या मुदतीचा पगार मिळून ती मुदत पेनशनास लागु केली. हे गृहस्थ नोकरीवर रुजूं झाले यामुळें मोठा आनंद झाला. आलेलें संकट टळलें. पुढें ह्या लोकांनीं चांगली खबरदारी ठेवून पोलिसची नोकरी सुळावरली पोळी असें समजून त्या प्रमाणें बचावानें चालावें.

हल्लीं येथें कोर्टें कचेऱ्या सकाळीं ६॥ वाजल्या पासून भरूं लागल्या आहेत. कारण उन्हाळा कडक आहे परंतु कित्येक ठिकाणीं नऊ वाजल्या पुढें व कित्येक साडेसाहा वाजल्या पुढें असें असल्यामुळें पक्षकारांची मोठी दाणादाण होते. याचा सदय अंतःकरणानें विचार करून सर्वांनीं साडेसहा वाजल्या पासून कोर्टें करावें हें चांगलें. कोर्टें लोकांकरितां आहेत व्यक्तींच्या सोयी अगर गैरसोयी करितां नाहींत असें सर्वांनीं समजावें दयाळू ईश्वरी आहे. तो करीत जावी. कळावे हे विनंती.

आपला
"क्ष"

## एक देशी संस्थान.

( लिहून आलेला मजकूर. )

मागील महिन्याच्या अखेरीस व चालूं महिन्याच्या आरंभीं थोड्या दिवसांच्या अंतरानें मुंबई व बडोदें ह्या दोन शहरीं नवीन पाणी सुरूं करण्याचे जे समारंभ झाले ते तेथील लोकांच्या हृदयपटलावर पुष्कळ वर्षें पर्यंत कायम रहातील. कारण बडोदें शहराला पाण्याचें इतकें दुर्भिक्ष्य होतें कीं, त्या शहरचे लोकांचे आरोग्याला मोठा धक्का बसला होता, हवा सदोदित खराब असे व बाहेरील मनुष्यास ह्या शहरची हवा बाधावयाचीच असा ठराव होऊन गेला होता. त्याच प्रमाणें मुंबई शहराची लोक संख्या वाढत्या प्रमाणावर असल्या कारणानें सांप्रतचा पाण्याचा पुरवठा अपुरा होण्यास फार अवधी न लागता. तेव्हां हल्लीं आहे त्याच्या पेक्षां तिप्पट संख्या जरी वाढली तरी पाण्या संबंधानें तरी तेथील लोकांस निष्काळजी रहातां येणार आहे. खुद्द श्री. सयाजीराव गायकवाड व राणी सरकारांचे हिंदुस्थानचे प्रतिनिधि ह्यां दोघां कडून हे समारंभ साजरे झाल्या कारणानें त्यांस विशेष महत्व येणे साहजिकच आहे. श्री. सयाजीराव बडोद्याचे मालक व आमचे व्हाइसराय सर्व हिंदुस्थानचे चालक आहेत.

इंग्रजी पद्धती प्रमाणें आपल्या धन्याचे अथवा अधिकाऱ्याचे आपल्या संबंधानें काय विचार आहेत, त्याची कारकीर्द आपल्याला कितपत हितावह होणार आहे इत्यादि गोष्टींचीं विवेचनें करण्यास, त्यांचे अशा समारंभाच्या वेळचे उद्गार फार उपयोगी पडतात. लाट साहेबांचें भाषण साधारण समारंभास अनुसरूनच होतें व सांप्रदाया प्रमाणें उडवा उडवीचा प्रकार त्यांत विशेष होता. परंतु श्रीमंत सयाजीरावांचे भाषणाचा झोंक बरीक कांहीं वेगळ्या तऱ्हेचा होता. इतर गोष्टी प्रमाणें भाषणांत इंग्रजी कावपाची पद्धत त्यांनीं स्वीकारिली नाहीं ह्या बद्दल ते स्तुतीसपात्र आहेत. इंग्रज सरकारच्या अमलाखालीं रहाणाऱ्या लोकांचा सर्व साधारण असा समज झालेला दिसतो कीं, आपल्या पेक्षां संस्थानिकांच्या अंमलांत राहणारे लोक दुःखी असले पाहिजेत. परंतु ह्मैसूरकर व बडोदेकर तरी आमच्या पेक्षां पुष्कळ पटीनें चांगल्या स्थितींत असले पाहिजेत व ह्या दोन्ही संस्थानचें अनुकरण बाकीचे संस्थानिक हळूंहळूं करीत असल्या कारणानें तेथील लोकांचीही स्थिति आमच्या पेक्षां सुखावह होण्यास उशीर लागणार नाहीं व लवकरच आह्मांस खालीं पाहण्याची वेळ येणार आहे हें आह्मी विसरतां कामा नये प्रजेच्या सुखदुःखाची जबाबदारी आपल्यावर विशेष आहे व त्या जबाबदारीतून बहवा मिळवून आपणांस पार पडलें पाहिजे अशा तऱ्हेचे श्री. गायकवाड सरकारांचे विचार आहेत असें त्यांच्या भाषणाच्या झोंकावरून स्पष्ट दिसून येतें. आमचे सयाजीराव महाराज ह्मणतात कीं, सरकार जों पर्यंत असह्य असे कर प्रजेवर लादण्यास तयार आहे तोंपर्यंत शारीरिक व मानसिक सुधारणा व त्याच प्रमाणें स्वावलंबन व स्वातंत्र्यभक्ति यांचें प्रजेंत वास्तव्य होण्याची आशा व्यर्थ आहे. आपल्या गंगाजळींत तुट न पडूं देण्याबद्दल खबरदारी घेतली नाहीं तर नुकसानी बद्दल सर्वस्वी जबाबदारी ज्याच्यावर आहे त्याच्या तोंडांतून असे उद्गार निघावें व फक्त आमच्याच हिताकरितां आमच्यावर राज्य करणाऱ्या कडून मिठा वरील करा सारखे कर खुशाल लादले जावेत ह्यांत आश्चर्य नव्हे काय? आतां ह्यांत आश्चर्य तरी कसलें, आपण होऊन आपलें स्वातंत्र्य नष्ट करून घेत आहों असें समजूनही ह्मैसूरच्या महाराजांनीं इंग्लंड सारखें पार्लमेंट स्थापण्याचा विचार चालवावा व स्वातंत्र्यप्रिय, ऐर्लंडाला स्वतंत्र पार्लमेंट देण्यांत जिवापाड श्रम करणाऱ्या व हिंदुस्थानची काळजी बाहणाऱ्या वृद्ध ग्लाडस्टन कडून प्रतिनिधी कौन्सिलांत लोक नियुक्त सभासद आणण्या बद्दल संमति मिळण्याची आशा व्यर्थ होणें हें जसें संभवतें तशांतलाच हा प्रकार आहे. आमच्या दयाळू सरकारा प्रमाणेंच महाराजांचा हेतू ही असा आहे कीं राज्यांतील सर्व लोकांस शिक्षण मिळालें पाहिजे. हे हेतु तडीस नेण्याचे मार्ग बारीक दोघाचे भिन्न आहेत. आमचे सरकार हा सर्व भार लोकांवरच लादूं पाहणार व गायकवाड सरकार स्वतःवर याची जबाबदारी घेणार. कायदे करून ते प्रसिद्ध करण्या पुरतीच जबाबदारी आपल्यावर घेउन ते समजून घेऊन त्यांच्यावर टीका करण्याचें काम रयतेवर सोंपविणारा राजा व रयतेस इतकें ज्ञान यावें ह्मणून गरीब शेतकऱ्यांना सुद्धां विद्यादान करण्याची व्यव-

स्था लावणारा राजा हिंदुस्थानांतील कांहीं लोकांना तरी मिळावा हें त्या देशाचें भाग्यच समजलें पाहिजे. आमच्या करितांच आपण झीज खाऊन आमचे उदार सरकार आमच्यावर राज्य करीत आहे. सयाजीराव महाराजांचा असा कृत संकल्पच आहे कीं, आपली प्रजा अबादीअबाद व स्वातंत्र्यप्रिय करण्या करितां आपलें तन मन धन अर्पण करावयाचें. बोलणें व कृति ह्यांचा विरोध राजे लोकांस कसा ठेवितां येतो ह्याचें उदाहरण आपल्या समोर आहेच; परंतु त्याचें साम्य पहाण्याची इच्छा असेल तर मात्र सांपतच्या गायकवाडींचें निरीक्षण केलें पाहिजे. हें निरीक्षण करण्यास आपणापाशीं प्रत्यक्ष असें साधन नसल्या कारणानें वरील समारंभाच्यावेळीं श्रीमंत सरकारचें काय भाषण झालें हें पहाण्याचा प्रयत्न केल्यास इष्ट हेतू कांहीं अशीं तरी सिद्धीस जाणार आहे.

पाण्याची हकाटी मोडावी ह्मणून बडोद्या प्रमाणें संस्थानातील लहान सहान खेड्यांतून देखील विहिरी खणून पाण्याचा पुरवठा करण्याची योजना झाली आहे. पाणी मुबलक झाल्या नंतर लोकांच्या आरोग्याकडे लक्ष देण्यास ठीक पडतें व ह्मणूनच पाण्याचा पुरवठा करून गांवोगांव स्वच्छता राखण्याची ही विशेष सोय करण्याची योजना संस्थानांतून झाली आहे. शारीरिक संपत्तीचें महत्व लोकांस समजून त्यांच्या कडून संस्थानाच्या करणीस जर उत्तेजन मिळेल तरच अशा गोष्टी राजाच्या हातून पार पडणार आहेत व हें महत्व कळण्यास लोकांना विद्येची गोडी लागली पाहिजे असें महाराजांचें मत आहे व ह्मणूनच संस्थानातील सर्व लोकांस विद्यार्जन देण्याची त्यांची फार इच्छा आहे बाक्षिसें ठेवून, पुस्तकें, पाट्या इ. फुकट देऊन शेतकरी व दरिद्री लोकांस विद्याभिलाषी करण्याची योजना झाली आहे. गांवच्या पाटील लोकांचा तनखा वाढवून, पोलिसची मदत भरपूर देऊन गांव कमेट्या स्थापण्याचाही विचार चालू आहे. करांचें ओझें जड होऊं नये ह्मणून जमिनीची मोजणी करून निम्यापेक्षां अधिक सारा माफ करण्यांत आला आहे. आमचे दयाळु इंग्रज सरकार बर्रीक दुपटी पासून चौपटी पर्यंत वाढवीत असते. ह्यांचा अनुभव प्रत्येक तीस वर्षांनीं सबीस येतच असतो. इनामदार लोकांस कर्ज मुक्तकरणें, शेतकरी लोकांच्या तारणोपायाची योजना करणें, सरकारी बॅंका स्थापणें ह्याकडे महाराजांचें लक्ष पूर्ण ओढवलें आहे व त्याच प्रमाणें स्मालकॉज कोर्टें पंचायत पद्धत चालू करून दिवाणी व फौजदारी कामें निरनिराळी चालविण्याची योजना योजिली आहे. एकंदरींत आपली प्रजा सुखी स्वतंत्र व राजभक्त व्हावी असा सयाजीराव महाराजांचा मनोदय आहे व मनोदया प्रमाणें गोष्टी घडून येण्या करितां त्यांची खटपट सुरू आहे. आमच्या सरकाचा हेतुही असाच आहे, परंतु हेत प्रमाणें गोष्टी घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यास त्यास जितकी सवड पाहिजे आहे तितकी मिळत नसल्या कारणानें व अंगाला खार न लागतां परस्परा ज्या सुधारणा होतील त्या होवोत असा कोलवा कोलवीचा प्रकार इष्ट वाटत असल्या कारणानें लवकरच संस्थानिकांचा अंमल मायबाप सरकारापेक्षां सुखावह आहे असें कबूल करावें लागेल. अथवा 'तुमचें तुह्मी सांभाळण्यास तयार झल्यावर आह्मी चालते होऊं' असें ह्मणणारांस अशीच गोष्ट होणें इष्ट आहे. तेव्हां सरकांस दोष देण्यास आपणास मार्गच नाहीं.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ६ शके १८१४

---

वऱ्हाड प्रांता साठीं निराळा मुलकी कायदा तयार करण्याचें घाटत आहे. या कायद्याचा मसुदा मि० आवर्ड आफि० जुडिशिअल कमिशनर यांनीं केला आहे. हा सर्व खर्डा हिंदुस्थान सरकारच्या मंजुरातीस पाठविण्यासारखा होण्यास विलंब लागेल ह्मणून त्यांतील जमिनीच्या मोजणी विषयींचा व जमाबंदी विषयींचा भाग स्वतंत्र घेऊन त्याचा प्रथम विचार करण्या साठीं अलिशान रेसिडेन्ट साहेब मि० डौडन यांनीं मि० फ्रान्सिसल्यांड–डायरेक्टर यांज कडे वरील भाग त्या खर्ड्याला धरून पूर्णपणें रचण्या करितां धाडला आहे. डौडन साहेब आपल्या कामांत इतके निष्णात वा जलद आहेत कीं ते दूर गेले आहेत तरी ते वऱ्हाडच्या राज्य कारभारावर पूर्ण लक्ष ठेवितात. त्यांचा निकटचा संबंध तुटला तथापि त्यांचा अधिकार उच्च स्थानाचा असल्या मुळें त्यांची कारकीर्द वऱ्हाड प्रांताला अधिक सुखावह होईल अशी आम्हांस खात्री आहे. हैदराबादेस राजकीय भानगडी त्यांच्या मार्गें भारी विलक्षण आहेत; परंतु त्या उद्योगशील गृहस्थाला सर्व संधानें नीट साधून वऱ्हाडची सुधारणा करण्याची पुष्कळ उमेद आहे हें कळविण्यास आम्हांस संतोष वाटतो. वरील मोजणीच्या व जमाबंदीच्या कायद्याचा मसुदा मागवितांना रेसिडेंट साहेबांनीं कांहीं ठळक ठळक अधिकाऱ्यांचे अभिप्राय विचारले आहेत आणि सरकारी अधिकाऱ्या बाहेरील लोकमत काय आहे तें कळावें म्हणून त्यांनीं वऱ्हाड सार्वजनिक सभेकडेही हें प्रकरण अभिप्राया साठीं धाडलें आहे. लोकविचाराला मान दिल्या प्रमाणें सार्वजनिक सभा आपलें काम उत्तम बजावील असें आम्ही इच्छितो. सार्वजनिक सभेच्या पोट कमिटीनें वरील प्रकरणाचा विचार मोठ्या दक्षतेनें करून काल रोजीं जनरल सभा भरून त्या सभेचा अभिप्राय वरिष्ट सरकाराकडे रवाना करण्याचा संकल्प ठरला होता या पुढील हकीकत येत्या, सोमवारच्या अंकांत कळविण्यांत येईल.

---

हिंदुस्थानचा लष्करी खर्च अवाढव्य आहे एवढेंच लोक बोलत असतात. परंतु त्या खर्चाचा नीट हिशोब पाहिला म्हणजे कळून येईल कीं इंग्लंड सरकारनें हिंदुस्थानच्या खजिन्यावर फसकी प्रमाणें एक निराळी खंडणीही लष्करी खर्चा प्रीत्यर्थ बसविली आहे. ब्रह्मदेशांत, आफिगाणिस्थानांत इजिप्त देशांत, किंवा कोठेंही लढाई झाली तरी त्या लढाईचा बादरायण संबंध हिंदुस्थानशीं जुळवून ते ते खर्च हिंदुस्थानच्या खजिन्यावर लादण्याचा पाठ पूर्वीं पासूनच आहे. मुख्य तत्व काय कीं ज्याचा खर्च त्यानें सोसावा म्हणजे कराचा बोजा दुसऱ्यावर बसूं नये. हिंदुस्थानच्या लाभा साठीं गोष्ट असली म्हणजे हिंदुस्थानानें तिजबद्दल खर्च भरावा हें ठीक आहे. परंतु या तत्वाची कडेलोट इतकी झाली कीं त्याज पासून इंग्रजी ठपापाले कांवा, स्वार्थपरता व अन्याय परंपरा हीं ढळढळीत दिसून येतात. हिंदुस्थानच्या नेटीव व इंग्लिश पलटणी आहेत. त्यांच्या साठीं दरसाल अठरावीस कोटी रुपये खर्च होतात. इंग्रजी पलटणींत गोरे शिपाई एकंदर ७२००० असतात. दरसाल त्यांच्या पैकीं विलायतेस अदमासें दहा हजार जणांचें जाणें येणें होत असतें. त्यांच्या जाण्या येण्याच्या खर्चा साठीं व विलायतेस नवीन भरती करण्या साठीं म्हणून हिंदुस्थानच्या जमेंतून दरसाल मोठमोठ्या रकमा खर्चीं पडत आहेत इतकेंच नव्हे तर या रकमा दिवसें दिवस वाढत्या प्रमाणावर आहेत बंदूक, गोळा, पोटगी खर्च, अवाढव्य पेनशनें, बदल्या रद्दबदल्या, आगबोटीचा खर्च या सर्व बाबी निराळ्या हिंदुस्थानाला द्याव्या लागतात तें शिवाय अगदीं स्वतंत्र आहे. शेकडो गोरे लोक या देशास येण्या साठीं एका पायावर उभे असतात तरी देखील इकडे आयत्या वेळेवर कवायतींत व लष्करी शिक्षणांत प्रवीण असे शिपायी धाडण्यास मिळावे अशा बाहण्यावर विलायत सरकार बेलाशक हिंदुस्थानावर लक्षावधि रुपये खर्चाचा भार टाकीत आहे. आरंभी ही रकम ७००००० पौंड होती ती साली साल वाढतां वाढतां गेल्या सालीं साडेआठ लक्ष पौंड पर्यंत येऊन पोंचली आहे. हा खर्च विनाकारण होत असून गेल्या आठ वर्षांत लांबविलेल्या रकमेची एकुणात ७० लक्ष पौंड होत आहे. ही ठोक रकम हिंदुस्थानास परत देणें कायद्यानें भाग झालें तर विलायतचें दिवाळें निघेल व वर्षाचा निम्मा लष्करी खर्च एवढ्या रकमेबर भागला जाईल. इंग्रजा सारख्या न्यायी म्हणविणाऱ्या राजकर्त्यांना वरील हकीकत लांछनास्पद नव्हे काय! किंवा बळी तो कान पिळी या न्यायानें सर्व न्याय्यच आहे.

---

The Berar Samachar

MONDAY, APRIL 18, 1892

## THE GAOL OF EDUCATION.

Among the vast fields of Government activity the setting up of the machinery of education is the most miraculous. It has provided the Government with the most useful and loyal subjects and the people with the most efficient administrators. An ignorant statesman is a mere empiric, no more to be trusted than a quack doctor. The most successful administrations have been those which have been directed by learned men. Learned men are the most indefatigable in business and likely to take it up for its own sake. Learned men make the best citizens because they see the necessity of obedience and therefore yield it willingly. It is in barbarous communities that the task of governing is most difficult. It therefore behoves all officers at the head of administration in as much as they are the guardians of the welfare of their subjects to consider what they can do to improve the times in which the future generations will have to live. And ascending the pinnacle of human eminence the efforts of kings and their viceroys will be most wisely directed towards increasing the world's stock of knowledge. No doubt all learned men are not Spencers or Bacons, Newtons or Paracelsus, or such conspicuous human beings who have by their intelligence and perseverence either indirectly or directly added to the material comforts of humanity. No, they have not reduced the apparent diversity of nature to a unity of law. They have directed men to the proper sphere of inquiry. Nor have they endeavoured to produce certain effects by some particular causes and thus to confine nature to simple experiments and thus to add to the estate of man. The nature of man is generally level. The age, the inheritance, and several other direct and indirect agencies slightly raising some one to extraordinary intellect and genius. It is from such men that human estate is amplified. The efforts of Government should therefore be always directed towards adding to such means.

First of all to enable men to make discoveries they must be first taught as to what has been discovered and the manner in which it has been discovered. Every one must admit that looking from the vertical point of the most advanced humanity. India will no where find a place so barbarous and dull the humanity here looking from the pinnacle of knowledge. It must be borne in mind we are dealing with the society as it is and not with that which once was as it was. The past splendour would never make up for present rustiness. But to return to matter pertinent to our subject the efforts of Governments should be directed towards making the people as much possessed of knowledge as possible. This is rather a prudential and political view. Descending from the philosophical to the practical view it must be remembered there is no qualification for Government but virtue and wisdom actual or presumptive. Wherever these are found they have the passport as it were to human place and honor. Woe to an officer that would madly and unpiously reject the services destined to diffuse lustre around his narrow limit of jurisdiction. No appointment by sortition, no promotion by mere seniority, no indifference to merit! Why not then confine appointments to the unearthly principles of sortition and rotation. Efficiency of labour from a practical point of view is the best friend of the labourer as well as the capitalist. It would be our presumptuous boldness to say Mr. Fawcett was wrong when in his book on Political Economy he maintained that the interest of a capitalist is hostile to that of a workman. If efficiency of labour produces more than would have otherwise been produced but for it, the additional production must go to the agency which produced it. Thus the efficiency and the skill of a labourer and other moral and mental influences alone are the main sources of the wages of a labourer. All other standards are unnatural, tending preposterously to invert the natural order of things.

A time is now come when Government should grant such endowments and privileges to the Universities as will enable the dwellers in them to live a quiet and untroubled life. We have this time tried to show the value of learning and as a sequal to this we shall at another time show what should be done to advance it.

---

We acknowledge with thanks the receipt of a copy of the Progress report of the Forest administration in Berar for

1890-91. This report is the last of the series of annual reports for that year and gives a fair and satisfactory account of the working of the year throughout the province. Forest administration is based on a general system common to the whole nation and at present the Government is engaged in providing that department with able officers and in arranging the grades and salaries for the higher sort of supervision. There is a wide-spread cry against the present management that it overlooks the interests of the ryots and has opened a door of high emoluments for the Anglo-Indians. Whatever it be, the progress of the Forest department in Berar has made a rapid advance and new laws & working plans are under consideration for the security and stability of highly efficient work. The following paras we cull below will indicate the financial results of the year and will enable a careful reader to notice the sources of revenue which are gradually increasing at the disappointment and cost of the people:—

The financial results of the year surpass those of last year, which were the best on record. The total income of the year was Rs. 4,87,109, the charges Rs. 1,68,608, leaving a surplus of Rs. 3,18,501 compared with Rs. 4,40,540, Rs. 1,76,549, and Rs. 2,63,991 in 1889-90. The surplus exceeds that of last year by Rs. 54,510. The increase is due chiefly to augmented receipts from timber and in a less degree from firewood and bamboos.

"The considerable increase of revenue under the heads "timber," "Firewood and Charcoal," and "Bamboos" seems, with the exception of some portion of the income from timber in the open Melghat, which the Conservator apprehends may have been overworked, and from the sale of teak poles in Buldana, to be a fair and legitimate increase, the result of good management, and is accordingly matter for congratulation. Mr. Dickinson seems equally alive to the importance of pushing his sales and to the necessity of conserving his forests.

"In connection with the sum expended in 1889-90 on the formation and improvement of forests in Berar, *viz*, Rs. 56,730, or less than 13 per cent of the gross receipts, the Government of India remarked that this percentage was considerably lower than that incurred in most provinces, and indicated that further measures for the organization and improvement of the forests (including working plans) were justified by the financial position. It may be remarked here that the Conservator has since explained that the amounts shown as expended on improvements have been calculated at too low a figure and do not give a fair idea of what had been done in this connection. He advocates a new method of allocation which he has adopted in the present report."

Sir David Barber has suggested in his budget for 1892-93 that the question of exchange is approaching a critical stage & it is impossible to foresee what may happen in this connection within the next few years. The present aspects of the currency question are rather disappointing and appear to force Government to take some active and decisive step to stop the uncertainties and daily changes of the Market in regard to the rate of Exchange. Mr. Gostling a gentle man of sound commercial knowledge and of extensive experience in the absorbing question of the day has proposed a measure to the India Government to lessen the rigour and hard terms of the Mint Act and to cut a good deal of extravagent receipts in England on account of the Military expenditure. He further proceeds to observe.:—

"If this course is not possible owing to the opposition of the Home Government, who use India as a cat's paw to checkmate the Russian designs on Constantinople the Indian Government will be forced, in order to make both ends meet, to reduce the excessive salaries paid to their Civil and Military Officers, salaries larger than are paid by any Government in the world for similar services, and to refuse any longer to be responsible for the payment of the pensions of these officers on their retirement and of those who have already retired. The third alternative is repudiation, pure and simple. A refusal, or rather a frank acknowledgment of inability any longer to pay the interest on loans contracted in more prosperous time."

He then attempts to come to a general proposition in the hopless toue of meeting the necessities of the day and states the future turn the question will take, in the words as follows:—

"The matter can, I think, be put in a nutshell. We are all aghast, as is the Government, at exchange tumbling down from 1s. 4d. to 1s. 2¾d. It may go lower, no one knows how low. What is wanted is steady exchange. The world is now veering strongly to bi-metalism as the permanent cure for the evil. But that is a far off cry."

---

Some Anglo-Indians have taken a fancy to condemn the institution of representative Government in India on the ground of the inherent and unavoidable defects and shortcomings of that system. In fact, as Mill and others have urged, the majority of a nation may be as tyrannical as any despot and may encroach to any extent on the freedom of actions of individuals. But as civilization and education advance the moral and political greatness of a nation the representative assemblies are more favourable than despotic and aristocratic forms of Government. The 'Hindu' of Madras has eloquently vindicated the claims of the Congress to representative Government in the lines copied down:-

"Because Parliamentary Government is not perfect and is susceptible of improvement, despotism cannot be a better form of rule. In every free country,— and India under British rule is certainly a free country— public opinion must grow, and at every fresh stage of its growth it will bring pressure, more or less irresponsible, on the ruling class for an adequate measure of recognition. This recognition public opinion in India does not possess, and the Congress asks for nothing more. ❊ ❊ The question in India is not whether an enlightened despotism or representative Government is the best form of rule, but, how can the present serious drawbacks in the administration and legislation of the country be remedied. And it so happens that the only remedy lies in another step being taken towards assimilating the Indian form of Government with that of Western countries."

---

## वऱ्हाड

हवामान—यंदा उन्हाळ्याचें स्वरूप फार प्रखर दिसतें. उष्णमापक यंत्रांत पारा १११ अंशावर चढत असतो. दिवसा कडक ऊन असल्यामुळें आणि वारा बंद राहिल्यामुळें दोन तीन दिवस उकाड्यानें लोकांस हैराण केलें होतें. ताप वगैरे आजार बळावत आहेत.

येथील डे० कमिशनरचे क्लार्क आफ दि कोर्ट मि० थोरीस यांची बदली उमरावतीस जुडि० कमिशनरचे क्लार्क आफ दी कोर्टचे जागेवर झाली होती पण ती कांहीं कारणावरून रहित करण्यांत आली.

रा. रा. रामचंद्र भास्कार जयवंत नायब तहशिलदार वर्ग १ यांस उमरावती स्माल-काज कोर्टाचे क्लार्क आफ दी कोर्ट नेमल्या वरून रा. रा. रंगनाथ विष्णु हे अकोल्याच्या डे० कमिशनरचे कचेरींतील आपल्या पन्नास रुपयांचे जागेवर परत आले.

उमरावती डेपुटी कमिशनरचे हेड क्लार्क मि. मेन यांनीं पेनशन घेतल्या वरून त्यांचे दोनशे रुपयांचे जागेवर सध्यां मि० थाय यांस १७५ वर नेमलें आहे, तथापि त्या जागेच्या कायमचे दोनशें रुपये पगारावर सर्वांत जुने हेड क्लार्क रा० रा० बापुराव भिकाजी इलिचपूर यांस नेमून त्यांची बदली येथील डेपुटी कमिशनरचे हेड क्लार्कचे जागीं होऊन मि० थाय हे इलिचपुरास व येथील हेड क्लार्क मि० गॉडफ्री यांस उमरावतीस बदलणार असें घाटत आहे.

मि० रुस्तुमजी फर्डूनजी असिस्टंट कमिशनर मलकापूर हे दोन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर लवकरच, जाणार आहेत असें कळतें.

मि० रहिमतुल्ला नायब तहशिलदार मोर्शी यांनीं रजा घेतल्यावरून उमरावती स्मालकाज कोर्टाचे नाझर रा० रा० यशवंतराव काळे यांस नेमलें आहे.

बुलढाणा डेपुटी कमिशनरचे क्लार्क आफ दी कोर्ट रा० रा० विठ्ठलराव काळेकर यांस इलिचपुरास व इलिचपुरचे क्लार्क आफ कोर्ट रा० रा० रामराव पतकी यांस बुलढाण्यास बदलणार.

मि० ओग्रेडी एक्स्ट्रा असि० कमि० यांच्या अंगावर नारायण सुकल नांवाच्या आरोपीनें एक विटकरीचा ढेला मारला म्हणून त्यास तीन वर्षांची सक्त मजूरीची शिक्षा देण्यांत आली. आरोपी पिंजऱ्यांत उभे करिते वेळीं त्यांच्या संबंधानें विशेष दक्षता ठेवणें भाग आहे.

रा० रा० वासुदेव सदाशिव पिसोळकर गव्हर्नमेंट ट्रान्सलेटर, हैदराबाद यांनीं दोन महिन्यांची हक्काची रजा घेऊन ते सध्यां अकोल्यास आपल्या घरीं लग्न मौंजी कार्या निमित्त आले आहेत.

आज पासून अकोल्यास सेशन खटले चालूं होतील.

उमरावतीच्या संपलेल्या सेशनांत दहा मोकद्दम्याचा निकाल झाला त्यांतील कांहीं अमानुष खटल्यांची माहिती उमरावतीच्या प्रमोदसिंधू वरून आह्मी खालीं देतों:—

(१) कारंजाच्या एका बारा तेरा वर्षाच्या पोराला त्याचा चुलत भाऊ व एक साथीदार रतनसिंग या दोघांनीं पन्नास साठ रुपये किंमतीच्या दागिन्यासाठीं फांस लावून ठार मारलें. उभयतांस फांशीची शिक्षा दिली.

(२) बडनेरा येथील बापकांच्या तंट्या वरून हाडवैरी झालेल्या दोन मुसलमानांपैकीं एकानें दुसऱ्याचा खून केला म्हणून तो फांशीची शिक्षा पावला.

(३) बोपुरी तालुके मूर्तिजापूर येथील पाटाला मध्यें एका भिंती बद्दल तंटा पडून मारहाण झाली व इसम मरण हि पावला. दोन्ही आरोपीस तीन व पांच वर्षांची सक्त मजूरीची शिक्षा झाली.

(४) वणी जिल्ह्यांतील एका सात वर्षाच्या पोराच्या मनांत त्याच्या सहा महिन्यांच्या भावाला झोंपाळ्यावर बसून खेळवावयाचें होतें परंतु त्याचा शेजारचा सोबती त्याला झोपाळ्यावरून उतरवून आपण त्या मुलाला खेळवीत झोंपाळ्यावर झोंपी गेला. त्या सात वर्षांच्या पोराला आपल्या अपमानाची चीड येऊन त्यानें भावाला उचलून जवळच्या विहिरीत फेंकला. अल्पमुलाच्या हातून अपराध घडूं शकत नाहीं. ह्मणून त्या खुनशी पोराला मोकळें सोडण्यांत आलें.

परवां शनिवार रात्रीं येथील 'दत्त प्रसाद खो संगीत' नाटक मंडळीनें 'गुणोत्कर्ष' आणि 'रंगी नायकीण' हे दोन प्रयोग करून दाखविले. दोन्ही भाग एकंदरीनें बरे झाले. गणपतराव विलेदार, राजा, रंगी, सुशर्मा, घमंडानंदन, वगैरे पात्रांनीं आपापलीं कामें चांगलीं बजावलीं. विशेष हें कीं या मंडळीचे मालक ह्मणजे परवाच्या नाटकांतले शिवाजी व दुसऱ्या भागांतले कुकर्मा व गारुडी यांनीं आपल्या सर्व सोंगांची बतावणी सर्वोत्कृष्ट केली. सदर्हू गृहस्थ नाटक कलेंत प्रवीण असून त्यांचा कंठ गोड, भाषण मोहक व हावभाव अगदीं हुबेहुब आहेत. नाटक पाहणाऱ्या रसिक लोकांनीं या पात्राचें काम अवश्य पाहावें.

सदर्हू नाटककार मंडळी येत्या २९ वे तारखेस येथील श्री राजेश्वर संस्थाना प्रीत्यर्थ वेगळा खेळ करून त्याचें उत्पन्न देवालयाच्या फंडा कडे देणार आहे. मंडळीच्या उदारबुद्धीचें, देवनिष्ठेचें व सार्वजनिक कामांतील तत्परतेचें आम्हीं प्रोत्साहन करितों.

येथील एका माळ्याच्या धटिंगण मुलानें नऊ वर्षाच्या मुलीशी जबरी संभोग केला म्हणून त्याच्यावर खटला चालू आहे.

येत्या २० वे तारखेस मि० एफ. एस. बुलक नवे जुडि० कमिशनर हे आपल्या कामाचा चार्ज घेतील आणि मि. आबर्ड हे तीन दिवस सेशन जजचें काम पाहून नंतर सहा महिन्यांच्या फर्लो रजेवर जाण्या साठीं निघतील. तेव्हां त्या तीन दिवसांत मि० निकोलेट यांस येथील डे० कमिशनरचें आपलें जुनें काम पाहावें लागेल असें समजतें.

---


### जाहिरात

भुसावळ गोरक्षण सभेसाठीं एक उत्तम उपदेशक व एक हुशार कारकून अशा दोन मनुष्यांची जरूर आहे. उपदेशकास त्यांची लायकी पाहून दरमहा २० रुपयापासून २९ रुपये व कारकुनास दरमहा १२ पासून १५ रुपये पर्यंत पगार देण्यांत येईल. या दोन जागां साठीं ज्यांस अर्ज करणें असतील त्यांनीं ते खालीं सही करणाराकडे आज पासून दोन महिन्यांचे आंत टपालमार्गें भर हशिलाचीं तिकीटें लावून पाठवावें. प्रत्येक अर्जदारानें आपले अर्जा सोबत आपले प्रामाणिकपणाबद्दल व काम करण्यास लायक असल्याबद्दल चांगल्या सुप्रसिद्ध गृहस्थांचे दाखले पाठविले पाहिजेत. इतर माहितीबद्दल सेक्रेटरीशीं पत्रव्यवहार करावा.

टीपः—प्रत्येक पत्रकारानें ही जाहिरात देशहिताची समजून फुकट छापण्याची तजवीज करावी.

भुसावळ ता. १६।४।९२ — विठ्ठल गोविंद वकील, रामकृष्ण सिताराम, सेक्रेटरी गोरक्षणसभा भुसावळ


---

## वर्तमानसार.

सर रेमंडवेस्ट व्यायामिक शिक्षणावर बोलतांना ह्मणालें कीं:— ह्या पेहलवानींत किंवा तालीमबाजींत एक मोठें प्रबल नैतिक तत्व अंतर्गूढ आहे. आपलें काम दुसऱ्याकडून तालीमबाजांस करून देतां येत नाहीं, ह्मणजे पेहलवानाचें काम 'ब्राह्मणद्वारा' होऊं शकत नाहीं. दुसऱ्यानें काम करून आपण यश घ्यायाचें असा प्रकार होऊं शकत नाहीं. ही गोष्ट उमजणें हें मोठें मूल्यवान् नैतिक शिक्षण आहे. शिवाय निरनिराळे पेंच, पकडा, व कसरती यांना अनेकांचा संघ लागतो, व तेवढी एक एक कसरत पार पाडण्यास सर्वांना एक चित्तानें, नेटानें व काळजीनें झटावें लागतें. याचा प्रत्यय आपण प्रत्यक्ष जो आतां प्रकार पाहिला त्या वरून येतो. आतां ही तालीमबाज मंडळी जरी भिन्न भिन्न वर्गाची आहे तथापि परस्परांचे उत्कर्षविषयीं कशी उत्सुक आहे पहा. जरी ही मंडळी परस्परांची स्पर्धा करते तथापि ती स्पर्धा केवळ प्रेमभावाची आहे. या स्पर्धेमुळें आपसांत वितुष्ट कधीं उत्पन्न व्हावयाचें नाहीं. इतकेंच नव्हे पण ज्या अर्थी सर्वांचा उद्देश एक आहे त्या अर्थी ते परस्परांस मित्र व बंधु या भावानें पहातात व या योगानें एका मोठ्या समाजाचे अवयव होण्यास ते अधिक योग्य होतात. ही जी या तालीम बाजीमुळें मनःप्रवृत्ति उत्पन्न होते ती आपल्या इकडील लोकांत अधिकाधिक वाढत जावो व जेव्हां कोणी युरोप किंवा अमेरिकेंतून तरुण मंडळी इकडे येईल तेव्हां त्यांच्या सारखे तुमच्यांत गुण आहेत असें पाहून तिचें व तुमचें दृढतर संघटन होऊन बंधुत्वाचें नातें बळकट होवो अशी मी इच्छा करितों."

दे० से०

मुंबईच्या एका पत्रांत हा खालील मजकूर प्रसिद्ध झाला आहे. सदर मजकूर विचार करण्यायोग्य व आश्चर्यकारक असल्यामुळें वाचकांसाठीं त्याची आह्मी येथें नोंद देतो. पत्र लिहिणारा आपले पत्रांत ह्मणतो कीं, "ता. १३ मार्च, रोजीं आह्मीं मंडळी रात्रों वांद्र्याकडे जाण्यास कोळीबाग बंदरावरून होडींत बसून निघालों. पिठासारख्या स्वच्छ चांदण्यांतुन खाडीच्या दोहों बाजूंचा देखावा अत्यंत मनोहर दिसत होता. आह्मी अनेक विषयांवर संवाद करीत मार्ग क्रमीत होतों; सुमोर नवाच्या सुमारास आमच्या मंडळीपैकीं एकास चंद्र बिंबाच्या मध्य भागीं एक सारखा असा रुपया एवढा काळा डाग दिसला. हा डाग उत्तरोत्तर वाढत चालल्यामुळें तिकडे आमचें लक्ष वेधून चंद्रबिंबाकडे पाहूं लागल्यानंतर सुमारें १० मिनिटांनीं वरील काळा डाग गंजिफे एवढा होऊन त्या डागाच्या मध्यभागीं एक तारा दिसूं लागला. ही ताऱ्याची आकृतीही पुढें वाढूं लागली. वास्तविक पाहातां हा तारा नव्हता; तर चंद्र बिंबाचा मध्यभाग कलंकमुक्त होत होता. होतां होतां शेवटीं त्या काळ्या डागाचें त्या शुभ्र चंद्रबिंबा भोंवती एक कृष्णवर्ण कंकण बनलें व त्या कंकणांतुन धूर निघूं लागला. कांहीं वेळानें त्या धुराचे मोठमोठे लोट निघालें. आणि आकाशांत गंभीर ध्वनि होऊन चंद्र बिंबापासून विजेच्या लोटाप्रमाणें तेज निघून तें खाडीच्या मध्यभागीं येऊन गुप्त झालें." हा काय चमत्कार असेल, ईश्वर जाणें.

सेक्रेटरीयटमध्यें नोकरीवर ठेवण्या विषयीं पुढील प्रमाणें ठराव झाला. ३० रुपये पर्यंत म्याट्रीक्युलेटेड लोक ठेवावे; त्यावर ५० रुपये पर्यंत पी. इ. पास झालेल्याला ठेवावें आणि ५० रुपयांच्या वरच्या जागा ग्रज्युएटांस द्याव्या.

म० मि०

इंग्लंडांत जें इंडियाकौन्सिल आहे, त्याचा खर्च भागण्यास सुमारें २० कोटी रुपये हिंदुस्थानच्या उत्पन्नांतून जाणार; तरी हिंदुस्थान ह्मणजे इंग्लंडास रिकामें अंगेंच! वीस कोटी संपत्तीचें रिकामें ओझें कोणास नकोसें होईल?

ज्या जिल्ह्यांत दुष्काळ पडला आहे अशा कोलार जिल्ह्यांत विहिरी वगैरे खणून पाण्याची तजवीज करावी ह्मणून ह्मैसूरसरकारनें आणखी ३०,००० रुपये सांक्शन केले. एकंदर ८०,००० रुपये झाले. तरी स्वराज्य!

बेडकांचे आवाज—अमेरिकेंतील कांहीं जातीचे बेडूक, विशेषतः झाडांवर रहातात ते, निरनिराळ्या तऱ्हेचे आवाज काढून सर्व अरण्य दणदणावून सोडीत असतात. त्यांपैकीं कित्येक निरनिराळ्या प्राण्यांच्या अवाजा प्रमाणें आवाज काढितात; ते इतके हुबेहूब कीं ते ते प्राणीच ओरडत आहेत असा स्पष्ट भास होतो. कांहीं कुत्र्याप्रमाणें हुबेहुब भोंकतात; कांहीं मुलाप्रमाणें रडतात. एकदां दोनदां प्रवासी लोक फसल्याचीं उदाहरणें ग्रंथांतरीं आहेत. कोणी तरी मूल रडत आहे असें वाटून आवाजाच्या धोरणानें त्यानीं जावें तों बेडूक!

शिकागो ( अमेरिका ) येथें पुढील सालीं मोठी थोरली जगद्यात्रा भरणार आहे इ० स० १४९२ सालीं कोलंबसानें अमेरिका शोधून काढली, त्या जागीं आज सुधारणेच्या शिखराला पोंचलेले लोक आनंदानें नांदत आहेत, यामुळें त्या प्रसंगाचें चवथें शतसांवत्सरिक स्मारक ह्मणून ही यात्रा भरणार आहे. त्या वेळीं अर्थात् त्या ठिकाणीं नाना दिगंतांतले लोक जाणार. तेव्हां अशा उदात्त, रमणीय व सर्वथा संस्मरणीय प्रसंगाला योग्य चिरस्थायी असें कांहीं तरी करावें या हेतूनें ॲन्ड कार्नेजी या नावाचें एक कोट्याधीश स्वतः एकट्याच्या खर्चानें आजपर्यंत कोठेंही पृथ्वीवर नाहीं इतका मोठा मनोरा बांधणार आहेत. हा मनोरा पारिसमधील प्रसिद्ध ऐफेल मनोऱ्याहूनही प्रचंड होणार आहे. याची उंची ११२० फूट होणार असून त्यांत एके वेळीं २६,००० लोक राहूं शकतील अशी तजवीज केली जाईल. शेवटल्या मजल्याच्या वर एक मजला करून त्यांत चार निराळ्या शास्त्रांच्या शोधासाठीं वेधशाळा ठेवण्याची तजवीज होणार. नंतर त्या शाळांच्या वरच्या मजल्यावर विजेची गाडी चालू राहणार. होंतून रात्रीं विजेचे दिवे आणि दिवसा दूरच्या माणसांस समजतील अशा खुणा असणार. आणि याच्याहीवर एक प्रचंड दीपगृह होणार. या दीपगृहांत फारच जबरदस्त व फिरता असा एक दीप ठेवून त्याच्यावर अमेरिकेंतील युनैटेड स्टेट्सचें "तारे व पट्टे" यांनीं अंकित असें निशाण फडकत रहाणार! ह्या दीपगृहांतला दीप आजपर्यंत जगावर असलेल्या दीपांपेक्षां फारच प्रचंड असा तयार होणार आहे. आह्मां हिंदुस्थानवासी दरिद्र्यांस हें सर्व कल्पनिक–किंवा स्वप्नमय आहे!

क० म०

"टेंभूरणीचे पानाच्या विड्या ओढल्यानें काळीज करपून जात. हृदयांत पिवळाडाग पडतो; कंठशोष होतो; कफ वाढतो; हीं लक्षणें होतात. असें असून नित्य या व्यसनाचा फैलाव वाढतच चालला आहे हें यःकश्चित् व्यसन आहे असें दिसतें; परंतु यानें फारच नुकसान होत आहे द्रव्यनाश होतो, शक्तिनाश होतो, डोळे मंद होतात, तेव्हां अशा दुष्ट व हलकट व्यसना पासून लोकांनीं दूर रहावे हें चांगलें."

न्या० सिं०

हल्लीं पनवेल तालुक्यांत नवीन तर मठरत आहे, त्यांत शेतकरी लोकांनीं आपल्या खर्चानें आणि आंग मेहनतीनें ज्या खराब जमिनी पिकाऊ केल्या आहेत त्यांचा धारा अतीशय ह्मणजे शेंकडा १४०० प्रमाणें वाढणार असें प्रसिद्ध झाल्यावरून त्या तालुक्यांतील लोक फारच घाबरून गेले आहेत रयतेनें आपल्या खर्चानें आणि आंग मेहनतीनें ज्या जमिनी सुपीक केल्या आहेत त्यांचा फायदा सरकार घेणार नाहीं असें सरकार उघड रीतीनें ह्मणते, आणि इकडे सर्व्हे खाते सरकारची तुंबडी भरून शाबासकी मिळविण्या करितां खुशाल हवे तितके धारे वाढवितें घाटावरील प्रदेशांस कित्येक ठिकाणीं असेच धारे वाढले आहेत. पण त्या लोकांनीं चकार शब्दही काढला नाहीं, या वरून घांटावरील लोक आपल्या हक्का बद्दल किती उदासीन असतात हें तेव्हांच दिसेल "पावसानें भिजविलें आणि राजानें मारलें" तशांतलाच हा प्रकार आहे इंग्रज सरकार सुधारलेलें आहे, त्यांनीं रयतेशीं असा अविश्वास कसा करावा?

शु० सू०

नेटिव संस्थानिकांच्या दरबारांत असलेल्या पॉलिटिकल ऑफिसरांनीं संस्थानिकापासून देणग्या व फुकट कामें करून घेऊं नयेत, असें भराभर सरकारी ठराव फेलावर चढलेले आहेत; पण त्याचा उपयोग मात्र फारसा होत नाहीं. नेटिव संस्थानांतील ऑफिसर मंडळी या ठरावांविरुद्ध वागून जबाची थाटाची चैन उडवितात.

युरोपियन पोलिटिकल कामदारांनीं नेटिव राजांच्या पैशावर झुलूंनये असें जे कडक हुकूम सरकारच्या ठरावांत आहेत, त्या ठरावांचा मग उपयोग काय? तें समजत नाहीं. सरकारानें आपल्यामतें बंधारण घालून ठेविलेलें आहे; पण तें राहात नाहीं. नेटिव संस्थानच्या दरबारी असलेले कामदार तेथें स्वतंत्र असतात, व ते ह्मणतील ती पूर्व दिशा, अशी तेथें स्थिति असते. संस्थानचे खरे राजे ह्मणजे पोलिटिकल कामदार असून तेथील राजे नुस्ते लांकडी बाहुल्यासारखे कळसूत्री असतात, असें, 'अमृत बझार पत्रिका' नें ह्मणत असतें, त्याचा अनुभव 'टूथ' पत्रांत आलेल्या वरील मजकुरावरून येतोच सरकार ठराव पुष्कळ करितें; पण तें सर्व कागदी घोडे नाचविण्या सारखें होतें, त्यांचा अंमल व्हावा तसा होत नाहीं; यामुळें सहजच त्या ठरावांकडे अलक्ष करण्यास कामदारांस जागा होते; हें सरकारनें लक्षांत ठेवण्या सारखें आहे.

धारवाड जिल्ह्यांत सुरू असलेलीं रिलिफ वर्क्सची कामें मुंबई सरकारनें बंद ठेविलीं असें समजतें. सरकारी कामें सुरू असल्यामुळें मजूर लोक तिकडे गुंततात, व आपलीं शेतकीचीं कामें चालत नाहीं, असा शेतकरी लोकांनीं अर्ज केल्यामुळें सरकारानें आपलीं रिलिफचीं कामें बंद केलीं असें ह्मणतात. शेतकऱ्यांस सरकारानें तगाई बरीच दिली आहे! बेळगांव, मिरज कोल्हापूर आणि हुबळी, धारवाडाकडे हल्लीं प्रत्यहीं थोडा बहुत पाऊस पडूं लागला आहे. आणि शेतकीचा हंगाम आला आहे. तेव्हां रिलिफ कामावरील मजूर मोकळें झाले ह्मणजे त्यांचा शेतकीकडे मदत होईल. रिलिफवर्क्स बंद झालीं, तरी सरकारानें अगदींच जीं दुबळी माणसें असतील, आणि ज्यांला मजुरी करण्याची शक्ति नसेल, अशांला सुबत्ता होईपर्यंत अन्न द्यावयास पाहिजेच.

कित्येक लोक व्हाल्युपेबल् बुकपाकिट एकाद्याकडे त्यानें मागितल्याशिवाय उगाच पाठवीत व तें त्यानें घेतलें नाहीं, ह्मणजे परत होऊन पोष्टाचें मनिआर्डर कमिशन बुडे व व्यर्थ त्रास पडे. हा त्रास चुकविण्याकरितां मनिआर्डर कमिशन आगाऊ घेतल्याशिवाय व्ही. पी. बुकपाकेट घ्यावयाचेंच नाहीं. असा पोष्टानें ठराव केला, व त्या प्रमाणें अंमल सुरूही आहे.

✓ उमरावती येथील सुप्रसिद्ध वकील मि० आर. एन्. मुधोळकर यांणी "ह्यूम साहेबांचें पत्रांत भाऊ वाटण्या सारखें कांहीं नाहीं, त्यांणीं भावी दुःखस्थितीचा बावटा उभारून जागे केलें ह्या बद्दल त्यांचे उतराई होणेंच योग्य आहे, अशा अर्थाचें एक पत्र इंग्लिश पत्रांत प्रसिद्ध केलें आहे ह्यूम साहेबांच्या पत्रानें लोकमत बाहेर पडण्यास तूर्त जागा केली आहे खरी.

स० शा०

प्रार्थना समाजाच्या वार्षिक उत्सवाच्या वेळीं रा. वामन अबाजी मोडक बोलले त्याचा सारांश असा कीं:— अनुभवीक मंडळींनें एकमेकांना साह्यय करण्यासाठीं चोहोंकडे धर्मऱ्हास होत चालला आहे तो नाहींसा करावा व ज्या धर्मवृक्षाचें बीजारोपण झालें आहे तो अंतःकरणरूपी भूमिकेवर फलद्रूप करावा धर्माची मजारी स्वर्गापेक्षां किंवा जीवनापेक्षां अधिक आहे नीतीप्रबंधानें नुसती बडबड करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. नीतीच्या तत्वाचा परिणाम अतःकरणावर झाला पाहिजे. लोकांमध्यें धर्म जागृती व्हावी एतदर्थ आमचा हा प्रयत्न चालू आहे. ज्यांचा आमच्या या धर्ममार्गांत किंवा उपासना पद्धतींत कांहीं चुका किंवा व्यंगें दिसतील त्यांणीं तीं व्यंगें व त्या चुका आपल्या मधून काढून खुशाल निराळे धर्मपंथ किंवा उपासनापद्धती सुरु करावी. परंतु सदासर्वकाळ परमेश्वराचे ठायीं त्यांचा दृढभाव असावा. व त्याच्या अंतर्बुद्धि करून घेण्याचा हेतु असावा ह्मणजे झालें. ज्याला धर्मव्याख्यान ऐकावयाचे आहे तो कोठेंही गेला तरी तें ऐकेल. मग तें व्याख्यान ख्रिस्ती देवळांत असो, मशिदींत असो, रामाच्या मंदिरांत असो, ब्राह्मसमाजांत असो किंवा प्रार्थनासमाजांत असो. जेथें ह्मणून भक्तिज्ञान चालत तेथें आपलें ज्ञान भ्रष्ट झालें नसलें तरि आपल्या मनावर त्याचा कांहींतरि परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. आह्मांस ज्या प्रमाणें स्वतःची सुधारणा व्हावी असें वाटते त्याप्रमाणें इतरांचीही व्हावी असें वाटतें

ग्र. प.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची ... आगाऊ रु० ५ डाक हशील ०१३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास ......................... ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy.......................................4as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Advertisements R
Below 10 lines...2 as
per line over10...4 as
Repetition per line3a

VOXXVI AKOLA MONDAY 25 APRIL 1892 NO 16
वर्ष २६ सोमवार तारीख २५ माहे एप्रील सन १८९२ इ० अंक १६

## मित भाषण.

( १४ वें अंकावरून पुढें चालूं )

कांहीं एक अनिष्ठ परिणाम झाला नाहीं तरी भाषणांत नियमितपणा नसला म्हणजे समाजाच्या चलनचक्राला अवश्यक निंदा व स्तुति यांचा यथान्याय विनिमय होत नाहीं, व लोकांच्या वर्तनाची योग्य पारख होणें कठीण होतें. जिभेचा उच्छृंखळपणा म्हणजे वेड्या मनुष्याच्या हातांतली नागवी तरवार होय. तिचा उपयोग वेडेपणानें होऊं लागला तर त्या पासून चांगलें काय निष्पन्न होणार आहे! सर्व कृती मूर्खपणाचा बाजार होईल. बोलून बोलून वेळ घालविणें हा दोष आहे व त्यामुळें दुसऱ्याचा उणेपणा बाहेर निघतो तरी याहूनही वाईट परिणाम असा होतो कीं मन फार दूषित होतें, त्यास खऱ्या खोट्याची परवा नसते, व दुसऱ्याची अब्रू, कल्याण इत्यादिविषयीं मनास हर्ष खेद वाटेनासा होतो. अशा बोलक्या उत्पन्न दुर्गुणी स्वभावाविषयीं आपण खबरदारी व परवा ठेवणें आपलें कर्तव्य होय; आणि त्यापासून वर निर्दिष्ट केलेले दुष्टपणाचे व मूर्खपणाचे प्रकार घडतात. तेव्हां ते आपल्या वागणुकींत न येऊं देण्या साठीं आपण दक्ष राहिलें पाहिजे.

आतां जीभ व्यवस्थितपणें ताब्यांत ठेवणें म्हणजे काय अथवा नीतिदृष्ट्या व धर्मदृष्ट्या मनुष्यानें आपली जीभ नीट आवरून धरली आहे असें केव्हां सांगतां येईल या विषयीं विचार करूं.

मनुष्याला कोणत्या कारणानिमित्त नैसर्गिकरीत्या कांहीं गुण व आंगची शक्ति दिलेली असते याचा विचार केला म्हणजे त्या त्या गुणाचा व शक्तीचा खरा व योग्य उपयोग कळून येईल. मनुष्यास बोलतां येतें हें काय म्हणून असा विचार केला तर दिसून येईल कीं भाषणानें दुनियेंतले व्यवहार चालण्यासाठीं परस्परांस मनोगत कळवितां येतात आणि भाषणानें आपलें ज्ञान व विद्या हीं वाढतात. भाषणानें साध्य होतात अशा ह्या अवश्यक गोष्टी होत. शिवाय ईश्वरानें ज्या नानाविध मूर्ति व प्रकृति निर्माण केल्या आहेत व ज्या स्थितींत त्यांस ठेविलें आहे त्या उभयतांस अनुरूप असा सुखास्वाद व संतोषवृत्ति हीं भाषणानेंच प्राप्त होतात. प्रत्येक उपजत गुणाचा व शक्तीचा प्रधान व अप्रधान असा द्विविध उपयोग होतो. प्रधान उपयोगानें आवश्यक कार्यभाग साधतो व गौण तऱ्हेनें आनंद प्राप्ती होते. या दोन्ही परिणामाला सुलभ असेच गुण व शक्ति मनुष्याच्या आंगीं असते; आणि हेंही निःसंशय खरें कीं त्यांचा उपयोग आपलें अस्तित्व चिरंतन होण्या साठीं तसाच आपल्या सुखसमृद्धी साठीं व्हावा असा ईश्वरी संकेत होय. बोलण्याचा गौण उपयोग म्हटला म्हणजे भाषणानें दुसऱ्यास आल्हाद वाटावा व त्याचें मनोरंजन व्हावें हा होय. प्रत्येक प्रकारें ही गोष्ट नक्की अशी नाहीं व फार चांगली आहे. ह्या योगानें मनुष्यांचा मिलाफ होतो, त्यांचा स्नेह संबंध जुळतो व परस्परांच्या सुखदुःखाचा वांटा ऊचलला जातो; आणि पुष्कळ तऱ्हेनें या साधनानें सद्गुण अंगीं येतात व सद्वर्तनाला चांगलें उत्तेजन मिळतें. ह्या सुखवैभवाचा अनुभव मिळण्यासाठीं आपण माफक वेळ खर्ची घातला तर आपली मनदेवता सांगेल कीं आपलें काम ईश्वरास नावडतें नाहीं व धर्माशीं हो असंमत नाहीं. कांकीं भाषणाचा अशा प्रकारें उपयोग सत्कार्याकडे होत आहे व त्यांची दिशा चांगली आहे तेव्हां त्या पासून मनुष्यांचा सांसर्ग, मैत्री, भूतदया सद्गुण, व शिष्टाचार यांची उत्तरोत्तर वृद्धि होत जाईल हें उघड आहे.

उपयोगाप्रमाणें दुरुपयोग ही भाषणा संबंधानें होतो. व्यवहारांत सचोटी नसली म्हणजे काय दुष्परिणाम होतात हें माहित आहे व त्याचा सध्यां आपणास विचार कर्तव्य नाहीं. जिभेचा लगाम आपल्या हातांत असणें म्हणजे फक्त त्याचा भाषणाशीं संबंध पोंचतो; आणि हें भाषण स्नेही सोबत्यांच्या भेटी मध्यें व लोकामधील कुशलप्रश्न व शोध समाचार या मध्यें होत असतें. ह्या भाषणांतून भय हे असतें कीं कदाचित मनुष्याचें शहाणपण व सद्गुण या उभयतांचा लोप होऊन दुसऱ्यास त्रास होतो किंवा त्याची आगळीक होते. या धोक्या पासून मनुष्य अलिप्त व निराळा राहूं शकेल तर मग त्यानें मन मोकळें करून यथेच्छ बोलावें.

वरील संकटांत न पडण्या विषयीं आणि आपलें भाषण निर्दोष व प्रिय करण्या विषयीं दक्षता ठेवण्याची गुरुकिल्ली ही आहे कीं मौन धरावें आणि बोलल्यास सामान्य विषयावर बोलावें म्हणजे त्या मध्यें कोणाच्या वर्तनादि गोष्टीस उद्देशून बोलूं नये.

बोलण्याची वेळ कोणती व मुकें बसण्याचा वेळ कोणती हें शहाण्या मनुष्यांस पक्कें कळून आलें असतें. जगामध्यें आपणास पुष्कळ असे आढळतील कीं त्यांस वरील नियम माहित हीं नसतो. जे बोलके असतात त्यांस जीभ एक सारखी हालल्या शिवाय चैन पडत नाहीं. त्यांच्या अंगी लोकोत्तर गुण असल्या शिवाय त्यांच्या भाषणांत कांहीं गोडी नसते आणि त्यांत त्यांचा हलकेपणा दिसून येतो. दुसरी एक गोष्ट ते विसरतात. कांहीं गृहस्थास मोकळें भाषण फार आवडतें व त्यांस कांहीं या बद्दल दोष देतां येत नाहीं. त्यांचा स्वभाव शांत व विम्मा असतो तेव्हां त्यांच्या म्हणण्या कडे सावधानपणें चित्त ठेवावें लागतें. परंतु ही स्वभावाची खूण न पटल्या मुळें वृथा जल्पना करणाऱ्या कडून मोठ मोठे प्रमाद होतात. तिसरी गोष्ट तर स्पष्ट आहे कीं आपल्या पेक्षां वयोवृद्ध, तपोवृद्ध ज्ञानवृद्ध अशा वडीलधाऱ्या गृहस्थांच्या समवेत आपण असतांना आपणास मौनव्रत धारण करण्याचें शिकलें पाहिजे कांकीं त्यांच्या भाषणांतील विषय गहन व उपयुक्त असून आपल्या अक्कलेच्या बाहेरचा असतो तेव्हां मध्यंतरी आपण तोंड घोलणें प्रशस्त नाहीं. परंतु वास्तविक ही दुःखाची गोष्ट आहे कीं शुष्कवाद करणाऱ्यास स्वस्थ बसणें मरणप्राय होतें. चारचौघांमध्यें येऊन बसण्या उठण्यांत त्यांचा हेतु कांहीं माहिती मिळवावी, बहुश्रुत असावें, व पुष्कळ गोष्टी शिकाव्या अशा प्रकारचा नसतो. त्यांची मनीषा म्हणजे आपण बोलावें, लोकांची मनें वेधून घ्यावीं हा होय आणि त्यामुळें थोर लोकांच्या भाषणाचा लाभ स्वतांस होत नाहीं व दुसऱ्यांचा ही होऊं शकत नाहीं. मागें भाषणानें मनोरंजन कसें होतें तें सांगते वेळीं दाखविलें आहे की भाषणानें संपारांतील काळजी, खटाटोप आणि दुःखें दुसऱ्यास कथन करून मनुष्य आपलें ओझें कमी करितो त्याचा गर्भित अर्थ असा कीं भाषण परस्पर झालें पाहिजे व एकट्याचें कांहीं एक कामाचें नाहीं हें एकमेकाच्या समागमास अवश्यक आहे. एकानेंच आपलें चऱ्हाट लांबच्या लांब लाविलें तर कंटाळा येतो आणि करमणूक होणें बाजूस राहते. सारांश गप्प बसण्याच्या वेळीं गप्प न खाल्यानें दोन अपराध होतात. पहिला लोकांस स्तब्ध राहण्या विषयीं व्यर्थ त्रास होतो आणि दुसरें एकाच्या बडबडण्यानें त्यांचें मन संतप्त होतें.

विनाकारण बोलून वेळ घालविणाऱ्यांस हें ही सांगणें जरूर आहे कीं, त्यांच्या कृतीनें ते लोकांच्या मनांतून उतरतात व लोक त्यांस कमी दर्जाचे लेखितात इतकेंच नाहीं तर त्यांनीं कांहीं चांगली गोष्ट सांगितली तरी सुद्धां लोक त्यांच्या म्हणण्या कडे दुर्लक्ष करितील. पुष्कळ प्रसंगीं कांहीं बोलावयाचें नसतें म्हणून स्वस्थ राहावें व कांहीं प्रसंगीं बोलतां येऊनही तें न बोललें तर बरें असतें. कारण त्या पासून बरोबरच्या मनुष्यास प्रतिबंध होत नाहीं, दुसऱ्याच्या भाषणास आड येणें होत नाहीं, आणि स्वतांसही सुख होतें.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य १४ शके १८१४

वऱ्हाडांतील फारेस्ट खात्याच्या अभिवृद्धीचा सन १८९०-९१ सालचा रिपोर्ट कमिशनर, रेसिडेंट, व हिंदुस्थान सरकार या तिघांच्या अभिप्रायासह नुकतांच प्रसिद्ध होऊन त्याची एक प्रत मामूल वहिवाटी प्रमाणें रेसिडेन्सी आफिसांतून आम्हाकडे आली तिचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करितों. हा रिपोर्ट इतर सर्व रिपोर्टांच्या शेवटीं येण्यास मुख्य कारण कीं हा रिपोर्ट वेगळा हिंदुस्थान सरकारच्या अभिप्रायासाठीं धाडावा लागतो तेव्हां तो तीन ठिकाणीं जाई पर्यंत फार विलंब होतो. मि. डिकनसन आफि० कानसरव्हेटर यांनीं हा रिपोर्ट लिहून कमिशनर साहेबांकडे गेल्या सालीं जूनच्या २९ व्या तारखेस रवाना केला. पुढें सुमारें एक महिन्यानें म्हणजे तारीख २४ जुलई सन १८९१ रोजीं कमिशनर साहेबांनीं त्यावर आपला अभिप्राय देऊन रेसिडेन्ट साहेबांस तो सादर केला. नंतर आगष्ट २७ तारखेस रेसिडेन्ट साहेबांनीं सदरहू रिपोर्टांतील मुख्य मुख्य गोष्टी विषयीं उल्लेख करून एकंदरीनें फारेस्ट खात्याचा संक्षिप्त वृत्तांत तयार केला आणि या वृत्तांतासह सर्व रिपोर्ट हिंदुस्थान सरकारच्या पसंती साठीं रवाना केला. तेथें हा रिपोर्ट पांच महिने पावेतों हिंदुस्थान सरकारच्या अवलोकना साठीं पडून राहिला होता आणि तारीख ६ फेब्रुवारी सन १८९२ रोजीं हिंदुस्थान सरकाराकडून रिपोर्ट मंजूर होऊन त्यांच्या शेऱ्यादोऱ्या सहित वऱ्हाडच्या रेसिडेन्सी कडे परत धाडण्यांत आला. नंतर हा रिपोर्ट सर्व वरिष्ट अधिकाऱ्यांच्या टिप्पणा सहीत छापला जाऊन एप्रिलच्या मध्यंतरीं प्रसिद्ध झाला. सारांश १८९०-९१ सालचा रिपोर्ट तयार होऊन प्रसिद्धीस येई पावेतो बहुतेक १८९१-९२ सालच्या रिपोर्टाला लागण्याची वेळ आली. वऱ्हाडांतील इतर खात्यांचे रिपोर्ट तयार झाल्या पासून बहुतेक पांच सहा महीन्यांचे मुदतींत लोकांच्या समोर येतात परंतु या फारेस्ट खात्याच्या रिपोर्टांची रवानगी एका पायरीनें वाढविल्या मुळें एवढा विलंब लागला. ही सविस्तर माहिती देण्याचा हेतु असा कीं हिंदुस्थानांतील राज्यकारभारांचीं सूत्रें फारच फार लांबवर गुंतवून ठेविलीं असल्या कारणानें व एका गोष्टी साठीं मंजुरातीच्या पायऱ्या बहुत चढाव्या लागून अती उंचीवर जावें लागत असल्या मुळें सर्व राज्यकार्यें सुरळित, व जरूर चालण्यास नानाविध अडथळे येऊन मनस्वी विलंब लागतो अशी राष्ट्रीय सभेची ओरड आहे तिची यथार्थता दाखविण्या साठीं वरील मासले वाईक उदाहरण दिलें आहे.

सन १८८६ च्या वऱ्हाड फारेस्ट कायद्याच्या अन्वयें फारेस्टाचे निरनिराळे वर्ग करून त्यांच्या साठीं नवीन नियम रचण्यांत येऊन ते हिंदुस्थान सरकारच्या अखेर मंजुरात्री करितां रवाना झाले आहेत. १८९१

ऱ्या आरंभीं अलिशान रेसिडेंट सर डेनिस फिटझ प्याट्रीक या प्रांतांत फिरत होते त्या वेळीं त्यांनीं वरील नियमाबद्दल वाटाघाट करून त्यांत आणखी कांहीं शोध व फेरफार केले आणि त्या वरून एक खर्डा तयार करून तो पुढें हिंदुस्थान सरकार कडे धाडून दिला. हा कायदा अद्याप पसार झाला नाहीं तरी तो लवकरच पसंत होऊन अंमलबारी साठीं थोड्या अवकाशांत इकडे रवाना होईल असे या रिपोर्टांत आश्वासन देण्यांत आलें आहे.

वरील कायदा अंमलांत अजून आला नाहीं म्हणून फारेस्टाचे जुने वर्ग तीन्ही कायमच आहेत. पहिला वर्ग म्हणजे आंखलेल्या स्टेट फारेस्टाचा होय. स्टेट फारेस्टाचा विस्तार १०५९ चौरस मैल होता तो ७७ चौरस मैलांनीं वाढला आहे. मुख्यत्वें करून जिल्ह्याच्या मोकळ्या जागांतून ४७८२० एकर जमीन स्टेट फारेस्टांत सामील करण्यांत आल्या मुळें ७७ चौरस मैलांनीं फैलाव मोठा झाला आहे. दुसऱ्या वर्गांत म्हणजे जिल्हा बंदी फारेस्टांत सध्या १०१२ चौरस मैल जंगल आहे आणि तिसऱ्या वर्गांत म्हणजे जिल्ह्याच्या मोकळ्या फारस्टवें जंगल २२४८ चौरस मैल होतें तें रिपोर्टाच्या वर्षी २१३६ चौरस मैल राहिलें आहे. हीं तिन्ही वर्गांचीं फारेस्टें मिळून एकंदर ४२८४ चौरस मैल आहेत आणि प्रांतांतील सर्व जमीनीच्या विस्तारांशी या फारेस्टाच्या जमिनीचा विस्तार ताडून पाहिला असतां शंभर चौरस मैल प्रांताच्या भागांत २४.१ चौरस मैल फारेस्ट असें प्रमाण पडेत. एकंदर प्रांताच्या मानानें एक चतुर्थांश जवळ जवळ फारेस्टाचा विस्तार आहे आणि या फारेस्टाचा उपयोग चांगला होऊन किफायत वाढावी म्हणून सक्त नजर व देखरेख ठेवितां येण्याच्या सोयी करण्या करितां स्टेट बंदी जंगल म्हणून निराळा भाग काढण्या विषयीं योजना चालल्या आहेत. मोकळ्या जंगलाच्या सदरास बुल्ढाणा जिल्ह्यांतील वनचराईचें जंगल ७९१५३ एकर १८९०–९१ साला पर्यंत दाखविलें जात असे तें या वर्षी जमेस धरून नांवें वाशिम जिल्ह्यापैकीं ९६८९८ एकर नांवें घातले आहेत. या दोन्ही आंकड्या विषयीं कमिशनर साहेब व रेसिडेंट साहेब या उभयतांस अधीक खुलासा पाहिजे होता कां कीं या मोठ्या आंकड्यांची कांहीं तरी कोठें चूक झाली असावी अशी त्यांस शंका आली आहे व या शंकेचें समाधान बहुतेक यंदाच्या रिपोर्टांत होईल असें आम्हांस वाटतें.

---

"वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि लोकोत्तरणांचेतांसि को नु विज्ञातुमर्हति–"

लोकोत्तर सद्गृहस्थांची वृत्ति ताडणें आत्रेयी वगैरे तपस्वी स्त्रियांना अगर वासंती प्रमाणें वन देवतांना जाणतां आली नाहीं. याचा आह्मांस मुळींच चमत्कार वाटत नाहीं या महिना दोन महिन्यांत ज्या विलक्षण विसंगतवार तऱ्हें शाळाखात्यांतील कांहीं जागा भरल्या गेल्या आहेत त्या योगानें प्रत्येक निःपक्षपाती व विचार करण्या सारख्या गृहस्थास चमत्कार वाटत आहे. व या संबंधानें आह्माकडे ओतप्रोत पत्रव्यवहारही जमला आहे. ज्यांनीं आजवर निष्कलंक यशच संपादन केलें, आपल्या सदय वृत्तीनें सर्वांच्या अंतःकरणांत पितृवात्सल्यानुरूप अशीच जागा संपादली, आपल्या लोकोत्तर बुद्धिचातुर्यानें व न्यायीपणानें एतद्देशीय निष्पक्षपातदंशनात्मक गुणाची कोणासही व्याधि होऊन देतां तज्जन्य रोगावर रामबाण वैद्याची महार्हता संपादन केली अशांच्या हातून सहसा अन्याय होणारच नाहीं व जर कदाचित घडलाच तर एका उदाहरणानें सार्वत्रिक चांगुलपणावर पाणी घालणारे क्षुद्रदर्शिजनानें धरावें हें उपहासास्पद व लाजिरवाणें आहे. याच कारणामुळें आमच्याकडे जमा झालेल्या निःस्पृह परंतु कोत्या विचाराच्या पत्रव्यवहारांचा प्रस्फोटच करावा लागला हेंच उत्तर आह्मी अलिकडे धारण केलेल्या इतर ठिकाणच्या वर्तनावरील ही आमच्या वरील आक्षेपांस आहे. कोणी असा अक्षर काढीत आहेत कीं, शाळाखात्याचे अधिकारी होमीओपॅथिक औषधिपंथ तुल्यं तुल्येन शाम्यति याच तत्वानें अन्यायोऽन्यायेन शाम्यते असें तत्व धुमडून देऊं पहात आहेत व हाच आक्षेप कित्येकांनीं आमच्यावरही आणला आहे ज्या प्रमाणें आपची हल्लीची मौनवृत्ति सकारण आहे त्याचप्रमाणें इतर प्रसंगींची मौनवृत्तिही सकारणच आहे इतकें आमच्या वाचकांस सांगणें आज आह्मांस इष्टच आहे असें वाटल्यावरून लिहिलें आहे.

हें खरें आहे कीं शाळा खात्यांत अगोदर जागा फार थोड्या. तशांत नोकरीच्या दिग्विक्रयानें एका दिवसाचें देखील अधिक्य बराच फरक पाडतें. उदाहरणार्थ मि० महाजनी व मि० तळवळकर यांच्या नोकरींत थोडे महिन्यांचा फरक असून या उभयतांच्या उत्पन्नांत व अधिकार स्थितींत केवढें वैरूप झालें आहे हें दिसतच आहे. त्याच प्रमाणें या उष्ण व खडतर हवेंत प्राथमिक हलक्या पगाराच्या पर प्रांतांतून आणलेल्या नोकरांस किती अडचण व हाल काढावे लागतात हेंही सर्वांस अवगतच आहे एक होतकरू गृहस्थ वऱ्हाडस्थ असून पि० इ० झालेले असूनही दोन वर्षें इंग्लिश टीचरच राहिले याचें तरी कारण "हेंच–कष्टो जनः कुलधनैरनुरंजनीय" हें रामभद्र वाक्य प्रत्येक महत्कवि प्रकरणांत आढळतेंच आढळतें. लोकतंत्राधिकारी कर्तव्यैच विद्यामूलक आहेत सबब अशा प्रकारचा भ्रांतिमूलक समज आपणा विरुद्ध झाला याचें लोकव्यवहार निपुणांना आश्चर्य न वाटतां 'न्यायपात्पथः प्रविचलन्ति पदं न धीराः' असेंच आचरण ते नेहमीं ठेवतात. बाकी ज्या गृहस्थांस हल्लीं विसंगतपणा झाला असें वाटत आहे त्यांनीं सूक्ष्म विचार केला नसून आपणांस अन्य हृदयानुमानप्रेक्षण स्थितींत घालून घेतलें नाहीं हें उघड आहे.

---

'भिषग्विलास' नांवाचें मासीक पुस्तक चालूं एप्रिल पासून सोलापूरास नवें निघूं लागून त्याचा पहिला अंक आह्माकडे आला आहे त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. वर्षाची अगाऊ वर्गणी ३ रुपये आहे. वैद्यक विषयावर हें दुसरें मासिक पुस्तक असून पहिलें 'आर्यभिषक्' नांवाचें मुंबईस निघत असतें. 'आर्यभिषक्' आपलें काम चांगलें बजावीत आहे त्याच प्रमाणें 'भिषग्विलास' ही बजावील अशी आह्मास त्याच्या पहिल्या अंका वरून खात्री वाटते. या नव्या पुस्तकाची भाषा सरणी व विषय विवेचन हीं पहिल्या अंकात आहेत तीं पाहून सर्वांनीं यथाशक्ति आश्रय देण्यास विसरूं नये.

---

मि० आल्फ्रेड वेब नार्टन बारिस्टर– मद्रास व राष्ट्रीय सभेचे पुरस्कर्ते हे गेल्या मंगळवारी विलायतच्या आगबोटीनें मुंबईहून रवाना झाले. मुंबईस राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं त्यांच्या सन्मानार्थ एक मोठी सभा भरविली होती त्या वेळीं बोलतांना ते मोठ्या वीरश्रीनें म्हणाले कीं ह्यूम साहेबांचें सरक्यूलर राजद्रोहाचें नसून पूर्ण राजनिष्ठेचें आहे आणि हिंदुस्थानच्या लोकांनीं राष्ट्रीय सभेचा वाद जिंकण्या साठीं कंबरा बांधून नेहमीं उद्युक्त असलें पाहिजे

---

# The Berar Samachar

MONDAY, APRIL 25, 1892

It is a pleasure indeed to read Sir Raymond West's speeches. It is education itself to read, learn, and inwardly digest them. Before he left India for good he was for the last month a prominent figure before the public of Bombay and Poona. Honours, distinctions and farewell addresses showered on him in profusion and he was no unworthy recipient of them all. His long service in India is marked with large sympathies and real interests in the cause of progress and amelioration of humanity. He was a specialist in educational matters. He let slip no public occasion to make a world of them. On Monday last he presided at a meeting where Mr. Darab Sanjana delivered a lecture on 'the position of Zorastrian women in ancient times.' It was there that he delivered his last public speech in India. The subject of the lecture promptted him to instruct his audience with his liberal and sincere views on female education. That a woman is man's equal he never hesitated for a moment to declare and he was most explicit and eloquent to present a bright and a joyous picture of female activity. From the Zorastrian woman in ancient times he drew a parallel in connection with the Vedic times. He referred to the histories of Greece and Rome to illustrate what the position of a woman ought to be in all walks of life. He earnestly and devoutly asked his hearers to preserve that something in a marriage bond which is both divine and human. The sense of sanctity in marital rights should prevail in all its force and entirety. In the progress of organization and refinement that man and wife should live in full view of that holy union it is inevitably necessary for the social well-being of the community. Home is a misnomer where these requirements are wanting. Where husband and wife are not agreeable consorts in life there is a opening for dissoluteness and licentiousness: and one can not guess how far the degradation may spread when these vices get the upper hand. He philosophised on the degradation to which a woman was brought down by the ancient Romans when they were rolling on the decline to sink in ruin and total extinction.

'He rather thought that no matter how accomplished the women might be and whatever advantage they might derive from their independence and possession of property and their capacity to rule their own interests if they had no husband with authority in reserve, no domination but kind hand to exercise control or command over their moral nature, they almost inevitably sank and their moral nature having fallen, the whole characters of the nation they belonged to also shared the degradation.'

In the 15th century when there was a revival of learning and Christianity a change slowly came on and men realized their duties to the other half of the humanity. In Itally the development of faculties in women reached such a high pitch though it was altogether one sided that ladies occupied the chairs of professors. At the beginning of the present century women became well stocked in religious ideas and found in them 'a brand held out, a stay to lean on, and a welcome voice of sternness commanding a pursuit of higher aims.' The great value of worthy human life was better fitted out and then followed in its train a spirit of equality in spiritual, moral, and emotional phases of life. Sir R. West spoke with firm convictions when he said there is no perfect theory yet propounded so as to define the bounds of a befitting education to womankind. To instruct women in mere learning is not sufficient. A girl ought to be taught to fill a station which she is to occupy as a wife or mother. Let us grasp a firm hold of the equality which is claimed for women in education. In the words of the honourable gentleman 'equality of education does not mean identity of education as between women and men. It means a recognition of some great differences and an equal unfolding of the gifts of each sex. A woman's education must, in a measure, be supplemental or, if they would have it, complemental to the education of the man.' In the ennobling sentiment of Shakespeare it is further expressed that he is the half part of the nobleman and she a fair divided excellence whose fulness of perfection dwells in him. Sir R. West then attempted to chalk out the lines on which female education should be pursued. The concluding portion which is a high flight in the sublime we quote in full *extenso*:—

'One thing is certain—that greater attention must be paid to the moral and emotional, the imaginative and spiritual faculties in women than in men. Their intellectual development often depended on it and all their gifts were mingled in a complexity very different from the standard male character to which male education was adopted. Religion tenderness, admiration of high ideals, a love of self-sacrifice were all of comparatively easy development in well-disposed girls. A woman who had thus brought up became a centre of moral light radiating noble sentiments and high feelings in the families which she was to rear & take care of in afterlife—a teacher of truths and principles treasured as sacred by her children and linked in their memories for ever with all that was hallowed and revered in the past. Thus with knowledge and power in their hands the fathers of Indian women might make the center of enlightenment and greater men and greater women would spring up, a crowning race of humankind mightier & nobler than any they had seen in the past."

---

The following paragraphs from the Progress report of Forest administration in Berar are a sufficient commentary in themselves in connection with grazing and the measures that are under consideration to provide for it. We are glad to notice that the then Commissioner Mr. Plowden has earnestly taken some steps to remedy the grievances with respect to the grazing of

cattle and we hope that his worthy success or will not show less zeal and energy in looking after the welfare of the agricultural cattle. The officiating Conservator of Forests writes thus in his report on this subject:—

"No grazing was permitted in any of the Demarcated State Forests except in those in the Buldana District, where as stated in paragraph 49 of last year's Report, it is thought that it will be necessary to allow grazing owing to the paucity of other grazing land in that District. It is proposed, however, to introduce a grazing rotation in order to give reproduction a better chance.

"The future management of the grazing Lands formed the subject of a note by the Resident. It had been proposed to to resume the free-grazing lands which are tracts which were given at the settlement in villages where land was available for free grazing. The tracts are, from the nature of things, very unequally distributed; some villages have enough and to spare, whilst others have none. To remedy this state of things, it was proposed to resume the free-grazing tracts and in lieu allow free-grazing in any Government grazing land to a certain proportion of plough cattle to all.

"The scheme was introduced into three Districts, namely, Wun in 1884, and Amraoti and Ellichpur in 1885, and works fairly well. Objections were, however, raised to its introduction into the other Districts on the score that the resumption of the free-grazing lands would be a breach of faith, and on the whole it is thought better to leave matters *in statu quo* until the revision of the settlement.

"The people who are worst off in the matter of grazing are those in the open country at long distances from the grazing tracts, and the concession to plough-cattle would not be of much use to them as it does not pay them as a a rule to send their cattle to the grazing lands.

"The great want of grazing that in the open parts of Berar has probably in a measure led to the large areas being thrown out of cultivation, commented on by the Resident in paragraph 4 of his order on the Revenue Administration Report of the Hyderabad Assigned Districts for 1889 90. There is no doubt that any compact blocks that can be made available for grazing in those portions of the country would be a great boon to the people."

The Commissioner in his review of the report takes a note of the above remarks in his usual aconic style:—

"The question of the provision of grazing land and of its management is one that will occupy the attention of forest and revenue officers for some years to come. The policy to be followed, particularly in the treatment of the present free-grazing lands, will require careful consideration with reference to the actual circumstances of each district."

## वऱ्हाड

सरकार तर्फे नेमलेल्या वाशिम मुनसिपाल कमिटीच्या तिन्ही सभासदांची मुदत संपल्या वरून जुन्याच तिवे जणांस ह्मणजे डेपुटी कमिशनर, सिव्हिल सर्जन, व तहशीलदार यांस पुन्हां सभासद नेमण्यांत आले.

तारीख १६ एप्रिलच्या ' रेसिडेन्सी आरडर्स ' मध्यें निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या ताब्यांतील कोडतांच्या दर्ज्यां संबंधानें पद्धतवार व नांवनिशी सुद्धां हुकूम काढण्यांत आला आहे तो असाः— सन १८८९ साल्चा मुलूख अमानी हैदराबाद कोडतांचा कायदा यांतील कलम ८ वें व २० वें या अन्वयें आलिशान साहेबांनीं तारीख २८ आक्टोबर १८९० चा हुकूम रद्द करून असिस्टंट कमिशनर, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर आणि तहशीलदार यांच्या कोडतां विषयीं येणे प्रमाणें ठराव केला आहेः—

असिस्टंट कमिशनर्स—क्याप्टन जे. जी. मारिस, मि. सी. ए डब्ल्यू. डेव्हिस, खान बहादुर सय्यद शमसूद्दीन अली, क्याप्टन आर. व्ही ग्यारेट, पंडित सुरज नारायण, कुमार श्री हरबानजी रावजी, क्याप्टन सी. चामियर मि. रुस्तुमजी फर्डूमजी; आणि एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर्स—मेसर्स बंधुजी जनार्दन अयोध्या प्रसाद, देवराव जयकृष्ण, वि० ना० दांडेकर, सी. एच. प्राइस, माणिकशा रतनजी, आरदेसर दिनशाजी, वा. ना. बापट, आर. म्यागिल, केशव जयकृष्ण, अंबादास संतो, एदलजी जमशेटजी, गोविंद राज, जे. ओंग्रेडी, गणेश बापूजी आणि शापूरजी विरजी—या चोवीस अंमलदारांच्या कोडतांचा दर्जा असिस्टंट कमिशनर वर्ग १ चा समजावा.

असिस्टंट कमिशनर्स मेसर्स गाडविन आस्टीन, व एफ्. डब्ल्यू प्रिडो आणि एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर्स मेसर्स इ मार्शल, मीर मुबारकअली, मीर सफदरअलीबेग, मुनशी अजिजुद्दीन—या सद्गृहस्थांची कोडतें असिस्टंट कमिशनर वर्ग २ चीं समजावीं.

आफि० एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर मि. शेखमहमद इस्मायल यांच्या कोडतास असिस्टंट कमिशनर वर्ग ३ चा अधिकार आहे.

अव्वल्चीं मेसर्स सी. शामराव, हैदरअली खान इशमतअली; आणि तहशिलदार मेसर्स गोविंदराव यशवंत, नारायण पांडुरंग सादत मीरखान, गिरराव रामचंद्र, कृष्णाजी हरी, गणेश गोविंद, वामन गणेश, कृष्णाजी अनंत अहमद अली, यशवंत महादेव, बळवंत बापूजी, गोविंद गंगाधर, बाळकृष्ण बळवंत सुळे, एकनाथ मोरेश्वर — या सतरा गृहस्थांच्या कोडतांस तहशिलदार वर्ग १ चा अधिकार आहे.

सदर्हू यादींत असिस्टंट कमिशनर किंवा एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर पैकीं ज्या कोणाचा नाममात्रें उल्लेख नाहीं त्यांच्या कोडतास असिस्टंट कमिशनर वर्ग ३चा अधिकार आणि त्याच प्रमाणें ज्या कोणा तहशिलदाराचे व्यक्तिभेदानें नांव दिलें नाहीं त्याच्या कोडतास तहशिलदार वर्ग २ चा अधिकार. असि० कमिशनरचे कोडताचा अधिकार तो ज्या जिल्ह्यांत असेल त्या जिल्ह्यांत आणि तहशिलदाराचे कोडताचा अधिकार त्याच्या त्याच्या तहशिलीचे हद्दींत चालविला जाईल.

अकोला, उमरावती, इलिचपूर आणि वणी या चार जिल्ह्यांतील डे० क० चे कोडताचे ताब्यांतील कोडतातून झालेल्या अव्वल दिवाणी दाव्यांच्या फैसल्या वरील अपिलांचा निकाल करण्या साठीं सिव्हिल आणि सेशन जजाचें काम पाहणारा अधिकारी यांस डेपुटी कमिशनरचे कोडताचा अधिकार देण्यात आला आहे आणि या प्रकारें हें दिवाणी कोडत फक्त जुडिशिअल कमिशनरचे कोडताचे अधिकारा खालीं आणि ताब्यांत समजलें जाईल.

क्याप्टन जे. जी. मारिस, मि. सी. ए. डब्ल्यू. डेव्हीस, खान बहादुर सय्यद शमसद्दीन अली, पंडित सुरज नारायण आणि कुमार श्री हरबानजी या गृहस्थांस डेपुटी कमिशनरचे ताब्यांतील कोडतांतून झालेल्या अव्वल दिवाणी दाव्यांच्या फसल्या वरील अपिलांचा निकाल करण्या साठीं डेपुटी कमिशनरचे कोडताचें अधिकार देण्यांत आले आहेत.

मे० जुडिशिअल कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट रा. रा. बळवंतराव कावळे यांनीं तीन महिन्याची रजा घेतल्या वरून त्यांच्या जागीं शेवटी मोर्शीचे अक्टिंग तहशीदार रा. रा त्रिंबक गणेश परांजपे यांस नेमलें. व त्यांच्या जागीं चांदूरचे नायब तहशीलदार यांस नेमलें.

खामगांवचे नायब तहशिलदार रा. रा. रामचंद्र भास्कर जयवंत यांची बढती उमरावती स्माल काजचे क्लार्क आफ कोर्टचे जागीं झाल्या कारणानें त्यांच्या जागीं रा. स. लक्ष्मण नागेश गोखले डेपुटी क्लार्क आफ कोर्ट यवतमाळ यांस नेमून यवतमाळास येथील रा. रा. रंगनाथ विष्णु यांस नेमलें.

येथील रहिमखा नांवाच्या सौदागिरानें खोटी साक्ष दिल्याचे आरोपा वरून मि दांडेकर यांजपुढें चौकशी होऊन आरोपी सुटला होता परंतु हायकोडताची तपासणी झाल्यावरून मे. डेपुटी कमिशनर यांज कडेस पुन्हा निर्णया करितां सदर्हू खटला आला होता त्यांत रहिमखा यास चौकशी अंतीं एक वर्ष सक्त मजूरीची शिक्षा होऊन ती सेशन अपिलांत ही कायम राहिली.

रा. रा. गणेश अनंत वैद्य डायरेक्टरचे हेडक्लार्क यांस एक वर्षाची फर्लो रजा दिल्या वरून त्यांच्या जागीं रा. रा. तात्या बाळाजी कुंटे यांस नेमून पुढील नेमणुका आफिसांतल्या लोकांस बढती न देतां करण्यांत आल्या.

परवा रात्रीं येथील दत्तप्रसाद स्त्री संगीत नाटक मंडळीनें 'संमतीवयाच्या कायद्याच्या दुष्परिणामदर्शन नाटकाचा दुबार प्रयोग करून दाखविला. खेळ चांगला झाला व प्रेक्षक समूह ही मोठा होता.

येथील श्री राजेश्वर संस्थानाला देणगी देण्या साठीं वरील नाटककार मंडळी आज रात्रीं संगीत गोधर्म विवेचन नाटक करून त्याचें सर्व उत्पन्न देवाला अर्पण करणार आहे तेव्हां लोकांनीं करमणुकीची व ईश्वरसेवेची ही अमोल संधि दवडूं नये. विद्यार्थ्यां करितां निम्मा दर ठेविला आहे.

वऱ्हाड प्रांताची नवी मोजणी व जमाबंदी होऊन सारा वाढला जाऊं नये ह्मणून आलिशान रेसिडेंट साहेबांकडे सहस्त्रावधि लोकांच्या सह्यांचा अर्ज दहा बारा गृहस्थांच्या कमिटी मार्फत सादर करण्या विषयीं सार्वजनिक सभेचा विचार आहे.

रा. रा. आनंदराव पोस्ट-मास्तर संबळपूर हे थोड्या रजेवर वऱ्हाडांत येऊन परत येत्या पहिल्या तारखेस आपल्या कामावर रुजूं होण्यासाठीं अकोल्याहून पुढें रवाना झाले. हे खामगांवास व अकोल्यास पोस्ट—मास्तर असतांना त्यांचे सरळ वर्तन, गोड भाषण व मन मिळाऊ स्वभाव यांनीं ते इकडे चांगले लोकप्रिय असत.

रा. रा. वासुदेव सदाशीव पिसोळकर एक्स्ट्रा असि० कमिशनर यांच्या एक महिना व अठ्ठावीस दिवसांच्या रजेंत त्यांच्या कामावर हैदराबाद सेशन जजाचे क्लार्क आफ कोर्ट रा० रा० सखाराम आत्माराम अधिकारी यांस नेमलें.

क्याप्टन जे जी मारिस मे. सी.ए. डब्ल्यू डेव्हिस, शमसुद्दीन, सुरजनारायण, कुमार श्री हरबानजी, क्याप्टन आरव्ही ग्यारेट, क्याप्टन सी. चामियर, मे. बंधुजी जनार्दन, देवराव जयकृष्ण, मुनशी अयोध्या प्रसाद, वि. ना. दांडेकर, सी. एच प्राईस, माणिकशा रतनजी, आरदेसर दिनसाजी, वा. ना. बापट, आर. म्यागिल, केशवराव जयकृष्ण, अंबादास संतो व एदलजी जमशेटजी या एकोणीस गृहस्थास पांच हजार रुपये किंमतीहून अधिक किंमतीच्या कोणत्या ही अव्वल दिवाणी दाव्याचा निवाडा करण्यासाठीं डेपुटी कमिशनरचे कोडताचा अधिकार देण्यांत आला असून वरील पैकीं जो इसम ज्या जिल्ह्यांत असेल त्या जिल्ह्यांत त्यानें हा अधिकार चालवावा.

मेसर्स डेव्हिस, मारिस, शमसुद्दीन, ग्यारेट, सुरजनारायण, श्री हरबानजी, चामिअर, देवराव जयकृष्ण दांडेकर, माणिकशा आरदेसर, बापट, म्यागिल, केशवराव जयकृष्ण अंबादास संतो, संजाना, गोविंदराज यांस पांचशे रुपये, सी. एच. प्राइस, मुबारक अली, शापूरजी यांस शंभर रुपये, आणि जे. ओग्रेडी यांस पन्नास रुपये या अनुक्रमें पांचशें, शंभर व पन्नास रुपये पर्यंत दावे चालविण्याचा स्माल काज काज कोडताचे न्यायाधिशाचा अधिकार दिला आहे.

मि. डब्ल्यू. एच. डागे आफि० कन्ट्रोलर हैदराबाद यांस मे च्या १४ वे तारखे पासून १ महिना २२ दिवसांची हक्काची रजा देऊन त्यांच्या जागीं असि० कन्ट्रोलर मि. प्रिचर्ड यांस नेमण्यांत आलें.

मंगरूळ तालुका बोर्डाचे सभासद मि. अनवरअली यांनीं राजिनामा दिल्यावरून त्यांचे जागीं रा० रा० बळवंत बापुजी तहशीलदार—मंगरूळ यांस सभासद नेमलें.

वाशिम मुनसिपालिटीचे सभासद रा० रा० भालचंद्र विनायक निवर्तल्यामुळें त्यांच्या जागीं रा० रा० काशीराव यांस निवडण्यांत आलें.

रा० रा० गीरराव रामचंद्र तहशीलदार इलिचपूर यांस दीड महिन्यांची रजा गेल्या पंधरावे तारखेपासून मिळाल्यामुळें त्यांच्या रजेंत रा० रा० नारायणसिंग बभुतासिंग नायब तहशीलदार—दर्यापूर यांस आक्टींग तहशीलदार नेमलें.

उमरावती हायस्कूलच्या विद्यार्थी मंडळीनें मृच्छकटिक नाटकाच्या पहिले चार अंकांचा संस्कृतांत प्रयोग बसविला आहे आणि तो प्रयोग काल रात्रीं उमरावतीस होणार होता त्या प्रमाणें झाला असावा. संस्कृत नाटका नंतर प्राकृत जनांच्या करमणुकी साठीं मराठींत एक फार्स ही पूर्वसंकेता प्रमाणें झाला असेलच. विद्यार्थ्यांकडून नाटक प्रयोग करविण्याचा उमरावती हायस्कूलच्या शिक्षक वर्गानें चांगला पाठ घालून ठेविला आहे. ग्रंथपठण, नाट्यकलेंत सहृदयता, सभाधीटपणा, वाणीवर सुसंस्कार, इत्यादि गोष्टी प्राप्त होऊन एके प्रकारें भिन्न भिन्न रुचीच्या अल्पवयी मुलांना एक आनंदकारक व सुखबोधाचें शिक्षण मिळतें.

## वर्तमानसार.

अमेरिकेंतील एका वसाहतींत एका शिष्यास फांशीची शिक्षा झाली. तेव्हां वसाहतीतील सर्व लोकांनीं असा अर्ज केला कीं, 'आह्मांस एवढाच शिंपी आहे. तेव्हां त्यास फाशी देऊं नये. आमच्या वसाहतींत दोन सुतार आहेत, त्यांपैकीं एकास हवा तर फांशी द्या.'

डॉ० रिचर्ड जेम्स मारीसन यांनीं असें वर्तविलें आहे कीं, चालू सालांत हिंदुस्थानांत मोठमोठ्या लोकांचे मृत्यु होतील. विशेषतः हिंदुस्थानांतील अतिशय मोठ्या सरकारी कामदारांस धोका पोंहचण्याचा संभव आहे.

क० त०

पार्लमेंटची निवडणूक—असें ह्मणतात कीं, येत्या जून किंवा जुलै महिन्यांत पार्लमेंट सभेच्या सभासदांची निवडणूक होईल.

कोणापासून काय शिकावें?—एक सिंहापासून गुण शिकावा ॥ बकापासूनही एक तसा घ्यावा॥ तीन गुण कीं संग्राह्य गर्धभाचे॥ तेंवि कुक्कुट गुण असती चार साचे ॥१॥ पांच असतील गुण पहा वायसाला ॥ श्वान शिकवी गुण सहा आपणाला ॥ असे एकंदर वीस गुण शिकावे ॥ तेवि कैसे या पुढें ते पहावे ॥ २ ॥ अल्प किंवा तें असो महत्कार्य ॥ साध्य करणें यत्नेंच जाण वर्य ॥ मधें आली जरी विघ्नशतें त्यांची॥ नसे पर्वा ही प्रकृती मृगेंद्राची ॥ ३ ॥ इतर इंद्रिय व्यापार थांबवूनी ॥ इष्ट कार्यी निजचित्त समर्पूनी ॥ सहित करणें संसाद्य गुण बकाचा ॥ साधकानें हा जरूर शिकायाचा ॥ ४ ॥ अतिच कष्टाळू तसा सहनशील ॥ महासंतोषि असे सर्व काल ॥ तीन गुण हे घ्यावेत गर्धभाचे ॥ कधीं पाविना मनुज, अपयशाचें ॥ ५ ॥] प्रातरुथान प्रसंगास झुंज ॥ सांचवोनी कण जवळ करी पुंज ॥ बांधवासह संग्रहित सुखें खावें ॥ कुक्कुटाचे गुण चार हे शिकावे ॥ ६ ॥ गुप्त कर्मा संग्रही सावधान ॥ यथाकालीं संग्रही सावधान ॥ या परी हे गुण पांच वायसाचे ॥ आत्महित तसरा ग्राह्य साचे ॥ ७ ॥ स्वल्प संतोषी प्रसंगीं अधाशी ॥ शूर मोठा बहु इमानी धन्याशीं ॥ महा सावध निद्रालु तसा आहे ॥ श्वान याचे ह्मी सहा गुण शिका हे ॥ ८ ॥ या परी हे गुण वीस या सहांचे शिकुनि घेतां कल्याण हो नरांचे ॥ क्षुद्र ह्मणुनि धि:कार न करावा ॥ चांगला तो गुण कोठुनीहि घ्यावा ॥ ९ ॥

यंदा चार ग्रहणें लागणार आहेत ह्मणून समजतें. एक एप्रिलच्या २६ व्या तारखेस पूर्ण सूर्यग्रहण लागणार आहे. दुसरें मेच्या १२ तारखेला चंद्रग्रहण लागणार आहे. तिसरे आक्टोबरच्या २ऱ्या तारखेस पुनः सूर्य ग्रहण आहे. चौथे नोवेंबरच्या ४ थ्या तारखेस पूर्णचंद्र ग्रहण आहे. ह्या प्रमाणें यंदाच्या सालात दोन सूर्य ग्रहणें व दोन चंद्र ग्रहणें लागायाचीं आहेत.

तीन रंगी हिरा—युरोपांत एक हिरा आहे. तो दिवसांतून तीन वेळा आपलें रंग पालटतो! सकाळीं निळा; दुपारीं पांढरा, आणि रात्रीं काळा! या हिऱ्यांत कोणकोणते मिश्र-पदार्थ आहेत, ते अलीकडील शास्त्रज्ञ लोक कळवितील काय?

न्या. सि.

अमेरिकतील प्रसिद्ध एडिसन नामक शोधकानें एक घड्याळ केलें आहे त्यांत दर पाव अर्ध्या, अशा तासास अमूक वाजले असे इंग्रजींत स्पष्ट शद्ब उच्चारिले जातात. सकाळीं "आंतां उठण्याची वेळ झाली" असे शद्ब इंग्रजीत घड्याळ बोलतें!

लोखंडाचे पत्रे इतके पातळ करतां येतात कीं ते एकावर एक असें रचले तर एक इंच उंचीत १८०० पत्रे राहू शकतात.

आमच्या देशांतील मनुष्यांची जी गेल्या वर्षीं गणती झाली तिच्यावरून असें समजतें कीं दर ४५ पुरुषांत एका पुरुषाला व १२५० स्त्रियांत एका स्त्रीला लिहितां वाचतां येतें.

बंगाल्यात कुलीन जातीचे ब्राह्मण आहेत त्यांच्या मुलांस आपल्या मुली देण्यांत तिकडील दुसरे ब्राह्मण फार पुण्य मानतात. एकेका मुलाला पुष्कळच बायका करतात व त्याला पैसाही पुष्कळ मिळतो हल्लीं एका मनुष्याला १०७, एकाला ६७ व एकाला २९ बायका आहेत. सर्व बायका नवऱ्याच्या घरीं रहात नाहींत. आपआपल्या बापाच्याच घरीं असतात. नवऱ्यापाशीं बायकांची नांवनिशी मात्र चोपडींत लिहिलेली असते! नवरा बायकांच्या भेटीकरितां एकदां फिरावयास निघतो व जो सासरा पुष्कळ पैसा देईल त्याच्या घरीं तो जातो. केव्हां केव्हां लग्ना नंतर नवराबायकांची जन्मांत कधीं भेट होत नाहीं!

विलायतेंतील ल्यांकेशायर प्रांतांतील शेंकडा ९१ गिरण्या बंद ठेवण्यांत येणार आहेत. त्या मुळें १ कोटी ७० लक्ष चात्या बंद होणार व २४,००० कापसाचे गठ्ठे कमी खपणार गिरण्या किती दिवस बंद करणार हें अजून स्पष्ट झालें नाहीं.

अमेरिकेंत एकाजवळ फार मोठा कुत्रा आहे त्यांची ऊंची तीन फूट व वजन पक्के तीन मण आहे. त्याची किंमत हल्लीं ११ हजार रुपये झाली आहे.

बार्शी रोडवर वाफेनें चालणारी ट्रामवे करण्यास स्टेट सेक्रेटरी यांची मंजुरी झाली आतां हें काम लवकरच सुरू होऊन पुरेंही होईल आणि त्या रस्त्यावर हल्लीं ज्या शेंपन्नास बैलगाड्या पोट भरीत आहेत त्या सहजींच रिकाम्या होऊन सुखानें विश्रांती घेण्यास पात्र होतील. त्या भागांत दुष्काळाचा जास्त संभव असतो व त्यांत गुरें फार मरतात तेव्हां ती ट्रामवे झाली ह्मणजे त्या गाड्यांकडे गुंतणारे तितके बैल व गाडेकरी हे शेतकीस रिकामे होतील हा तरी एक फायद्याच आहे त्या भागांत रेलवे किंवा ट्रामवे करण्यास ठिकठिकाणीं पुढें यावें अशी पुष्कळ खटपट चालली होती त्याचें काय झालें?

जर्मनींतील एका शाळामास्तरानें आपली ५० वर्षांची डायरी लिहून ठेवली आहे. त्यांत त्यानें विद्यार्थ्यांस कसकशा शिक्षा दिल्या हे लिहिलें आहे. ९,११,५१७ काठीचे फटके, २,१०,१०० चापट्या, १०,९८६ रुळाचे फटके, १,३६,७१५ हाताचे गोदे, १०,२३५ तोंडांत चपराका, ७,९०५ कानावर चापट्या, १,१५.८०० डोक्यावर गुद्दे वगैरे.

कामगार.

अत्युच्च वृक्षत्रय.—जगामध्यें सर्वांत उंच असें पुढील तीन उंच वृक्ष आहेत, त्यांपेक्षां अधीक उंच वृक्ष कोठें असल्याचें अजून समजलें नाहीं; क्यालिफोर्नियामध्यें स्टॉकटन येथें ३२५ फूट उंचीचा एक वृक्ष आहे; आणि व्हिक्टोरिया (आस्ट्रेलिया) येथें अनुक्रमें ४३५ व ४५० फूट उंचीचे दोन वृक्ष आहेत.

तिबेटी—संस्कृत कोश—सिकीम संस्थान हिंदुस्थान सरकाराकडे असल्यामुळें हिंदुस्थानाला तिबेट देशांतील सरहद्द अगदींच भिडणारी आली, व त्यामुळें त्या व या देशांत दळणवळण जास्ती वाढून तिकडील भाषेचें ज्ञान इकडील लोकांस व इकडील भाषेचें ज्ञान तिकडील लोकांस होणें इष्ट व जरूर झालें आहे. त्या करितां कलकत्याचे बाबू शरच्चंद्रदास हे सरकारच्या सूचनेवरून एक तिबेटी-संस्कृत कोश तयार करणार आहेत.

हिंदुस्थानचे माजी गव्हरनर जनरल व व्हाइसराय लार्ड लिटन यांनीं आपल्या एका खानगी पत्रांत असें लिहिले आहे कीं, अफूचे उत्पन्न कमी झालें असतां सरकारचे कांहीं फार नुकसान होणार नाहीं. सर्व देशभर आगगाडीचें जाळे पसरलें ह्मणजे अफूचें उत्पन्न गेलें तरी सरकारास त्याचपास नको.

मुंबई पासून अमेरिकेंतील न्यूयार्क शहरी जावयास अवघे २५ दिवस लागतात. मध्यंतरीं लंडन येथें दोन दिवस घालवावयास सांपडतात पाश्चिमात्य सुधारणेनें किती फायदा आहे हा पहावा.

पोट शुळावर— कडू लिंबाचा पाला, सुंठ व सैंधव, समभाग घेऊन एकत्र खलून गोळ्या बांधाव्या, व पोटदुखूं लागल्यास एक गोळी ऊन पाण्या बरोबर घ्यावी.

मुलास माती खाण्यापासून होणाऱ्या विकारांवर:— बाभळ, लिंब, बोर, निंबोणी, व आंबा यांच्या अंतरसालीचा काढा,—निकाढा—सात दिवस देणें. प्रत्येक जिन्नस पावतोळा घेऊन अर्वाशेर पाणी घालून अष्टमांश काढा उरवावा.

पीनसरोगावर:— (१) दूर्वा, केशर, व पारोशा पिंपळाचें फळ पक्क तुपांत उगाळून त्याचा थेंब नाकांत सोडणें, सात दिवस केल्यानें गुण येतो.

(२) मोराचा पाय जाळून त्याची राख गाईच्या तुपांत खलून त्याचा थेंब नाकांत सोडीत जाणें.

करमणूक.

तागाच्या उद्योगाचा फैलाव — बंगाल्यांत तागाचें अतोनात पीक होतें. सन १८८२ साली सगळ्या हिंदुस्थनांत तागाच्या २१ गिरण्या व त्यांत ९१००० चात्या व ४०५०० मजूर होते. सन १८९१ मध्यें गिरण्या २६, चात्या १६२०००, मजूर ६२००० आणि भांडवल ३½ कोट रुपयें झालें असें सरकारी माहिती वरून कळतें.

कायदे कौन्सिलच्या मेंबराचा खर्च—हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौन्सिलांत जे ॲडिशनल मेंबर नेमिले जातात त्यां पैकीं सरकारी नोकर मेंबरास दरमहा चारहजार रुपये खर्च द्यावा लागतो. आणि बिन नोकर मेंबरास एकासेशनाबद्दल ५००० पासून १०००० रुपये पर्यंत खर्च द्यावा लागतो. गेल्या हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौन्सिलच्या सेशनाबद्दल एकंदर ६०००० रुपये खर्च झाला असें समजतें. नव्या बिला प्रमाणें जास्त मेंबर नेमिले म्हणजे हें खर्चाचें मान अतीशय वाढेल असें ग्याझीटकर्ते म्हणतात.

शु०

मलायन लोकांनीं दोन युरोपियनांस मारल्याबद्दल फारच बोभाट झाला आहे.

रशियन सरकारास यंदा ३० कोटी रुपये दुष्काळपीडितार्थ खर्च करावे लागतील असें समजतें.

अमेरिकेंत एका गृहस्थापाशीं कागदावर बारीक रेषा ओढण्याचें यंत्र आहे त्याणें एक इंच जागेंत १० लाख रेषा ओढता येतात,

लांकशायर मध्यें गिरण्या वगैरे बंद पडून काम बंद राहील असें दिसते.

कोल्हापुर मिरज व बेळगांव येथें बराच पाऊस पडला असें समजतें.

दिल्हीस वाल्याचा फारच उपद्रव आहे असें समजतें.

चीन देशांत लोक मुसलमान फार व्हावयास लागले आहेत असें समजतें.

इराणच्या शहाच्या हुक्का ओढण्याच्या नळीची किंमत सुमारें ३ लक्ष रुपयें आहे असें समजतें.

बंगाल्यांत संस्कृत शिक्षणाच्या उत्तेजनार्थ सरकारनें १८००० रु. देण्याचें ठरविलें आहे.

सु० प०

बंगालच्या नेटिवपत्रांची जी एक सभा स्थापन झाली आहे तिच्या मागण्यावरून तुह्मास जी कांहीं माहिती पाहिजे असेल ती सेक्रेटरी आफीसांतल्या अमुक कामदाराजवळ मागावी ह्मणजे मिळेल व ती मिळतांच सभेच्या पुढाऱ्यानें सभेच्या मेंम्बरांस कळवावी असें बंगालच्या ले. गव्हरनरांनीं ठरविलें आहे असें समजतें. हा सर्व प्रकार चांगला झाला यांत कांहीं शंका नाहीं व आमच्या इकडेही असा प्रकार होणें फार जरूर आहे पण आमचें शहाणपण आह्मास तसें करूं देत नाहीं. विशेषेंकरून पुण्याचा विद्वान ह्मणविणारी माणसें खुळावल्यामुळें आमचें मोठें नुकसान होण्याची भीती वाटूं लागली आहे. मिडे नागपुरास काय बोलले, टिळक विद्यार्थी असतांना काय बरळले आणि रानडे गर्भांत असतां काय डोहोळे झाले यांच्या साक्षी भरण्यांत पुण्यांची धेंडें गुंतून गेलीं असल्यामुळें, त्यांस आपलें खरें कर्तव्य समजतच नाहींसे झालें आहे असें दिसतें. यांच्यांतलें हें पिशाच्च निघून जाऊन ताळ्यावर आणण्यास कोणी खरमरीत पंचाक्षरी पाहिजे आहे.

टर्कीश कौंसिल जनरल रहतिव पाच्छा हे दक्षिण हैद्राबादेस गेले आहेत. हे नबाब विकार उल्मुल्क यांच्या येथें उतरणार आहेत.

विमानाच्या योगानें शत्रूच्या छावणींत आपले हेर पाठविण्याची नवी युक्ति जर्मनींत निघाली आहे. असें ह्मणतात जर्मन सरहद्दीवरून एक विमान लोव्हगो दिल्यावर येत असलेलें नुकतेंच पाहण्यांत आलें. या विमानावर पाच चार तोफांचे गोळे उडविले पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. असेंच दुसरें एक विमान ता. ७ मार्च रोजीं डोंब्रोवा येथून वायुवेगाच्या विरुद्ध गतीनें जाणारें दिसलें होतें यावरून जर्मनीकडे ही विमानाची विद्या आमच्या पुराणांत सांगितलेल्या हकीकतीशीं बरीच जुळत चालली आहे असें होतें.

ठा०अ०

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.